# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षण

सत्र-३ पेपर-४

# स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण

सत्र-४ पेपर-६

बी. ए. भाग-२

**शिक्षणशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग-२ शिक्षणशास्त्र पेपर ४ व ६ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-90-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यासमंडळ : शिक्षणशास्त्र

अध्यक्ष – **डॉ. श्रीमती एस. व्ही. काळेबाग**
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती पी. एस. पाटणकर**
  शिक्षणशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती जी. एस. पाटील**
  शिक्षणशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्राचार्या डॉ. श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
  कॉलेज ऑफ एज्युकेशन विटा,
  ता. खानापूर, जि. सांगली

- **डॉ. श्रीमती प्रज्ञा भिमराव पाटील**
  श्री संत कृपा कॉलेज ऑफ एज्युकेशन, घोगाव,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. अशोक मारूती पाटील**
  वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. प्रमोद कलाप्पा लंबे**
  श्री आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ
  एज्युकेशन, आष्टा

- **डॉ. संभाजी मारुती भोसले**
  इचलकरंजी बी.एड. कॉलेज, इचलकरंजी, जि.
  कोल्हापूर

- **डॉ. बजरंग सिधू घाटगे**
  तात्यासाहेब कोरे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

- **डॉ. विकास गजानन परांजपे**
  इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर

- **डॉ. सहदेव यशवंत पुजारी**
  कै. रामराव निकम शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इंदोली, ता. कराड, जि. सांगली

- **डॉ. भुषण त्र्यंबक पाटील**
  ३५, आनंदमाई, जयदेवनगर, सिंहगड रोड,
  पुणे ४११०३०

- **डॉ. संभाजी एम. भोसले**
  इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर

- **डॉ. बी. पी. मरजे**
  पुतळाबेन शहा कॉलेज ऑफ एज्युकेशन,
  सांगली

- **डॉ. सी. जी. खांडके**
  बी. जी. खराडे कॉलेज ऑफ एज्युकेशन,
  शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **डॉ. एम. ए. पाटील**
  शिवाजीराव देशमुख शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली.

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने बी. ए. भाग-२ वर्गामध्ये बहिःस्थ अध्ययनार्थी म्हणून प्रवेश घेतलेल्यासाठी ''स्वात्र्यंपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण'' ह्या विषयाचे स्वयंःअध्ययन साहित्य तयार केलेले आहे. या विषयातील तज्ज्ञांनी या स्वयंअध्ययन साहित्यात वेगवेगळी प्रकरणे लिहून सदर विषय विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या स्वयंःअध्ययन साहित्यात आपणासाठी स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षणाची भूमिका सखोल, सोप्या व सुटसुटीत भाषेत केलेली आहे. मानवाशी निगडीत प्रत्येक क्षेत्रात शिक्षणाची गरज आहे. शिक्षणाशी निगडीत प्रश्न सोडविण्यासाठी व शिक्षणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी शिक्षणाची मदत होते. मानसशास्त्र व शिक्षण यांचा संबंध परस्परपूरक व परस्परांना पोषक असा आहे. या दृष्टीने लेखन करण्याचा प्रयत्न लेखकांनी तुमच्यासाठी केलेला आहे. वाचकांना विषयाचे ज्ञान व्हावे तसेच आशयाचे आकलन व्हावे, म्हणून आवश्यक त्या ठिकाणी तक्ते, आकृत्या, आलेख काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

मानसशास्त्रांच्या दृष्टिकोनातून शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्याची आवडनिवड, आशा-आकांक्षा, त्याची क्षमता यांना मानसशास्त्राने शिक्षणात महत्त्व प्राप्त करून दिले आहे. अभिरूची, अभिवृत्ती, अभिक्षमता, व्यक्तिमत्त्व इ. पैलूंच्या आधारे विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन शैक्षणिक मानसशास्त्राने शिक्षकाला दिला आहे. अशा शैक्षणिक मानसशास्त्राची सविस्तर चर्चा केलेली आहे.

बहिःस्थ अध्ययनार्थींना विषयाचे त्वरित आकलन व्हावे म्हणून, विषयाची प्रस्तावना, उद्दिष्टे, मांडणी, विषयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, स्वयंःअध्ययनासाठी प्रश्न, सरावासाठी प्रश्न व उत्तरे अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची नावे प्रकाशनासह दिलेली आहेत. अशारितीने अध्ययनार्थींना विषयाचे चांगले आकलन होईल, अशी अपेक्षा आहे.

**– संपादक**

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र ३ पेपर ४ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षण**
**सत्र–४ पेपर ६ : स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३ घटक क्रमांक | सत्र–४ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. आर. यु. संकपाळ**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १, ४ | – |
| **प्रा. राहुल चित्रकार**<br>कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. सिमा मरजे**<br>बळवंत कॉलेज विटा खानापूर रोड, विटा, ता. खानापूर जि. सांगली | ३ | – |
| **प्रा. जमीर इलाही मोमीन**<br>आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज, शुक्रवार पेठ, सातारा. | – | १ |
| **डॉ. आर. बी. व्हनबट्टे**<br>सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड, ता. कराड, जि. सातारा | – | २ |
| **डॉ. के. बी. पाटील**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | ३, ४ |

**■ संपादन समिती ■**

**प्राचार्या (डॉ.) मेघा गुळवणी**
मॉडर्न कॉलेज ऑफ एज्युकेशन,
मु. पा. विटा, ता. खानापूर, जि. सांगली

**डॉ. विद्यानंद खंडागळे**
शिक्षणशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–३ पेपर–४** | |
| | **स्वातंत्र्यपूर्व भारतातील शिक्षण** | |
| घटक १ | वैदिक काळातील शिक्षण (पूर्व आणि उत्तर) | १ |
| घटक २ | बौद्ध काळातील शिक्षण | २३ |
| घटक ३ | इस्लामिक काळातील शिक्षण | ३६ |
| घटक ४ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–१९८६ | ४८ |
| | **सेमिस्टर–४ पेपर–६** | |
| | **स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण** | |
| घटक १ | विद्यापीठ शिक्षण आयोग | ६३ |
| घटक २ | माध्यमिक शिक्षण आयोग (मुदलियार आयोग १९५२–१९५३) | ७७ |
| घटक ३ | कोठारी आयोग १९६४–६६ | १०१ |
| घटक ४ | ब्रिटिश कालीन शिक्षण | ११४ |

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक – १

# वैदिक काळातील शिक्षण (पूर्व आणि उत्तर)

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

## अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२.१ पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालखंडातील शिक्षण

१.२.१.१ पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालखंडातील शिक्षणाचे स्वरूप

१.२.१.२ पूर्व वैदिक/ऋग्वेद कालीन शिक्षण

१.२.१.२.१ पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालीन शिक्षणाची ध्येये

१.२.१.२.१.१ मोक्ष प्राप्तीसाठी शिक्षण

१.२.१.२.१.२ वैदिक वाङ्मयाचा इतिहास

१.२.१.२.१.३ मानवी जीवनात ज्ञानरूपी प्रकाश पसरविणे

१.२.१.२.१.४ आत्मसाक्षात्कार घडविणे

१.२.१.२.१.५ अध्यात्माचे ज्ञान आत्मसात करणे

१.२.१.२.१.६ चारित्र्य संवर्धन करणे

१.२.१.२.१.७ सर्वांगीण विकास साधणे

१.२.१.२.१.८ संस्कृती संवर्धन आणि संक्रमण करणे

१.२.१.२.१.९ कर्तव्यदक्ष शिष्यांची निर्मिती

१.२.१.२.१.१० शारीरिक विकास

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १

१.२.१.२.२ पूर्व वैदिक काळातील अध्यापन पद्धती

१.२.१.२.१ ज्ञानाचे मौखिक पद्धतीद्वारे हस्तांतरण

१.२.१.२.२ वादविवाद आणि चर्चा

१.२.१.२.३. निसर्गाच्या सान्निध्यात प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण

१.२.१.२.४ पर्यवेक्षित अध्ययन

१.२.१.२.५ ध्यानधारणा

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २

१.२.१.२.३ पूर्व वैदिक काळातील शिक्षणामधील विद्यार्थी शिस्त

१.२.१.२.३.१ स्वयंशिस्त

१.२.१.२.३.२ वर्तनविषयक स्वयंशिस्त

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३

१.२.१.२.४ पूर्व वैदिक काळातील शिक्षक भूमिका

१.२.१.२.४.१ माता पित्याच्या भूमिकेतून शिष्यावर धर्म आणि संस्कृतीचे संस्कार करणे

१.२.१.२.४.२ व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी गुरू म्हणून आदर्श निर्माण करणे.

१.२.१.२.४.३ शिष्यांची वडिलधाऱ्या बंधूभावातून देखभाल

१.२.१.२.४.४ ज्ञान साधकाची भूमिका

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४

१.२.१.३ उत्तर वैदिक शिक्षण/ब्राह्मण काळातील शिक्षण

१.२.१.३.१ उत्तर वैदिक /ब्राह्मण काळातील शिक्षण

१.२.१.३.२ अध्यापन पद्धती

१.२.१.३.२.१ मौखिक पद्धतीने अध्यापन

१.२.१.३.२.२ चर्चा पद्धती/ वादविवाद पद्धती

१.२.१.३.२.३ वैयक्तिक अनुदेशन

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ५

१.२.१.३.३ उत्तर वैदिक/ ब्राह्मण काळातील विद्यार्थी शिस्त

१.२.१.३.४ उत्तर वैदिक/ ब्राह्मण काळातील शिक्षक भूमिका

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ६

१.३ सारांश

१.४ स्मरणात ठेवावयाच्या संकल्पना

१.५ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१.६ स्वाध्याय

१.७ पुढील अध्ययनासाठी संदर्भ/साहित्य

## १.० उद्दिष्टे :

या पाठातून आपल्याला पुढील घटक अभ्यासावयाचे आहेत.

- वैदिक शिक्षणाचा कालखंड समजावून घेणे.
- पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालखंडातील शिक्षण आणि त्यांचे स्वरूप माहिती करून घेणे.
- पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालखंडातील शिक्षणाची ध्येये जाणून घेणे.
- पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालखंडातील अध्यापन पद्धती जाणून घेणे.
- पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालखंडातील विद्यार्थी शिस्त जाणून घेणे.
- पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालखंडातील शिक्षक भूमिका जाणून घेणे.
- पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालखंडातील शिक्षक आणि त्यांच्या स्वरूपाबद्दल माहिती करून घेणे.
- उत्तर वैदिक/ब्राह्मण काळातील शिक्षण आणि त्यांच्या स्वरूपाबद्दल माहिती करून घेणे.
- उत्तर वैदिक/ब्राह्मण काळातील शिक्षणाची ध्येये जाणून घेणे.
- उत्तर वैदिक/ब्राह्मण काळातील अध्यापन पद्धती जाणून घेणे.
- उत्तर वैदिक/ब्राह्मण काळातील विद्यार्थी शिस्त जाणून घेणे.
- उत्तर वैदिक/ब्राह्मण काळातील शिक्षक भूमिका जाणून घेणे.

## १.१ प्रास्ताविक :

एकविसाव्या शतकातदेखील भारतीय संस्कृती जगामध्ये सर्वश्रेष्ठ मानली जाते. भारतीय संस्कृतीला एक वैभवशाली परंपरा आहे. संस्कृती ही व्यापक संज्ञा असून तिच्यामध्ये मानवाने आत्मसात केलेल्या रूढी, परंपरा, चालीरिती, कायदा, जीवनमूल्ये, आदर्श व जीवनप्रणाली आणि ज्ञान यांचा समावेश होतो. अनेक प्राचीन संस्कृतीमध्ये भारतीय संस्कृती ही प्राचीन आणि समृद्ध ठरते ती केवळ तिच्या शिक्षण प्रणालीमुळे होय. भारतीय शिक्षण पद्धती ही प्राचीन आहे. तसेच ती खूप समृद्ध आणि व्यापक व्यवस्था होती. या व्यवस्थेचे अनेक टप्पे पडतात. त्यापैकी वैदिक शिक्षण एक होय. या वैदिक शिक्षणाच्या काळाचे दोन भाग हे आकृती क्र. १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे पडतात.

**वैदिक शिक्षण कालखंड**

वैदिक पूर्व/ऋग्वेद काळ वैदिकोत्तर /ब्राह्मण काळ

आकृती क्र. १ : वैदिक शिक्षण कालखंड

आकृती क्रमांक १ मध्ये दर्शविलेल्या वैदिक कालखंडाचा अभ्यास आपण त्याची उद्दिष्टे, अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, विद्यार्थी शिस्त याद्वारे करणार आहोत. चला तर मग सर्व प्रथम आपण स्वातंत्र्यपूर्व भारतातील वैदिक काळातील शिक्षणाबाबतीत अध्ययन करू यात.

अतिप्राचीन काळापासून भारतीयांचे ज्ञान भांडार हे संस्कृत भाषेत असलेले दिसून येते. सर्वप्रथम ऋग्वेद सूत्रे ही अस्तित्वात आली. ऋग्वेदसूत्रामध्ये आर्य ऋषींनी सृष्टीतील अनेक वैशिष्ट्यांवर जसे की सूर्योदय, मेघ गर्जना, पर्जन्य, अग्नि इ. वर सूत्रे रचली तो काळ म्हणजे पूर्व वैदिक काळ. ऋग्वेद काळ (इ.स. पूर्व २५०० ते इ. स. पूर्व २०००) अशा या पूर्व वैदिक काळामध्ये आर्यांचा प्रादेशिक विस्तार हा गांधार, काश्मीर, पंजाब तसेच सिंधू आणि पूर्वेच्या शरयू नदीपर्यंतच्या प्रदेशापर्यंत होता. ऋग्वेदामध्ये प्रामुख्याने सिंधु, रावी, सियास व सतलज या नद्यांचा उल्लेख आढळतो. समुद्राचा उल्लेख आढळत नाही. तसेच विंध्य पर्वत आणि नर्मदा नदीचा उल्लेख आढळत नाही. या काळातील माहिती ही आपल्याला ऋग्वेदातूनच प्राप्त होतो.

आता आपणाला प्रश्न पडतो तो म्हणजे ऋग्वेद म्हणजे नेमके काय? तर ऋग्वेद हा वेदांचा भाग आहे. जगातील प्राचीनतम साहित्यात वैदिक साहित्याचा समावेश होतो. वैदिक साहित्याच्या काळासंबंधी विद्वानांमध्ये मतभेद आहेत. काही विद्वानांच्या मते वैदिक साहित्याचा कालावधी पुढीलप्रमाणे असलेला दिसून येतो.

| | |
|---|---|
| मॅक्स मूलरच्या मते | इ. स. पूर्व १२०० वर्षे |
| हँगच्या मते | इ. स. पूर्व २४०० वर्षे |
| लोकमान्य टिळकांच्या मते | इ. स. पूर्व ४००० वर्षे |

असे मानण्यात येते की, वेदांची निर्मिती ही मनुष्याने केली नसून देवांनी केली आहे. 'वेद' हा शब्द संस्कृत 'विद' या धातूपासून निर्माण झाला असून त्याचा अर्थ कळणे, जाणणे वा ज्ञान होणे असा आहे. अशा या वैदिक साहित्यामध्ये प्रामुख्याने सनातन/ शाश्वत तत्त्वांची चर्चा करण्यात आली असून यामध्ये चार वेदांचा समावेश होतो. असे हे वेद पुढीलप्रमाणे

**वेद**

| **ऋग्वेद** | **यजुर्वेद** | **सामवेद** | **अर्थववेद** |
|---|---|---|---|
| ◆ मुख्यतः इंद्र, वरूण, सोम इ. स्तुतीपर ऋचा/पूजा याचा समावेश.<br>◆ याचबरोबर ज्ञान, भक्ती, अर्थशास्त्र, नीतीशास्त्र, आयुर्वेद इ. विषयांचा समावेश | यज्ञयागांची पद्धत व द्यावयाचा बळी यासबंधीची सूचना व मार्गदर्शनाचा समावेश | 'सा' म्हणजे ऋचा व 'अम' म्हणजे गांधारादी सप्त स्वर ऋचेचे सप्तस्वरयुक्त गान म्हणजे 'साम' | या वेदात यंत्र, तंत्र व मंत्र यांचा ऊहापोह आहे. यंत्र म्हणजे मानवी शरीर, यंत्र म्हणजे फॉर्म्युला व तंत्र म्हणजे मानवी शरीरावर यंत्र वापरण्याची रीत वा पद्धत (यामध्ये औषधी + धातूविद्या वापरतात.) |

**प्रत्येक वेद साहित्य हे तीन विभागात विभागलेले दिसते**

| संहिता किंवा मंत्र विभाग | ब्राह्मणे किंवा आन्हिकांचा विभाग | आरण्यके किंवा चिंतनात्मक विभाग |
|---|---|---|
| यामध्ये परमात्मा किंवा परम ब्रह्म व देवांच्या स्तुतीपर स्त्रोत्रे आहेत. | मंत्रांचा उपयोग कसा करावा व यज्ञविधी कसा करावा यासंबंधी मार्गदर्शन या विभागात केले जाते. | उपनिषदे हा सर्वसामान्यपणे आरण्यकांचा शेवटचा भाग असून त्यामध्ये विशेषतः तत्त्वज्ञानाचा समावेश होतो. त्यास वेदांत म्हणजे वेदांचा अंत असे संबोधले जाते. |

आकृती क्र. १.३ वेद साहित्याचे विभाग

अशा या वेदामधूनच पूर्व वैदिक काळ म्हणजेच ऋग्वेद काळाविषयी माहिती मिळण्यास सहाय्य होते. साधारणतः प्रामुख्याने आर्य संस्कृतीशी संबंधित सदर वेद असलेले दिसून येतात. त्यामुळे आर्यांविषयी माहिती ही ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद आणि उपनिषदांसारख्या इतर वैदिक काळाचे दोन उपप्रकार पडतात. सुरूवातीच्या कालखंडास ऋग्वेद काळ किंवा पूर्व वैदिक काळ आणि नंतरचा काळ म्हणजे ब्राह्मण काळ किंवा उत्तर वैदिक काळ होय. अशा या वैदिक काळामध्ये शिक्षण पद्धती पुढीलप्रमाणे असलेली दिसून येते.


## १.२ विषय वस्तूचे सादरीकरण :

### १.२.१ पूर्व वैदिक म्हणजेच ऋग्वेद कालखंडातील शिक्षण :

ज्ञानाचा शोध हा खोलवरपणे या कालखंडामध्ये करण्यात आला. वैदिक काळातील ऋषींनी ज्ञानाचा प्रचार व प्रसार सर्व जगभर केला. वे हे जगातील आद्य पाठ्पुस्तक मानण्यात येते जे भारतीय ऋषींनी निर्माण केले. यावरूनच हे सिद्ध होते की, वेदकाळामध्ये ज्ञान ग्रहणाची परंपरा अस्तित्वात होती. अशा या ऋग्वेद कालखंडातील शिक्षणाचे स्वरूप खालीलप्रमाणे

#### १.२.१.१ पूर्व वैदिक/ऋग्वेद काळातील शिक्षणाचे स्वरूप :


ऋग्वेद काळमध्ये वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासाला विशेष महत्त्व होते. वैदिक शिक्षणाचा विकास सुसंघटित विचारप्रर्वतक दिशेने झालेला दिसून येतो. या काळामध्ये जगातील इतर लोकांच्यापर्यंत असे ज्ञानभांडार उपलब्ध असलेले दिसून येत नाही. वैदिक वाङ्मयात पुढील घटकांचा समावेश होत असलेला दिसून येतो.




आकृती क्र. १.४ वैदिक वाङ्मयाचे घटक

आकृती क्रमांक १.४ मध्ये दर्शविलेल्या वैदिक वाङ्मयाच्या घटकापैकी वैदिक शिक्षणाचा विचार करताना फक्त वेदांचाच विचार केला जातो.

'वेद' या शब्दाचा शब्दशः 'ज्ञान' असा अर्थ आहे. वेद हा शब्द 'विद' या शब्दापासून उत्पन्न झालेला आहे. वेद म्हणजे विविध प्रकारचे ज्ञान होय. प्रामुख्याने असे दिसून येते की आर्य संस्कृतीचे ज्ञान हे वेदांच्या रूपाने साठवण्यात आलेले आहे. अशा या वेदांची रचना आकृती क्रमांक १.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असलेली दिसते.




आकृती क्र. १.५ वेदांची रचना

आकृती क्रमांक १.५ वेदांची रचना यामध्ये श्लोक आणि गद्याचा समावेश होत असलेला दिसतो. श्लोकांचा साम तर गद्याला यजुश ऋचा असे म्हणतात तर श्लोक आणि गद्य या दोघांना एकत्रितपणे सूक्त म्हणजेच सुंदर अभिव्यक्ती असे देखील म्हणत असलेले दिसून येते. वेदांच्या विविधतेमुळेच त्याला त्रिवेद किंवा वेदत्री असे देखील म्हणतात.

असे हे प्राचीन कालीन वेद लिखितस्वरूपात अस्तित्वात नव्हते. हे वेद गुरूकडून –शिष्याकडे, वडिलाकडून –मुलांकडे संक्रमित झालेले होते. अशा या वेदांना महर्षी व्यासांनी लिखित स्वरूप प्राप्त करून दिले. वेदांची रचना त्यांनी महाभारतात केली आणि लिखित स्वरूपामध्ये ते इतर पिढ्यांना प्राप्त झाले.

अशा या पूर्ववेदकालीन म्हणजेच ऋग्वेदकालीन शिक्षणाची उद्दिष्टे, अध्यापन पद्धती, विद्यार्थी शिस्त आणि शिक्षकाची भूमिका याबद्दलची सविस्तर माहिती घेऊयात.

## १.२.१.२ पूर्व वेदकालीन/ ऋग्वेद कालीन शिक्षण

या काळातील शिक्षणाची ध्येये पुढीलप्रमाणे :

### १.२.१.२.१ शिक्षणाची ध्येये :

पूर्व वेदकाळामध्ये धर्म हा लोकजीवनाचा आधार असल्यामुळे या काळातील शिक्षणाची ध्येये ही धार्मिकता, संस्कृती संवर्धन, नैतिकता व चारित्र्य विकसन याशी संबंधीत होती. ती ध्येये पुढीलप्रमाणे :

#### १.२.१.२.१.१ मोक्ष प्राप्तीसाठी शिक्षण :

वैदिक काळात मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर धर्माचा प्रभाव असलेला दिसून येतो. प्राचीन भारत हा प्रामुख्याने राजकीय, सामाजिक किंवा अर्थिक बाबींपेक्षा धार्मिक बाबींवर अधिक अवलंबून असलेला दिसून येतो. त्यामुळे साहजिकच धर्माचा शिक्षणावर प्रभाव आणि शिक्षणाच्या ध्येयावर असलेला दिसून येतो. म्हणूनच या काळातील शिक्षण हे ज्ञान प्राप्तीपुरते मर्यादित न राहता मुक्ती मिळवण्यासाठी म्हणून शिक्षण या ध्येयावर आधारित असलेले दिसून येते. या काळातील शिक्षण हे प्रामुख्याने गुरूकुलात दिले जात होते. गुरूकुलामध्ये धार्मिक वातावरण असे त्यामुळे शिष्यांमध्ये धार्मिक भावना विकसनास सहाय्य होत असे. प्रार्थना, व्रतवैकल्य, सण, समारंभ, उत्सव यांच्या माध्यमातून धार्मिक भावना विकसनाचा प्रयत्न करण्यात येत असे.

अशा या वातावरणात आणि गुरूंच्या सान्निध्यात शिष्यावर धार्मिकता व पावित्र्य यांचे संस्कार होत. गुरू त्यांच्या शिष्यांना आध्यात्मिक पातळीवर विचार करण्यास प्रवृत्त करत आणि मोक्ष प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत म्हणूनच पूर्व वैदिक काळामध्ये मोक्ष प्राप्ती हे शिक्षणाचे ध्येय असलेले दिसून येते.

#### १.२.१.२.१.२ : वैदिक वाङ्मयाचा विकास :

पूर्व वैदिक काळातील लोकांच्या प्रामुख्याने मोक्ष प्राप्तीवर भर होता आणि त्यामुळे ब्रह्मज्ञान जाणून घेणे यावर लक्ष केंद्रित करण्यात येत असे. आणि त्यामुळेच वैदिक वाङ्मयाच्या माध्यमातून अंतिम सत्याचा शोध घेण्यावर भर देण्यात येत असे तसेच या शोधाद्वारे प्राप्त होणाऱ्या ज्ञानाची भर घालून वेदवाङ्मय आणि वेदांची उपांगे यांचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यात येत असे.

#### १.२.१.२.१.३ : मानवी जीवनात ज्ञानरूपी प्रकाश पसरविणे :

असे मानण्यात येते की, आत्मा आणि परमात्मा यांच्यातील द्वैत (भेद) अज्ञानामुळे निर्माण होते आणि म्हणूनच आत्मा आणि परमात्मा यांच्यातील अंतर जर कमी करावयाचे असेल तर अज्ञान नष्ट झाले पाहिजे. कर्मोपासना म्हणजेच भक्ती आंतरिक शक्तीचे शुद्धीकरण करते आणि त्यामुळे परमात्म्याची प्राप्ती होण्यास मदत

होत असते. अध्यात्मिक दृष्टिने आत्मा आणि परमात्मा एकमेकांत मिसळतात तेव्हा मोक्षप्राप्ती होते. तसेच कर्मविषयक सिद्धांतावर भर देण्यात आलेला दिसून येतो. कर्मविपाक् सिद्धांत म्हणजेच मनुष्याला आपल्या कर्मानुसार सुख, दुःख आणि या जगात जन्म प्राप्त होत असतो. मनुष्य अज्ञानामुळे परमात्म्याला विसरतो आणि त्यामुळे त्याच्या वाट्याला दुःखे येतात. उपनिषदांमध्ये मनुष्याला मुक्तीचा मार्ग दाखविण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने आत्मा व परमात्मा यांच्या विलीनीकरणाची शिकवण देण्यात आलेली आहे. तसेच अध्यात्मिकतेमध्ये असे मानण्यात येते की 'अज्ञान असणे' हे अंधकार असण्यासमान आहे आणि अज्ञानरूपी अंधकारच जगातील सर्व दुःखाचे मूळ आहे आणि अशा या अंधकारपासून जर मनुष्याला मुक्ती मिळवायची असेल तर शिक्षण म्हणजे 'ज्ञान' घेणे आवश्यक आहे. म्हणूनच या पूर्व वैदिक काळातील शिक्षणाचे अज्ञानरूपी अंधकार नष्ट करणे आणि ज्ञानरूपी प्रकाश पसरविणे हे एक उद्दिष्ट असलेले दिसून येते.

### १.२.१.२.१.४ : आत्मसाक्षातकार घडविणे

प्राचीन भारतीय शिक्षणामध्ये व्यक्तीला आत्मसाक्षात्कार घडविणे यावर भर दिलेला दिसून येतो. मनुष्य हा भौतिक सुखाकडे आकृष्ट होतो आणि तो वस्तूंच्या ज्ञानामध्ये गुंततो. परंतु असे भौतिक ज्ञान हे परमात्म्याच्या सुखापासून मनुष्य मात्राला परावृत्त करते. जड वस्तू जगतात गुंतून जाणे आणि परमात्म्याला विसरणे त्यामुळे व्यक्ती सत्यज्ञानापासून परावृत्त होते. हा पडदा दूर सारून सत्यज्ञान प्राप्ती होण्यासाठी ध्यानधारणा व आत्मसाक्षात्कार आवश्यक आहे. आत्मसाक्षात्कार हा गुरूंपासून मिळतो. आत्मसाक्षात्कार म्हणजे मी कोण आहे? माझ्या जीवनाची कर्तव्ये कोणती आहेत? मला कोठे जायचे आहे? त्यांचे ज्ञान होणे. आत्मसाक्षात्कारामुळे आत्मतत्त्वाचा बोध होतो. परमात्म्याची प्राप्ती होऊन मोक्षप्राप्तीचा मार्ग मोकळा होतो. पूर्व वैदिक काळातील शिक्षणाचे जे ध्येय आहे आत्मसाक्षात्कार घडविणे त्यातून मनुष्यास स्व विकास हा अध्यात्मिक मार्गाने साधण्यास मदत होत असलेली दिसते.

### १.२.१.२.१.५ : अध्यात्माचे ज्ञान आत्मसात करणे

पूर्व वैदिक काळामध्ये अध्यात्मिक ज्ञान आत्मसात करणे हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय असलेले दिसून येते. असे हे ज्ञान शाश्वत सत्याचा म्हणजेच परमात्म्याचा बोध करून देते. परमात्म्याचा बोध झाल्यानंतर मनुष्यप्राण्याची सर्व दुःखापासून आणि त्याचबरोबर जन्म मृत्यूच्या फेऱ्यापासून सुटका मिळण्यास सहाय्य होते. त्यामुळे अध्यात्माचे ज्ञान आत्मसात करण्यास या काळामध्ये भर दिलेला दिसून येतो.

### १.२.१.२.१.६ : चारित्र्य संवर्धन करणे

पूर्व वैदिक काळातील शिक्षण हे गुरूकुलामध्ये गुरूंच्या सान्निध्यात आणि गुरूंच्या देखरेखीखाली होई. गुरूंच्या मार्गदर्शनाखाली शिष्यांना चांगल्या सवयी लावण्यात येत असत. सद्गुण आणि सदाचरण यांचे बीजारोपण हे संस्कारक्षम वयातच करण्यत येत असे. गुरू हे शिष्यांना जीवन व्यवहारांचे ज्ञान, सत्यनिष्ठा, कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा, सेवा, त्याग, विनम्रता यांचे धडे देत असत.

### १.२.१.२.१.७ : सर्वांगीण विकास साधणे

पूर्व वैदिक काळात ऋग्वेद काळातील शिक्षण प्रणालीमध्ये गुरूवर मोठी जबाबदारी असलेली दिसून

येते. गुरू आपल्या ज्ञानाने आणि निःस्वार्थी वृत्तीने शिष्यांसमोर आदर्श ठेवीत असे. गुरूच्या वर्तनाचा आदर्श घेत विद्यार्थी ज्ञानी, स्वाभिमानी व आत्मविश्वासू बनत. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठी आवश्यक असणारे गुण जसे की चारित्र्य, ज्ञानसमृद्धी, विनम्रता, निर्णयक्षमता, आत्मसंयमन, दया, परोपकार कर्तव्यबुद्धी इत्यादी गुणांचा विकास शिष्यांमध्ये गुरूच्या सान्निध्यात राहून होत असे. गुरू यासाठी विद्यार्थ्यांच्या अनेक प्रकारे कसोट्या घेत असे आणि अशा विविध प्रकारच्या अग्निदिव्यातून तावून सुलाखून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होत असे.

### १.२.१.२.१.८ : **संस्कृती संवर्धन आणि संक्रमण करणे** :

वैदिक वाङ्मय हे मौखिक पद्धतीनेच सुरूवातीच्या काळामध्ये जतन करण्यात आले होते. गुरूंच्या सान्निध्यात राहून विद्यार्थी या काळामध्ये मौखिक पद्धतीने शिकवून व पाठांतर करून घेऊन वैदिक ज्ञानाचे जतन आणि संक्रमण करीत असत. संस्कृतीचे जतन आणि वहन करण्याचे शिक्षण हे एक प्रभावी साधन आहे. धर्म आणि संस्कृतीचे संरक्षण हे गुरूकुलामध्ये करण्यात येत असे.

### १.२.१.२.१.९ : **कर्तव्यदक्ष शिष्यांची निर्मिती** :

भावीपिढी कर्तव्य दक्ष बनावी आणि त्याद्वारे मातृऋण, पितृऋण, भातृऋण, समाजऋण फेडावे यासाठी गुरू शिष्यांमध्ये कर्तव्यदक्षतेची जाणीव निर्माण करीत असत आणि त्याद्वारे शिष्य हे आपली कर्तव्ये निष्ठतेने पार पाडीत असत. गुरूकुलामध्ये शिष्यावर समाजात वावरण्यासाठी आवश्यक अशा समाज ऐक्य, समाज संघटन, समाज नेतृत्त्व इ. सामाजिक कर्तव्यांची जाणीव ही शिष्यामध्ये रूजवण्यात येई आणि त्याद्वारे समाजोपयोगी व राष्ट्रप्रेमी भावी पिढी घडविण्यात येई.

### १.२.१.२.१.१० : **शारीरिक विकास** :

पूर्व वैदिक काळातील शिक्षणात शारीरिक विकासाला महत्त्वाचे स्थान होते. गुरूकुलात शरीरसंवर्धन व बलोपासना यास विशेष असे स्थान होते. गुरूकुलात शिष्याला शारीरिक विकासाकरिता विशेष असे प्रशिक्षण देण्यात येत असे. यामध्ये विविध प्रकारचे व्यायाम, मल्लयुद्ध, मुष्ठीयुद्ध अशा प्रकारच्या स्पर्धांची तयारी करून घेण्यात येत होती. ज्ञान साधनेइतकेच शारीरिक संवर्धनावर भर देण्यात येत होता. यासाठी शिष्याला ब्रह्मचर्याचे पालन करावे लागत असे.

अशा प्रकारे आपण पूर्व वैदिक ऋग्वेद कालीन शिक्षणाची ध्येये अभ्यासली आता आपण अशा या ध्येयांच्या पूर्ततेकरिता पूर्व वैदिक काळामध्ये वापरण्यात येणाऱ्या अध्यापन पद्धतीचा अभ्यास करू यात. तत्पूर्वी आपण आत्तापर्यंत अभ्यासलेल्या भागावर आधारित स्वाध्याय सोडवू यात जेणेकरून आतापर्यंत आपण अभ्यासलेल्या बाबी कितपत समजलात हे समजण्यास सहाय्य होईल.

### स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१) वैदिक शिक्षणाचे कालखंड सांगा

२) वेदांची निर्मिती कोणी केली आहे असे मानण्यात येते?

३) वेदांच्या रचनेमधील मुख्य घटक सांगा.

४) पूर्व वेद काळामध्ये कोणता घटक लोकजीवनाचा आधार होता?

५) पूर्व वैदिक काळातील शिक्षणाचे मुख्य ध्येय कोणते होते?

## १.२.१.२.२ : पूर्व वैदिक काळातील अध्यापन पद्धती :

पूर्व वैदिक काळातील धार्मिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाबरोबर व्याकरण, ज्योतिष, छंद, निरूक्त, कल्प इत्यादीचे ज्ञान देण्यात येत असे. याशिवाय तर्कशास्त्र आणि सत्यज्ञान यांचेही शिक्षण शिष्यांना देण्यात येत असे. याबाबींचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येत असे कारण त्याद्वारे शिष्यांचे वेदांचे अध्ययन सुलभ व्हावे आणि त्यांना त्याचा वापर व्यवहारात करता येणे शक्य व्हावे हा असे.

गुरूकुलातील गुरूंना सर्वज्ञ, ज्ञानी, तत्त्ववेत्ता म्हणून संबोधले जात असे. त्यांना ज्ञानयज्ञ चेतविणारा 'अग्निप्रचेता' असेही म्हणण्यात येत असे. गुरूकुलात पठ्ठा, मनन, चिंतन ध्यानधारणा यामध्ये शिष्यांचा बराचसा वेळ सत्कारणी लागत असे. त्यामुळे गुरूकुलात शिष्यांचा सर्वांगसंपन्न व्यक्तिमत्त्व विकास होत असे. सदर सर्वांगीण / सर्वांगसंपन्न व्यक्तिमत्त्व साधण्यासाठी गुरूकुलामध्ये पुढील अध्यापन पद्धतीचा वापर करण्यात येत असे.

### १.२.१.२.१ ज्ञानाचे मौखिक पद्धतीद्वारे हस्तांतरण :

पूर्व वैदिक काळामध्ये अध्यापन हे मौखिक पद्धतीने करण्यात येत असे. ते मानसशास्त्रीय पद्धतीवर आधारित असलेले दिसून येते. गुरू शिष्यांकडून संहितपथ, नादपथ, जपपथ यांचा सराव करून घेत असत. मंत्राचे उच्चारण बिनचूक होण्यावर भर देण्यात येत असे. अशा या अध्ययन प्रक्रियेत पुढील घटकांचा समावेश असलेला दिसून येतो.

गुरूद्वारे मौखिक अध्यापन

शिष्यांद्वारे श्रवण

शिष्य अर्थ समजावून घेत/विचार करत

अचूक पाठांतरावर भर

अध्ययन

आकृती क्र. १.६ पूर्व वैदिक काळातील अध्ययन-अध्यापनात समाविष्ट घटक

### १.२.१.२.२.२ : वादविवाद आणि चर्चा :

पूर्व वैदिक काळामध्ये वादविवाद आणि चर्चा या देखील अध्यापन पद्धतीचा वापर करण्यात येत असे. अनेक बाबींवर गुरुकुलामध्ये गुरू-गुरू, गुरू-शिष्य, शिष्य-शिष्य यांच्यामध्ये वादविवाद घडवून आणण्यात येत असत. अशा प्रकारच्या वादविवादामधून नवीन ज्ञानामध्ये भर पडण्यास सहाय्य होत असे तसेच अशा वादविवाद चर्चेचे निरीक्षण करणाऱ्या शिष्यांना तर्क-विर्तक करणे, आपले म्हणणे मांडणे इ. बाबींचे दिग्दर्शन प्राप्त होत असे.

**१.२.१.२.२.३ : निसर्गाच्या सान्निध्यात प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण :**

पूर्व वैदिक काळातील शिक्षण हे चार भिंतीमध्ये बंदिस्त प्रकारचे नव्हते. गुरूकुलामध्ये शिष्याला प्रत्यक्ष शेती करण्याचे देखील प्रशिक्षण देण्यात येत असे. तसेच पशुपालन करण्याचेदेखील प्रशिक्षण हे शिष्याला देण्यात येत असे. तसेच यांची सांगड ही वेदांशी घालण्यात येत असे. तसेच याची सांगड ही वेदांशी घालण्यात येत असे. वेदांमध्ये रचलेल्या अनेक नैसर्गिक घटनांचे दाखले प्रात्यक्षिकांद्वारे शिष्याला निसर्गाच्या सान्निध्यात प्रत्यक्ष अनुभवातून देण्यात येत असत.

**१.२.१.२.२.४ : पर्यवेक्षित अध्ययन :**

गुरूकुलामध्ये गुरूंच्या अध्यापनानंतर किंवा गुरूंच्या अनुपस्थितीमध्ये गुरूकुलातील वरच्या गटातील शिष्य हे इतर शिष्याच्या अध्ययनाची जबाबदारी पार पाडीत असत. त्यांच्या पर्यवेक्षणाखाली/ देखरेखेखाली इतर शिष्य पाठांतराचा सराव करीत असत.

**१.२.१.२.२.५ : ध्यानधारणा :**

गुरुकुलामध्ये शिष्य हे अध्ययन करण्यासाठी वास्तव्य करीत असत. गुरूच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे अध्ययन चालत असे. अध्ययन करताना शिष्य आपले नियमित व शिस्तबद्ध जीवन बाह्य आकर्षणापासून दूर ठेवीत व आपले संपूर्ण लक्ष परमात्यावर केंद्रित करत असत. त्यामुळे त्यांची ग्रहण क्षमता वाढण्यास सहाय्य होत असे. त्यासाठी ते ध्यानधारणा करीत आणि त्यामुळे मंत्राचा अर्थ जतन करण्याची आणि मंत्रोच्चराची क्षमता विकसित होण्यास सहाय्य होत असे.

अशा या अध्यापन पद्धती पूर्व वेदकाळात गुरूकुलात वापरण्यात येत असत. या अध्यापन पद्धती बरोबरच शिष्यामध्ये एक वेगळीच शिस्त निर्माण करण्यात येत असे. चला तर मग या विद्यार्थी शिस्तीबद्दल आपण माहिती घेऊ यात तत्पूर्वी आता आपण अभ्यासलेल्या पूर्व वैदिक काळातील किती घटकांचे अध्ययन झाले ते स्वयं अध्ययन प्रश्न सोडवून जाणून घेऊयात. चला तर मग -

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** - २

रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) ज्ञानाचे ----पद्धतीद्वारे हस्तांतरण करण्यात येई.

२) गुरुकुलातील निसर्ग सान्निध्यातील प्रत्यक्ष अनुभवाची सांगड ही-----घालण्यात येई.

३) गुरुकुलामध्ये अध्ययन करणाऱ्या शिष्यांची स्मरणक्षमता ही ---मुळे वाढत असे.

४) वादविवाद आणि चर्चेमुळे विद्यार्थ्यांच्यामध्ये ---- ही कौशल्ये विकसित होत असत.

५) गुरूकुलातील विद्यार्थी हे पाठांतराचा सराव हा ----- यांच्या पर्यवेक्षणाखाली करत असत.

तर काय मग विद्यार्थ्यांनो आपले पूर्व वैदिक काळातील प्रचलित अध्यापन पद्धतीचे अध्ययन झालेले आहे हे वरील स्वयं अध्ययन प्रश्न सोडवून स्पष्ट झालेले असेलच. आता आपण पूर्व वैदिक काळातील विद्यार्थी शिस्त याबाबत अभ्यास करू यात चला तर मग....

### १.२.१.२.३ पूर्व वैदिक काळातील शिक्षणामधील विद्यार्थी शिस्त :

प्राचीन भारतीय शिक्षणप्रणालीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शिष्यांना आपल्या घरापासून दूर गुरूगृही जाऊन तेथे वास्तव्य करून शिक्षण पूर्ण करावे लागे. गुरूकुलावर शासन संस्थाचे नियंत्रण किंवा प्रभाव नव्हता. फक्त ब्रह्मचारी विद्यार्थ्यांबाबत गुरुकुलात प्रवेश असे. गुरुंच्या सान्निध्यात राहून गुरुंचा आदर्श घेण्याचा प्रयत्न शिष्य करीत असत.

गुरू शिष्यांना माता-पित्यांच्या भूमिकेतून वागणूक देत असत. गुरूगृही राहून शिष्यांना अनेक कार्ये करावी लागत आणि गुरू शिष्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकास साधावा म्हणून शिष्यासमोर शिस्तीचा आदर्श ठेवत आणि शिष्य अशा स्वयंशिस्तीचे अनुकरण करीत असत. अशा या पूर्व वैदिक/ ऋग्वेद कालीन गुरूकुलामध्ये पुढील प्रकारच्या शिस्तीचे पालन विद्यार्थी करत असत.

#### १.२.१.२.३.१ : कार्याविषयी स्वयंशिस्त :

शिष्य स्वतःहूनच अनेक प्रकारच्या शिस्तीचे पालन करीत असत. जसे की प्रातःकाली उठणे, नित्यशौच, मुखमार्जन करणे, यज्ञ/अग्निपूजा करणे, माधुकरी मागणे, गुरूसेवा करणे. सकाळ-संध्याकाळ सूर्योपासना करणे, शेतावर जाऊन काम करणे, गोधन राखणे, लाकडे आणणे इत्यादी कर्तव्ये स्वयंशिस्तीने शिष्य पार पाडीत असे.

#### १.२.१.२.३.२ : वर्तनविषयक स्वयंशिस्त :

मांस भक्षण न करणे, सुवासित अत्तरे न लावणे, राग, लोभ, बडबड, नर्तन इ. बाबी वर्ज्य करणे, गुरूंच्या समोर भिंतीला टेकून न बसणे, पाय लांब करून न बसणे, खोटे न बोलणे, प्राणिमात्राला दुखापत न करणे, जुगार न खेळणे, मद्यपान न करणे, स्त्रियांकडे टक लावून न पहाणे, त्यांना स्पर्श न करणे या गोष्टी शिष्यांना बंधनकारक होत्या. तसेच गुरूकुलाच्या आचारसंहितेप्रमाणे शिष्याला वस्त्रे धारण करावी लागत असत.

अशा प्रकारे विद्यार्थी मित्रांनो आपण पूर्व वैदिक काळातील शिक्षणामधील विद्यार्थी शिस्त अभ्यासलेली आहे. आता स्वयं अध्ययन प्रश्न सोडवून सदर घटकाबद्दल आपण किती माहिती आत्मसात केली आहे ते जाणून घेऊयात.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न -३**

१) गुरुकुलावर पूर्णपणे कोणाचे नियंत्रण असे?

२) गुरुकुलामध्ये कोणत्या पद्धतीची शिस्त असे?

३) गुरुकुलातील शिस्तीचे वर्गीकरण कोणत्या प्रकारात करण्यात येत असे?

४) कार्याविषयी स्वयंशिस्तीमध्ये कोणत्या बाबींचा समावेश होत असे?

५) वर्तनविषयक स्वयंशिस्तीमध्ये कोणती बाब महत्त्वाची असे हे दिसून येते?

अशा प्रकारे आपण पूर्व वैदिक काळातील शिक्षणामधील विद्यार्थी शिस्त विषयक माहितीचा अभ्यास

केला आहे. आता आपण वैदिक काळातील शिक्षक भूमिका अभ्यासूयात.

## १.२.१.२.४ पूर्व वैदिक काळातील शिक्षक भूमिका :


आपल्या सर्वांना माहित आहे की शिक्षण प्रणाली ही तीन घटकांवर आधारित आहे जसे की,

१. शिक्षक (गुरू)

२. विद्यार्थी (शिष्य)

३. ज्ञान

यावरील तीन घटकांपैकी 'ज्ञान' हा असा घटक आहे जो गुरू आणि शिष्य यांच्यामध्ये एक प्रकार पूल बांधणीचे काम करीत असतो. असे हे पूल बांधणीचे कार्य करताना गुरूला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात आणि याला पूर्व वैदिक/ऋग्वेद काळातील शिक्षक हा अपवाद नव्हता. अशा या पूर्व वैदिक काळातील शिक्षकाच्या भूमिका पुढीलप्रमाणे




आकृती क्र. [illegible]प्रमाणे पूर्व वैदिक काळातील शिक्षक भूमिकाबद्दल आता आपण चर्चा करू यात.

आकृती क्र. १.७ पूर्व वैदिक काळातील शिक्षक भूमिका

**१.२.१.२.४.१ : माता पित्याच्या भूमिकेत शिष्यावर धर्म आणि संस्कृतीचे संस्कार करणे :**

पूर्व वैदिक काळामध्ये उपनयन संस्कारानंतर शिष्य ज्ञानार्जनासाठी गुरुगृही येत असे. आणि गुरुंच्या आश्रमात म्हणजेच गुरुकुलात असे. गुरुकुलाचे स्वतंत्र अस्तित्त्व असे. गुरुकुल पूर्णपणे गुरुच्या शासनामध्ये चालत असत. साधारणपणे एका गुरुकुलामध्ये अंदाजे १५ ते २० शिष्य असत. ज्ञान आणि अध्यात्म याबाबतीत गुरु हे श्रेष्ठ असत. गुरुकुलामध्ये अध्ययन करणाऱ्या शिष्यांवर गुरु हे आपल्या पुत्रवत् प्रेम करत माता पित्याच्या भूमिकेतून शिष्यावर धर्म आणि संस्कृतीचे संस्कार गुरु करत असत.

**१.२.१.२.४.२ : व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी गुरू म्हणून आदर्श निर्माण करणे**

शिष्याच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा म्हणून गुरु हा आपल्या दिनचर्येतून, बोलण्या-वागण्यातून शिष्यासमोर आदर्श ठेवीत असे अशा अनेक आदर्शांच्या निरीक्षणातून आणि त्याच्या अनुकरणातून शिष्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास गुरू साधत असत.

**१.२.१.२.४.३ : शिष्यांची वडीलधाऱ्या बंधूभावातून देखभाल :**

शिष्यांना अध्यात्मिक ज्ञान देऊन त्याचा अज्ञानरूपी अंधकार नष्ट करण्याची जबाबदारी गुरू पार पाडीत असत. यासाठी गुरू काही वेळा वडील बंधूच्या नात्याने आज्ञा देऊन शिक्षा करून तर काही वेळा वडील-भगिनी नात्याने गोड बोलून विद्यार्थ्यांच्या वर्तनाला वळण लावत असत आणि शिष्याची देखभाल करीत असत.

**१.२.१.२.४.४ : ज्ञान साधकाची भूमिका :**

पूर्व वैदिक काळामध्ये लिखित साहित्याचा अभाव होता अशा काळामध्ये गुरु धर्म, संस्कृती यांची जोपासना करून त्या ज्ञानाचा प्रसार जगभर करण्याचे कार्य करीत असत. तसेच निःस्वार्थ बुद्धीने ज्ञानसाधना करून ज्ञानात सतत भर घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला आणि अशा प्रकारे ज्ञान साधकाची भूमिका पार पाडून ते लोकाच्या आदरास पात्र ठरले.

अशा प्रकारे पूर्व वैदिक काळातील शिक्षणाची उद्दिष्टे /ध्येये अध्यापन पद्धती, विद्यार्थी शिस्त आणि शिक्षक भूमिका इत्यादीचा आपण अभ्यास केला आहे. आता आपण उत्तर वैदिक काळातील शिक्षणाची उद्दिष्टे/ ध्येये, अध्यापन पद्धती, विद्यार्थी शिस्त आणि शिक्षक भूमिका यांचा अभ्यास करूयात.

तत्पूर्वी आपण आत्ताच अभ्यासलेल्या पूर्व वैदिक काळातील शिक्षक भूमिका याबाबत आपले किती अध्ययन झाले ते जाणून घेऊ यात स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न सोडवून.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न -४**

१) गुरू आणि शिष्यामध्ये पूल बांधणीचे काम-------या घटकाद्वारे होत असे.

२) गुरू हे ----- भूमिकेतून शिष्यावर धर्म आणि संस्कृतीचे संस्कार करीत असत.

३) शिष्याची देखभाल गुरू हे----- भूमिकेतून करत असत.

४) स्वतः सातत्याने ज्ञान साधना करून ---- भूमिका गुरू पार पाडीत आणि विद्यार्थ्यासमोर आदर्श ठेवीत असत.

५) गुरू हे ----- बुद्धिने ज्ञान साधना करीत असत.

तर अशा प्रकारे आपण पूर्व वैदिक काळातील शिक्षण भूमिकाबद्दल माहिती घेतली आहे. आता आपण उत्तर वैदिक काळातील शिक्षणाची माहिती घेऊयात.....

## १.२.१.३ उत्तर वैदिक शिक्षण/ ब्राह्मण काळातील शिक्षण

पूर्व वैदिक/ ऋग्वेद काळानंतरच्या वैदिक काळाला उत्तर वैदिक काळ किंवा ब्राह्मण काळ असे म्हणतात. या काळात धर्माशी संबंधी कर्मकांडाला प्राधान्य देण्यात येवू लागले. त्यामुळेच साहजिकच धार्मिक विधी करणारा वर्ग म्हणून ब्राह्मणवर्गाचे वर्चस्व या काळात वाढलेले दिसते. त्यामुळेच या काळाला उत्तर वैदिक काळाबरोबर ब्राह्मण काळ म्हणून देखील ओळखण्यात येऊ लागले. सदर कालखंड हा इ.स. पूर्व १४०० ते इ.स. पूर्व ६०० इतका असावा असे समजण्यात येते. याबाबतीतही विद्वानांमध्ये एकमत असलेले दिसून येत नाही. याकाळाच्या दरम्यान आर्यांच्या सामाजिक व राजकीय प्रणालीमध्ये बदल झालेले दिसून येतात. त्यांची सत्ता पूर्वेकडे गंगा यमुना नद्यांच्या खोऱ्यांपर्यंत पोहोचलेली दिसून येते.


पूर्व वैदिक काळातील सामाजिक स्थितीपेक्षा उत्तर वैदिक काळातील सामाजिक स्थिती ही काही प्रमाणात बदलेली दिसून येते. व्यवसायावर आधारलेली वर्णव्यवस्था ही जातिव्यवस्थेत रूपांतरित झाली कर्मकांडाचे स्तोम माजले त्यामुळे ब्राह्मणवर्गाची मक्तेदारी निर्माण झाली. त्याचा परिणाम हा उत्तर वैदिक शिक्षण/ ब्राह्मण काळातील सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि याचबरोबर शैक्षणिक बाबींबर सुद्धा झालेला दिसून येतो.

अशा या उत्तर वैदिक/ब्राह्मण काळातील शिक्षणाची उद्दिष्टे, अध्यापन पद्धती, विद्यार्थी शिस्त आणि शिक्षक भूमिका याबद्दलची सविस्तर माहिती घेऊयात.

### १.२.१.३.१ : उत्तर वैदिक/ब्राह्मण काळातील शिक्षण :

याकाळातील शिक्षणाची ध्येये पुढीलप्रमाणे :

ब्राह्मण काळातील शिक्षणाची ध्येये पूर्व वैदिक काळातील शिक्षणाच्या ध्येयाप्रमाणेच असलेली दिसून येतात. 'ज्ञानप्राप्तीस' विशेष महत्त्व असलेले दिसून येते. तसेच शिक्षणाचे ध्येय हे प्रामुख्याने शिष्याचा सर्वांगीण विकास करणे हेच असलेले दिसून येते. पूर्व वैदिक काळात धार्मिक शिक्षणाला प्राधान्य होते, तर ब्राह्मण काळातील शिक्षण वैश्विक दृष्टिकोनातून दिले जात होते. ब्राह्मण काळातील शिक्षणाची ध्येये आकृती क्र. मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिसून येतात.




आकृती क्र. १.८ उत्तर वैदिक / ब्राह्मण काळातील शिक्षण

ही सर्व ध्येये साध्य करण्याकरिता वेदांच्या संहिता, ब्राह्मणग्रंथ, अरण्यके आणि उपनिषदे, तसेच वेदवाङ्मय, महाकाव्ये यांच्या अभ्यासातून तसेच गुरुकुलातील गुरूंच्या सान्निध्यातून व शिकवणुकीतून ब्राह्मण काळातील शिक्षणाची ध्येये साध्य करण्याचा प्रयत्न केला जात असे.

गुरू पाठांतराच्या माध्यमातून वेदांचे अध्ययन शिष्याकडून करून घेत असत. गुरू शिष्यांवर संस्कार करीत असत त्यामुळे शिष्याच्या चारित्र्याची जडणघडण ही गुरुकुलातच होत असे. गुरुकुलातील जीवन हे व्यक्तिगत विकासाला पोषक असे. आश्रम सेवा, शरीरश्रम, आज्ञाधारकपणा, सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, आत्मसंयमन हे गुण विकसित व्हावेत म्हणून गुरू विशेष लक्ष देत असत. गुरुकुलात चिंतन, मनन, ध्यानधारणा यांना महत्त्व असल्याने ज्ञानप्राप्तीबरोबरच शरीर व मन निरोगी ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न हा करण्यात येत असे. त्याचबरोबर शिष्यांना सामाजिक व राष्ट्रीय जबाबदारी पार पाडण्याचे प्रशिक्षण देखील गुरुकुलात मिळत असे.

अशा प्रकारे ब्राह्मण काळातील शिक्षणाची ध्येये ही शिष्यांचा सर्वांगीण विकास साधणारी होती. असे दिसून येते.

**१.२.१.३.२ : अध्यापन पद्धती :**

उत्तर वैदिक काळातील/ ब्राह्मण काळातील अध्यापन पद्धती पुढीलप्रमाणे

**१.२.१.३.२.१ : मौखिक पद्धतीने अध्यापन :**

पूर्व वैदिक/ ऋग्वेद काळातील किंवा ब्राह्मण काळातील अध्यापन हे ब्राह्मण काळातदेखील प्रचलित होते. वेदमंत्राचे व्यापक ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करण्यात या पद्धतीचा वापर करण्यात येत असे. मंत्रोच्चारातील अचूकपणावर भर असे. मंत्रांचा अभ्यास करताना गुरू शिष्यांना त्याचा अर्थदेखील समजावून

सांगत असत. त्यामुळे मंत्राचा अर्थ जाणून घेऊन पाठांतर करणे सोपे होत असे. वेदांव्यतिरिक्त शिष्य सूक्तांचा अभ्यास करीत असत.

### १.२.१.३.२.२ : चर्चा पद्धती/ वादविवाद पद्धती :

उत्तर वैदिक काळामध्ये/ ब्राह्मण काळामध्ये शिष्यांना प्रामुख्याने व्याकरण, न्यायशास्त्र, स्मृती, ज्योतिष इ. बाबींचे अध्यापन करण्यात येत असे. सदर विषय श्लोकस्वरूपात असत. सदर श्लोक ध्यान-धारणा, चिंतन-मनन करून स्मृतीमध्ये ठेवण्यात येत असत. त्याचबरोबर प्राप्त ज्ञानावर आधारित चर्चा अथवा वादविवाद देखील घडवून आणण्यात येत असत. जेणेकरून शिष्यांमध्ये स्वतःचे म्हणणे मांडणे, त्याचे समर्थन करणे याचसारखी कौशल्ये विकसनाची आणि दिग्दर्शनाची संधी प्राप्त होत असे.

### १.२.१.३.२.३ : वैयक्तिक अनुदेशन :

उत्तर वैदिक/ब्राह्मण काळामध्ये शिक्षणातील व्यक्तिगत अनुदेशन पद्धतीचा वापर करण्यात येत होता असे दिसून येते. शिष्यांशी विविध विषयावर गुरू चर्चा करीत असत. शिष्य आपल्या शंका गुरूंना विचारीत. व्यक्तिगत मार्गदर्शन ही एक प्रभावी अध्यापनी पद्धती वापरात असलेली दिसून येते. अशा प्रकारे गुरूंच्या निगराणीखाली विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असताना दिसून येतो. तसेच व्यक्तिमत्त्व विकासासाठी वैयक्तिक अनुदेशन पद्धती उपयुक्त असताना दिसून येते.

अशा प्रकारे आपण उत्तर वैदिक म्हणजेच ब्राह्मण काळाची व या काळामध्ये अध्यापनासाठी वापरण्यात येणाऱ्या अध्यापन पद्धतीचा अभ्यास केला आहेत. आता आपण यावर आधारित स्वयं अध्ययन प्रश्न सोडवून आपले स्वयं-मूल्यमापन करूयात.

### स्वयंअध्ययनासाठी प्रश्न -५

१) वेदांव्यतिरिक्त उत्तर वैदिक काळातील विद्यार्थी/शिष्य कशाचा अभ्यास करीत असत?

२) उत्तर वैदिक काळामध्ये समाजात कोणत्या बाबीला महत्त्व देण्यात येत असे?

३) उत्तर वैदिक काळातील शिक्षण कोणत्या दृष्टिकोनातून दिले जात असे?

४) उत्तर वैदिक काळातील शिक्षणाचे मुख्य ध्येय कोणते होते?

५) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास उत्तर वैदिक काळामध्ये कोणती अध्यापन पद्धती उपयुक्त होती?

अशा प्रकारे उत्तर वैदिक काळात/ब्राह्मण काळात विविध अध्यापन पद्धती वापरण्यात येत असत. या काळामध्ये गुरूच्या आश्रमात म्हणजेच गुरूकुलात राहून शिष्य अध्ययन करत असत. त्याबरोबर हे शिष्य गुरूकुलात अध्ययन करताना स्वतःमध्ये स्वयं शिस्त अंगी बानवत असत. चला तर मग अशा विद्यार्थी शिस्तीबाबत अध्ययन करूयात.

### १.२.१.३.३ : उत्तर वैदिक /ब्राह्मण काळातील विद्यार्थी शिस्त :

उत्तर वैदिक/ ब्राह्मण काळातील शिष्य गुरूच्या घरी म्हणजे गुरूकुलात राहत असे. गुरूकुलातील (सहाध्यायी) गुरूबंधूच्या बरोबर एकत्रित राहत असे आणि विविध उपयुक्त शास्त्रांची ज्ञान प्राप्ती ही आंतरिक

शिस्त पाळून करीत असे. गुरूकुलामध्ये शिस्त ही कडक असे. गुरू शिष्यांमध्ये एक प्रकारचे अध्यात्मिक नाते होते. त्याचे प्रतिबिंब हे शिष्यांच्या जीवन व्यवहारातील कृतीमध्ये दिसत असे. चारित्र्य संवर्धनामध्ये त्याची नितांत गरज असलेली दिसून येते.


गुरुकुलामध्ये शिष्यांना लवकर उठणे व लवकर झोपी जाणे, ऐषोरामापासून दूर राहणे, इंद्रिय निग्रह करणे, ब्रह्मचर्या पालन करणे, आश्रमातील / गुरूकुलातील छोटी-मोठी कामे करणे. उदा. गाई चारणे, माधुकरी मागणे, लाकडे गोळा करणे इ. कामे शिष्यांना करावी लागत असत. तसेच गुरूकुलामध्ये सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना सारख्या पद्धतीची वागणूक मिळत असे.

अशा प्रकारे उत्तर वैदिक/ ब्राह्मण काळातील विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थी शिस्त असलेली दिसून येते. हा विद्यार्थी म्हणजेच शिष्य स्वयं शिस्तीबरोबरच गुरूंची देखील शिष्य व्यक्तिमत्त्व विकासामध्ये महत्त्वाची भूमिका असे. चला तर मग आपण उत्तर वैदिक काळातील/ ब्राह्मण काळातील गुरूंची भूमिका अभ्यासू.

**१.२.१.३.४ उत्तर वैदिक/ ब्राह्मण काळातील शिक्षक भूमिका :**

उत्तर वैदिक / ब्राह्मण काळातील शिक्षकाची भूमिका ही पूर्व वैदिक किंवा ऋग्वेद कालीन गुरूप्रमाणेच असलेली दिसून येते. गुरूंचे संबंध हे शिष्याबरोबर पिता-पुत्राप्रमाणेच असत. शिष्याचे व्यक्तिमत्त्व हे विकसित व्हावे याकरिता गुरू शिष्यांसमोर आदर्श निर्माण करीत असत. शिष्य हा गुरूंच्या सान्निध्यात १२ वर्षे राहत असे. त्यामुळे गुरू शिष्य संबंध हे घनिष्ठ स्वरूपाचे असलेले दिसून येते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शिष्याला गुरूदक्षिणा द्यावी लागत असे आणि त्यानंतर शिष्याला स्वगृही जाण्याची अनुमती गुरू देत असत.

याचबरोबर गुरू हे मार्गदर्शकाची व समुपदेशकाची ही भूमिका पार पाडताना दिसत असत. गुरू हे पुढीलप्रमाणे शिष्यास मार्गदर्शन व समुपदेशन करीत असत.




आकृती क्र. १.९ मार्गदर्शन व समुपदेशन

अशा प्रकारे उत्तर वैदिक/ब्राह्मण काळातील गुरू एक शिक्षक म्हणून भूमिका पार पडताना दिसतात. थोडक्यात या भूमिकांचा आढावा आता आपण आकृती क्र. १.१० यामध्ये दर्शविल्याप्रमाणे घेऊयात.

माता-पित्यांची भूमिका

↑

मूल्यमापकाची भूमिका ← उत्तर वैदिक काळ/ब्राह्मण काळातील शिक्षक भूमिका → मार्गदर्शकाची भूमिका

↓

समुपदेशकाची भूमिका

आकृती क्र. १.१० उत्तर वैदिक काळ/ब्राह्मण काळातील गुरू/शिक्षक भूमिका

अशा प्रकारे आपण उत्तर वैदिक काळ/ ब्राह्मण काळातील गुरू/ शिक्षक भूमिकांचा अभ्यास केला आहे. त्याबाबतीतील काही प्रश्न सोडवून स्वयं मूल्यमापन करूयात....

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - ६**

१) आंतरिक शिस्त पासून शिष्य हे------ची प्राप्ती करीत असत.

२) गुरूकुलामध्ये विविध वर्गवारीतील शिष्यांना-----प्रकारची वागणूक मिळत असे.

३) शिष्य हा गुरूंच्या सान्निध्यात ---- वर्षे राहत असे.

४) गुरूंचे संबंध शिष्याबरोबर------- प्रमाणे असत.

५) शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शिष्याला गुरूस---------द्यावे लागत असे.

अशा प्रकारे विद्यार्थी मित्रांनो आपण घटक क्रमांक १ वैदिक काळातील शिक्षण, वैदिक काळातील शिक्षणाचे कालखंड-पूर्व वैदिक कालखंड व उत्तर वैदिक काळातील शिक्षणाची ध्येये, अध्यापन पद्धती, विद्यार्थी शिस्त आणि शिक्षक भूमिका जाणून घेतल्या आहेत.

## १.३ सारांश :

वेद कालखंडाच्या शिक्षणाचे दोन महत्त्वाचे कालखंड पडलेले दिसून येतात ते म्हणजे पूर्व वैदिक/ऋग्वेद कालीन कालखंड आणि उत्तर वैदिक कालखंड होय. पूर्व वैदिक कालखंडामध्ये मौखिक पद्धतीद्वारे वेदांच्या अध्यापनास स्थान होते तर मोक्ष प्राप्ती हा शिक्षणाचा मुख्य हेतू असे. विद्यार्थी स्वयंशिस्त अंगी बाणवत असत. तर गुरू शिष्यांचे माता-पित्याप्रमाणे पालन करीत असत.

उत्तर वैदिक कालखंडात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी प्रामख्याने व्यक्तिगत

अनुदेशनाचा गुरू वापर करीत असत. धार्मिक कर्मकांडाचे प्रशिक्षण गुरूकुलात देण्यात येत असे. गुरू हे मार्गदर्शक - समुपदेशकाची भूमिका शिष्यांच्या शिक्षण कालावधीमध्ये अंगीकारत असत.

## १.४ स्मरणात ठेवायच्या संकल्पना :

१) **वेद** : वेद हा शब्द संस्कृत 'विद्' या धातूपासून निर्माण झाला असून त्याचा अर्थ 'कळणे' किंवा 'जाणणे' होय.

२) **ऋग्वेद** : मुख्यतः इंद्र, वरूण, सोम इ. स्तुतीपर ऋचा/ पूजा याचा अणि ज्ञान, भक्ती, अर्थशास्त्र, नीतीशास्त्र, आयुर्वेद इ. विषयांचा समावेश.

३) **यजुर्वेद** : यज्ञयागांची पद्धत व घ्यावयाच्या बळी यासंबंधीची सूचना व मार्गदर्शनाचा समावेश.

४) **सामवेद** : 'सा' म्हणजे ऋचा व 'अम' म्हणजे गांधारादी सप्त स्वर ऋचेचे सप्त स्वर ऋचेचे सप्त स्वरयुक्त गान म्हणजे 'साम'

५) **अथर्ववेद** : या वेदांत यंत्र, तंत्र व मंत्र यांचा ऊहापोह आहे. यंत्र म्हणजे मानवी शरीर, मंत्र म्हणजे फॉर्म्युला व तंत्र म्हणजे मानवी शरीरावर मंत्र वापरण्याची रीत वा पद्धती.

६) **सूक्त** : श्लोक म्हणजेच साम आणि गद्य/ यजुश ऋचा यांची सुंदर अभिव्यक्ती म्हणजे सुक्त होय.

७) **मोक्ष प्राप्ती** : जन्म - मृत्यू फेऱ्यातून मुक्ती म्हणजे मोक्ष प्राप्ती होय.

८) **आत्मसाक्षात्कार** : म्हणजे मी कोण आहे? माझ्या जीवनाची कर्तव्ये कोणती आहेत? मला कोठे जायचे आहे? याचे ज्ञान होणे होय.

९) **पूर्व वैदिक काल** : वेद काळातील सुरूवातीच्या काळास पूर्व वैदिक किंवा ऋग्वेद काल असे म्हणतात.

१०) **उत्तर वैदिक काल** : वेद काळातील पूर्व वैदिक काळानंतरच्या काळास तसेच धर्माशी संबंधी कर्मकांडास महत्त्व देण्यात येणाऱ्या कालास उत्तर वैदिक काळ किंवा ब्राह्मण काळ असे म्हणतात.

## १.५ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**उत्तरे -** १) वैदिक शिक्षणाचे कालखंड दोन - पूर्व वैदिक कालखंड व उत्तर वैदिक कालखंड

२) वेदांची निर्मिती रचनेमधील मुख्य घटक म्हणजे 1) श्लोक, 2) गद्य

३) पूर्व वेद काळामध्ये धर्म हा लोकजीवनाचा आधार होता.

४) पूर्व वेद काळामध्ये धर्म हा लोकजीवनाचा आधार होता.

५) पूर्व वैदिक काळातील शिक्षणाचे मुख्य ध्येय म्हणजे मोक्ष प्राप्ती होय.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**उत्तरे –** १) मौखिक

२) वेदांमधील दाखल्यांशी

३) ध्यानधारणे

४) तर्क वितर्क करणे आणि आपले म्हणणे मांडणे

५) वरिष्ठ गटातील शिष्यांच्या

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**उत्तरे –** १) गुरूकुलावर गुरूंचे नियंत्रण असे.

२) स्वयंशिस्त

३) कार्याविषयी स्वयंशिस्त, वर्तनविषयक स्वयंशिस्त

४) नैमित्तिक कार्ये, गुरूविषयी कर्तव्ये, गुरूकुलाविषयक कर्तव्ये इ.

५) इंद्रियनिग्रह

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

**उत्तरे –** १) ज्ञान

२) माता–पिता

३) वडीलधाऱ्या बंधूभावातून

४) साधकाची

५) निःस्वार्थ

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ५**

**उत्तरे –** १) सूक्तांचा

२) धर्माशी संबंधी कर्मकाडांस

३) वैश्विक

४) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

५) वैयक्तिक अनुदेशन

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ६**

**उत्तरे –** १) ज्ञानाची

२) समान

३) बारा

४) माता-पित्याप्रमाणे

५) गुरूदक्षिणा

## १.६ स्वाध्याय/अधिक सरावासाठी प्रश्न

१) पूर्व वैदिक/ ऋग्वेद काळातील शिक्षणाची ध्येये स्पष्ट करा.

२) पूर्व वैदिक / ऋग्वेद काळातील अध्यापन पद्धती स्पष्ट करा.

३) पूर्व वैदिक काळातील विद्यार्थी शिस्त आणि शिक्षक भूमिकेची चर्चा करा.

४) उत्तर वैदिक / ब्राह्मण काळातील शिक्षणाची ध्येये व अध्यापन पद्धती स्पष्ट करा.

५) उत्तर वैदिक काळातील विद्यार्थी शिस्त व शिक्षक भूमिका स्पष्ट करा.

## १.७ पुढील अध्ययनासाठी संदर्भ / साहित्य


- करंदीकर सुरेश मंगरूळकर मीना (२००९), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, कोल्हापूर : फडके प्रकाशन.
- गद्रे गीता व गद्रे ल. रा. (१९७७). शिक्षणाचा इतिहास भाग १, २, ३ पुणे : व्हीनस प्रकाशन
- जाधव, भोसले, सरपोतदार (२०१०). भारतीय शिक्षणाचा विकास, कोल्हापूर : फडके प्रकाशन.
- देशमुख एल. जी. (२००३), भारतातील शिक्षणाचा विकास, कोल्हापूर : फडके प्रकाशन.
- पारसनीस न. रा. (२००८), शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.
- Shwain, Snehalata (2016)] Educational Elements and Veda. Unpulished Ph.D. Thesis, Submitted to Sri Chandrashekharendra Saraswati Viswa Mahavidyalaya. Retrived from http://hd1.handle.net/10603/183964


❖❖❖

## घटक – २

# बौद्ध काळातील शिक्षण

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

- २.२.१ बौद्ध धर्माच्या उदयाची कारणे.
- २.२.२ बौद्ध धर्माची शिकवण
- २.२.३ बौद्धकालीन शिक्षणाची उद्दिष्टे
- २.२.४ बुद्धकालीन शिक्षणाची वैशिष्टे
- २.२.५ बौद्धकालीन शिक्षणाची ध्येये
- २.२.६ बौद्धकालीन अभ्यासक्रम
- २.२.७ बौद्धकालीन शिक्षणातील अध्यापन पद्धती
- २.२.८ बौद्धकालीन विद्यार्थी जीवन
- २.२.९ बौद्धकालीन शिक्षकाची भूमिका
- २.२.१० बौद्धकालीन स्त्री शिक्षण
- २.२.११ बौद्धकालीन शिक्षणाची बलस्थाने/ गुण
- २.२.१२ बौद्धशिक्षणातील उणीवा
- ४.२.१३ अनुदानाबाबतीतील शिफारशी

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्टे :

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला.

- बौद्ध धर्म उदयाची कारणे सांगता येतील.
- बौद्ध धर्माची शिकवण, शिक्षणाची उद्दिष्टे, वैशिष्टे, धेये व अभ्यासक्रमाची माहिती सांगता येईल.
- बौद्धकालीन अध्यापन पद्धती व शिक्षकाची भूमिका स्पष्ट करता येईल.
- बौद्धकालीन विद्यार्थी जीवन व विद्यार्थ्यांची भूमिका सांगता येईल.
- बौद्धकालीन शिक्षणाचे गुण व दोष स्पष्ट होतील.

## १.१ प्रास्ताविक :

वैदिक कालखंडानंतरचा काळ म्हणजे बौद्ध कालखंड होय. साधारणपणे इ.स. पूर्व ६०० ते ९०० असा हा कालखंड बौद्धकालीन मानला जातो. वैदिक कालखंडाच्या शेवटाच्या कालखंडात, यज्ञयाग, कर्मकांडाचा अतिरेक, सर्वसामान्यांना न समजणारे तत्त्वज्ञान, पशुबळी, धार्मिक विधींचा अतिरेक या सर्वांना सामान्य जनता कंटाळली होती. चार्तुवर्ण व्यवस्था त्यामुळे जातिभेद, वर्णव्यवस्थेचा लोकांना उबग आला होता. या काळात देश अत्यंत अशांत व अस्वस्थ होता. लहान लहान राज्ये, गणसंस्था यामुळे सार्वभौम सत्तेचा अभाव यामुळे राज्याराज्यात सतत असणारे कलह, संघर्ष, युद्धे, कारस्थाने यांना जनता कंटाळलेली होती. एकंदरीतच सर्वत्र राजसंस्था व धर्मसंस्था यामध्ये सुधारणेची गरज होती. नितीमुल्यापेक्षा कर्मकांडाना अत्यंत महत्त्व प्राप्त झाले होते. याच काळात इ.स. पूर्व ५६३ मध्ये सिद्धार्थचा जन्म झाला. ज्याने प्राप्त परिस्थितीचा अभ्यास करून स्वतः धर्माचा शोध घेण्याचा अविरत प्रयत्न केला व निर्वाण प्राप्ती करून घेतली. याच धर्माला बौद्ध धर्म असे म्हंटले जाते.

शांततेचा, अहिंसेचा पुरस्कार करणारा, तसेच जगाला शुद्ध स्वरूपातील मुर्तीपूजा व कर्मकांडाशिवाय धर्म जगाला देण्याचे कार्य सिद्धार्थांनी केले. यानंतर त्यांना गौतम बुद्ध म्हणून ओळखले जावू लागले. अशा परिस्थितीत देश विदेशात या धर्माचा स्विकार केला गेला.

## २.२ विषय विवेचन

बौद्ध धर्माला अनेक ठिकाणी राजाश्रय मिळाला. भारतामध्ये सम्राट अशोकाने बौद्ध धर्माचा स्विकार व प्रसार केला. बौद्ध भिक्षूंनी भारताबाहेरच्या या धर्माचा स्विकार केला. शास्त्रीय पायाभूत सिद्धांताच्या आधारे साधनाशिवाय विपश्यनेच्या मार्गातून बुद्धांनी शांती व अहिंसेसारख्या तत्त्वांनी सामान्य माणसाला धर्मरत्न प्राप्त करून दिले. या धर्मामुळे शिक्षणव्यवस्थेवरसुद्धा परिणाम झाला. बौद्ध धर्माच्या उदयाची कारणे पुढील मुद्यातून स्पष्ट होतील.

### २.२.१ बौद्ध धर्माच्या उदयाची कारणे :

१) हिंदू धर्मातील वाढती कर्मकांडे.

२) धार्मिक रूढी व परंपरा यांचा अतिरेक.

३) कल्पनेच्या व अशक्यप्राय वाटणाऱ्या साधनपद्धती.

४) वर्णव्यवस्था व जातिभेदांचा अतिरेक.

५) पुरोहित वर्गाची मक्तेदारी व एकाधिकारशाही.

६) हिंसेचा अतिरेक उदा. पशुबळी, क्वचित नरबळीसुद्धा

७) यज्ञयाग, अनुष्ठाने, अत्यंत दुर्बोध व कठीण धर्मभाषा

८) धर्मसंस्थेकडून सामान्य जनतेचे शोषण.

वरील कारणामुळे सामान्य जनतेला धर्म दुर्बोध व कठीण वाटत होता. या काळातच बौद्ध धर्माचा उदय झाला.

## २.२.२ बौद्ध धर्माची शिकवण

सामान्यांना सुबोध व पालनासाठी सहज वाटणारा बौद्ध धर्माची शिकवण अत्यंत सोपी आहे. मानवसमाजाच्या 'दुःख' मुक्तीसाठी पुढील चार आर्यसत्ये बुद्ध सांगतात.

**आर्यसत्ये :**

**१) दुःखे :**

मानवी जीवनात जशा, व्याधी, मृत्यू आहेत. या जगामध्ये प्रत्येक जीवाला दुःख भोगावे लागते. अप्रिय वस्तूचा व प्रिय वस्तूचा वियोग यामुळे दुःख होते. त्या दुःखाचे कारण म्हणजे तृष्णा होय.

**२) दुःख समृद्ध :**

दुःखाचे मुळ कारण तृष्णा आहे. आसक्तीमुळे दुःख निर्माण होते. आसक्ती/ तृष्णा ही आनंदप्राप्तीसाठी असते.

**३) दुःख निरोध :**

यासाठी तृष्णा बाजूला ठेवली पाहिजे. तृष्णेचा नाश म्हणजे विरक्ती होय. कोणत्याही परिस्थितीत समत्त्वबुद्धी ठेवणे हे वासनेवर विजय मिळवून देते.

**४) दुःख निरोधगामिनी प्रतिपद :**

हे चौथे आर्यसत्य होय. यालाच बुद्धांचा अष्टांग मार्ग असे म्हणतात. तो थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल.

दुःखाचा नाश करण्यासाठी बुद्धांनी पुढील अष्टांग मार्गाचा उपदेश केला.

**अष्टांग मार्ग**

**१) सम्यक दृष्टी**

वरील चारही आर्यसत्ये यांचे ज्ञान यामध्ये अपेक्षित आहे. दुःख आहे, त्याचे कारण आहे. दुःखाचे कारण नष्ट करणारा मार्गदेखील आहे. याचे ज्ञान असले पाहिजे. त्यासाठी जीवनाकडे पाहण्याची सम्यक दृष्टी (साक्षीभाव असला पाहिजे.

**२) सम्यक संकल्प :**

सम्यक दृष्टीनुसार जीवनातील दुःख नाशासाठी दृढ संकल्प असणे आवश्यक आहे.

**३) सम्यक वाणी :**

वाणी सम्यक म्हणजे सत्य बोलणारी, प्रिय बोलणारी, अहिंसक असावी.

**४) सम्यक कर्म :**

मनुष्याने पंचशीलानुसार कर्म करावे.

**५) सम्यक अर्जन/ आजीविका :**

सत्याच्या मार्गाला अनुसरून आपली आजीविका निवडून स्वतःचे जीवन जगावे.

**६) सम्यक प्रयत्न :**

मोक्ष प्राप्तीसाठी निष्ठेने योग्य मार्गाने प्रयत्न करावेत.

**७) सम्यक स्मृती :**

तृष्णा निर्माण होणार नाही याची आठवण ठेऊन समत्त्व / साक्षी भावनेने आयुष्य जगणेसाठी सतत स्मृती ठेवणे.

**८) सम्यक समाधी :**

मनाची एकाग्रता आनापान साधनेने करून विपश्यनेच्या मार्गातून चित्ताची निर्विचार/समतोल अवस्था प्राप्त करून घेणे.

**त्रिरत्ने**

प्रज्ञा, शील, करूणा ही अष्टांग मार्गाचा गाभा असणारी त्रिरत्ने होते.

**अ) प्रज्ञा :**

अनुभवजन्य ज्ञान म्हणजे प्रज्ञा होय. केवळ समजणे उपयोगाचे नाही तर त्याचा प्रत्यक्ष ज्ञान झाल्यावर व अनुभव आल्यावर प्रज्ञा विकसित होते. धर्माचा अनुयायी झाल्यावर सर्व जग अनित्य आहे हे समजून समताभाव / सम्यक वाचा विकास करणे अपेक्षित आहे. त्याच्या सरावाने प्रज्ञा विकसित होते.

**ब) शील :**

यालाच पंचशील म्हणतात. ते नियम पुढीलप्रमाणे

१) जीव हिंसा कोणत्याही प्रकारे न करणे.

२) चोरी करू नये.

३) व्यभिचार करू नये.

४) असत्य कथन करू नये.

५) मादक वस्तूंचे सेवन करू नये.

**क) करूणा :**

सर्व जीवसृष्टीवर प्रेम करून त्यांच्या दुःखाचा विचार करून त्यांच्याविषयी नेहमी करूणा बाळगावी.

बौद्ध धर्माची भेदभाव विरहीत शिकवण याप्रमाणे होती. मानवाला शांततेने, आनंदाने व दुःखविरहीत जीवन जगण्यास मदत करणेसाठी बुद्ध धर्माची शिकवण उपयोगी ठरते. या काळात निर्वाणप्राप्ती ही महत्त्वाची मानली गेली. त्यानुसारच सामान्य शिक्षणाची उद्दिष्टे ठरवलेली दिसतात.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) बौद्ध धर्माने सुचविलेली आर्यसत्ये कोणती आहेत?

२) बौद्ध धर्माप्रमाणे अष्टांगमार्ग कोणते आहेत?

३) अष्टांग मार्गाचा गाभा असणारी त्रिरत्ने सांगा?

### २.२.३ : बौद्धकालीन शिक्षणाची उद्दिष्टे :

यापूर्वीच चर्चा केल्याप्रमाणे बुद्धकालीन शिक्षण हे व्यक्तिला दुःखमुक्तीसाठी प्रयत्नशील करणारे होते. त्याला अष्टांगमार्ग व पंचशीलद्वारे निर्वाणप्राप्तीसाठी महत करणारे होते. पुढीलप्रमाणे शिक्षणाची उद्दिष्टे मांडता येतील.

**१) शीलसंवर्धन :**

शीलवान व्यक्तिमत्त्वाचे निर्माण करणेसाठी शीलपालन करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट होते.

**२) आत्मनिग्रह :**

स्वतःच्या वासनावर नियंत्रण मिळवणेसाठी अभ्यास करणे प्रज्ञा विकसित करणे हे उद्दिष्ट होते.

**३) संयमपूर्ण आचरण :**

स्वतःवर नियंत्रण ठेवणे तृष्णा कमी करणेसाठी संयमाने जगणे महत्त्वाचे होते. सम्यक व्यायाम, आजीविका

यासाठी संयमित आचरण गरजेचे होते.

**४) धार्मिक विकास :**

धर्माच्या पालनासाठी धर्माचे ज्ञान देणे गरजेचे होते. हे महत्त्वाचे उद्दिष्ट होते त्यामुळे निर्वाणप्राप्ती सुलभ होईल यासाठी धार्मिक ज्ञान दिले जाई.

**५) चित्तशुद्धी :**

वासनेवर विकार मिळवणेसाठी चित्तशुद्ध महत्त्वाची होती. यासाठी शिक्षणाचा उपयोग केला जाई.

**आलोद्धार :**

स्वतःचा उद्धार स्वतः करणेसाठी स्वतः स्वतःचा दिप नावे अशी बुद्धांची शिकवण आहे. यासाठी सर्व गोष्टींचा विचार करून स्वतःची उपजीविका संरक्षण, समाजाचा विचार करून शिक्षण देणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट होते.

**२.२.४ : बौद्धकालीन शिक्षणाची वैशिष्ट्ये :**

सर्वसामान्य जनतेला दुःखमुक्त करणे हे ध्येय असणाऱ्या बुद्धकालीन शिक्षणाची ठळक वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) शारीरिक विकास :**

विद्यार्थ्यासाठी विविध खेळामधून उदा. कुस्ती, मुष्टीयुद्ध, रथांची शर्यत, नियमित फिरणे यातून शारिरीक विकासाकडे लक्ष दिलेले होते. यासंबंधी आर्य-त्सिंग ह्या यात्रेकरून वर्णन केले आहे.

**२) शिक्षणाचे माध्यम -मातृभाषा**

बोलीभाषा 'पाली' ही शिक्षणाचे माध्यम म्हणून वापरली गेली.

**३) लोकशाहीप्रणित शिक्षण/भेदभावविरहीत शिक्षण :**

सर्व जातीधर्मासाठी शिक्षण होते कोणताही भेदभाव केला जात नव्हता. सर्वांना मते मांडण्याची समान संधी होती.

**४) स्त्री शिक्षण :**

सुभा, अनुपमा, सुमेधा, संघमित्र यासारख्या स्त्री परिचारिका आपणास माहित आहेतच नंतरच्या काळात बुद्धांनी स्त्री शिक्षणास परवानगी दिली.

**५) व्यावसायिक शिक्षण :**

हस्तकला, वास्तुकला, मुर्तीकला, चित्रकला यांचेही शिक्षण दिले जात असे.

**६) तांत्रिक व वैज्ञानिक शिक्षण :**

तक्षशिला विद्यापीठात मृग व चिकित्सा, इंन्द्रजाल, भविष्यकाळ, पशुंची भाषा, इंद्रियविषयक ज्ञान असे विषय आढळतात.

७) चिकित्साशास्त्राचे शिक्षण :

जीवक, चरक, धन्वंतरीसारखे आर्युर्वेदाचार्य याच काळात होऊन गेले. चिकित्साशास्त्राचे शिक्षण याच काळात होते.

८) संस्कार व उपसंपदा संस्कार शिक्षणातील महत्त्वाचे टप्पे होते.

**पब्वजा :**

वयाच्या ६ व्या वर्षापासून शिक्षण घेता येत होत. पब्बजा वयाच्या आठव्या वर्षानंतर 'विनय पीटक' मध्ये याचे वर्णन असे आहे. बालकाचे मुंडन करून पीतवस्त्र धारण करून तो बुद्ध, संघ, धर्म यांना शरण जाईल. त्याला चोरी न करणे, जीवहत्या न करणे, सत्य बोलणे व्यभिचार न करणे इ. पंचशीलाचे उपदेश केले जात. यानंतर त्याला 'श्रमण' संबोधले जाते.

उपसंपदा संस्कार :

१२ वर्षाचे शिक्षण घेतल्यानंतर मठ सोडून भिक्षूचे जीवन जगावे लागे. उपाध्याय भिक्षूला आठ नियम पालनाचे आदेश देत.

१) वृक्षाखाली वास २) साधारण वस्त्र धारण करणे ३) सालिक भोजन ग्रहण ४) भिक्षाटन ५) चोरी न करणे ६) जीवहत्या न करणे ७) स्त्रीपासून विरक्त राहणे ८) चमत्काराचा दावा न करणे.

**२.२.५ : बौद्धकालीन शिक्षणाची ध्येये :**

बौद्धकालीन शिक्षणाचे प्रमुख ध्येय म्हणजे मोक्षप्राप्ती होते. त्याला अनुसरून पुढीलप्रमाणे ध्येये सांगता येतील.

**१) निर्वाण/ मुक्ती :**

बौद्धकालीन पाली भाषेत निब्बाण म्हणजे मुक्ती होय. दुःख दूर करण्यासाठी व आनंदाची प्राप्ती करून घेण्यासाठी निर्वाणप्राप्ती महत्त्वाची आहे. त्यासाठी शिक्षणाचा उपयोग हे प्रमुख ध्येय मानले गेले.

**२) चारित्र्याचा विकास :**

समाजाच्या व व्यक्तीच्या विकासासाठी चारीत्र्याचा विकास होणे गरजेचे असते. शांततापूर्ण व आनंदी जीवनासाठी चारित्र्यविकास हे शिक्षणाचे ध्येय मानले गेले.

**३) अध्यात्मिकता :**

व्यक्तीला दुःखमुक्तीसाठी अध्यात्मिकता गरजेची आहे. तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून प्रयत्नाने निर्वाणप्राप्तीसाठी अध्यात्मिकता हे शिक्षणाचे ध्येय होते.

**४) चिंतन व मनन :**

प्रज्ञा विकसित होण्यासाठी स्वप्रयत्नाने अनुभवाद्वारे व तत्त्वचिंतनाद्वारे जीवनातील नश्वरता समजणे व तृष्णा कमी होणेसाठी चिंतन व मनन हे महत्त्वाचे ध्येय होते.

**५) धम्मप्रसार :**

शिक्षणाच्या माध्यमातून धर्मप्रसार हे महत्त्वाचे ध्येय होते कारण स्वतःचे दुःख निवारण करून इतरांनासुद्धा निर्वाणप्राप्ती व्हावी यासाठी धर्मप्रसार हे महत्त्वाचे ध्येय होते.

**२.२.६ : बौद्धकालीन अभ्यासक्रम :**

बौद्धकालीन अभ्यासक्रम प्रामुख्याने दोन प्रकारात विभागला होता.

अभ्यासक्रम

| | |
|---|---|
| अ) धार्मिक अभ्यासक्रम | अ) प्राथमिक शिक्षण |
| ब) व्यावहारिक अभ्यासक्रम | ब) उच्च शिक्षण |

**अ) धार्मिक अभ्यासक्रम :**

सुसंत, विनय व त्रिपीठक या ग्रंथाचे अध्ययन

पाली, प्राकृत व संस्कृत भाषांचा अभ्यास

मठात राहणाऱ्यांनी विनय ग्रंथाचा अभ्यास

**ब) व्यावहारिक अभ्यासक्रम**

शिवणकाम, विणकाम, सुतकताई, चित्रकला, रथसारथ्य, रोगचिकित्सा, वैद्यक, वशीकरण, कामतंत्र, धर्नुविद्या, शिकार, हत्तीसूत्र, प्राण्याचे आवाज, खगोल, न्यायशास्त्र, जादुटोणा, व्याकरण, योगविद्या, हस्तकौशल्य.

२) **अ) प्राथमिक शिक्षण :**

लेखन, वाचन, गणित

मुळाक्षरे, स्वर, समास, व्यंजन, संधी

'सिद्धीरस्यू' बालपोथीचा समावेश

शब्दविद्या, चिकित्साविद्या, शिल्पविद्या, हेतुविद्या, आत्मविद्या इ. चा समावेश

**ब) उच्चशिक्षण :**

वेद, काव्य, व्याकरण, आध्यात्मिक शास्त्र.

**बौद्धधर्मीय साहित्य –**

त्रिपीटक, विनयपीटक, जातककथा, मिलींदपन्हा इ. अभ्यासक्रम

बौद्ध भिक्खू आणि संघ याबदलचे नियम विनयपीटकात आहेत. त्यामुळे याचा अभ्यास अनिवार्य असे.

### २.२.७ : बौद्धकालीन शिक्षणातील अध्यापन पद्धती :

निर्वाणप्राप्तीसाठी, नीतीमुल्यांची जाण असणारा, चारित्र्यवाण, प्रयत्नशील व्यक्ती घडविणेसाठी वेगवेगळ्या अध्यापन पद्धती वापरल्या जात.

**१) पाठांतर :**

लेखन व मुद्रण साधनांच्या कमतरतेमुळे व बुद्धांनी दिलेले ज्ञान सुरक्षित राहणेसाठी पाठांतर पद्धती वापरली जाई त्यासाठी लक्षपूर्वक श्रवण, अर्थसमजून छोटे व योग्य सब्दोच्चारासहीत ते पाठ करणे ही पद्धती वापरली जाई. यामुळे शब्दोच्चार, शब्दार्थ व अर्थांचे आकलन होण्यास मदत होई.

**२) व्याख्यान पद्धत :**

गुरू विशिष्ट विषयाचे स्पष्टीकरण व्याख्यानाद्वारे देऊन विषय समजावून देत.

**३) वाद विवाद :**

नालंदा विद्यापीठात १००० वादविवादांचा प्रत्येक दिवशी उल्लेख आढळतो. वादविवादात सहभागी व्यक्ती तज्ज्ञ, भाषाप्रभुत्व असणारा व वक्तृत्वगुण असणारा आवश्यक असे.

**४) चर्चा पद्धत :**

चर्चा करण्याविषयी दशभूमीशास्त्रात योगाचार्यांनी इ. स. पूर्व ४०० काळात नियम सांगितला आहे. चर्चेच्या माध्यमातून लोकशाही मुल्यावर आधारित गुरू शिष्य, शिष्य-शिष्य चर्चा होत असे.

**प्रश्नोत्तर पद्धत** : मिलींद पन्हा हा याविषयीचा उत्तम ग्रंथ आहे. प्रश्नोत्तर स्वरूपात शिष्य गुरूकडून ज्ञान मिळवत असे. शास्त्रीय पद्धतीचे ज्ञान शिष्याला मिळून तो अध्यात्मिक प्रगती साधत असे.

**भटकंती व प्रवास** : धर्मप्रसारासाठी व ज्ञान मिळणेसाठी प्रवास वा भटकंती उपयुक्त ठरत असे. याबरोबर व्यावहारिक ज्ञानासाठी प्रवासाला महत्त्व दिलेले होते.

**विद्वत परिषद** : विद्वानांच्या परिषदामधून बुद्ध धर्मातील शंका, नियमांचे स्पष्टीकरण, प्रश्न यावर चर्चा घडे. यासाठी हजर राहणे बंधनकारक असे.

**ध्यानधारणा** : स्वतःच्या अनुभवावर स्वतःचा मुक्ती साधण्यासाठी बुद्धांच्या शिकवणीनुसार ज्ञानप्राप्तीसाठी ही अध्ययन पद्धती वापरली गेली.

**प्रयोगपद्धती** : स्वतः प्रयोग करून त्यावरून स्वतःमध्ये घडणारे बदल अनुभवणे याबरोबर वैद्यकशास्त्रामध्ये या पद्धतीचा उपयोग केल्याचे आढळते.

## २.२.८ बौद्धकालीन विद्यार्थीजीवन :

बुद्धकालीन विद्यार्थी जीवनात जातिभेद, वर्णभेद वा इतर कोणताही भेदभाव नव्हता. सर्व विद्यार्थी एकत्र शिक्षण घेत. विद्यार्थ्यांची बौद्धिक पात्रता व आकलनक्षमता हेच निकष विद्यार्थ्यांसाठी होते. याबरोबर तुरूंगातून पळून आलेल्या, शरीरविकृती असणारा, गुन्हेगार, क्षय, खरज्जग्रस्त व संसर्गजन्य आजार असणारा, ऋणको, दास, गुलाम इ. ना मज्जाव असे.

विद्यार्थी लवकर उठून प्रातविधीतून निवृत्त होऊन आचार्यांची सेवा करीत.

विद्यार्थी भोजन साधे व सात्विक असे. त्यांचे वस्त्र पीतवस्त्र असे त्यास 'त्रिस्तवश' म्हणत त्यामध्ये अंतर्वस्त्र, उत्तरवस्त्र व कटीवस्त्र अंतर्भूत असे. त्यानंतर विद्यार्थी सरोवरात शिस्तबद्ध स्नान करत व भिक्षाटनास जात.

विद्यार्थी विहारात स्वच्छता करणे, जेवण बनविणे, जेवण वाढणे, स्नानासाठी आचार्यांना पाणी देणे, भांडी धुणे, आचार्यांअगोदर भिक्षा मागणे, आचार्यांची सेवा करणे, आजारपणात काळजी घेणे अशी कार्ये करत.

विद्यार्थ्यांकडून चूक घडल्यास प्रसंगी विहार सोडून जावे लागे.

**२.२.९ बौद्धकाळीन शिक्षकाची भूमिका :**

आचार्यांची भूमिका ही पुढीलप्रमाणे सांगता येते.

- शिष्याची सर्वांगीण प्रगतीची जबाबदारी घेणे.
- शिष्याच्या बौद्धिक, शारीरिक, आध्यात्मिक प्रगतीकडे लक्ष पुरविणे.
- शिष्याला व्यावहारिक व आध्यात्मिक आयुष्यासाठी कौशल्य शिकविणे.
- शिष्याच्या आजारपणात देखभाल करणे.
- शिष्याचे मठातील व मठाबाहेरील वर्तन निरीक्षण करून त्याला योग्य सल्ला देणे व मार्गदर्शन पुरविणे.
- शिष्याच्या गुणांचे उदात्तीकरण करणे.
- शिष्याच्या प्रश्न, शंका-कुशंकाचे योग्य निरसन करणे.
- धर्माविषयी त्याच्यामध्ये गोडी निर्माण करणे.
- शिष्याला चारित्र्यसंपन्न, संयमी, नीतिवान, गुणवान व संतुलित व्यक्तिमत्त्व बनण्यासाठी मदत करणे.
- शिष्याला स्वतःच्या वर्तनातून शिस्त, आत्मसंयमन, आदर्श, मुल्ये, आध्यात्मिक विकास यांचे धडे देणे.
- शिष्याला कठोर अनुशासनाची सवय लावणे.

एकंदरीत उत्तम पिता, समाज मार्गदर्शक, नियंत्रण करणारा उत्तम शास्त्रा, मित्र इ. भूमिका शिक्षकाला पार पाडाव्या लागत.

**२.२.१० बौद्धकालीन स्त्री शिक्षण :**

बौद्ध काळात स्त्री शिक्षणाचे प्रयत्न झाले असे म्हणता येईल. त्याकाळी फक्त उच्च वर्गातील स्त्रीयांनाच शिक्षणाची सांस्कृतिक व आध्यात्मिक विकासाची संधी मिळत असे. श्रमजीवी, शेतकरी, व्यापारी, कलाकार इ. वर्गातील स्त्रीयाना संधी अत्यल्प मिळत असे. भगवान बुद्धांनी त्यांच्या आनंद नावाच्या पट्टशिष्यामुळे स्त्रीयांना मठात प्रवेश दिला परंतु पूर्ण परवानगी नव्हती.

स्त्रीयांचा संघप्रवेश नियम व अटीसहीत होत.

सुरवातीच्या काळात स्त्रीयांना मठात राहण्याची परवानगी सरवातीच्या काळात स्त्रीयांना मठात राहण्याची

परवानगी नसे. नंतर मात्र स्त्रीयांसाठी स्त्री भिक्षूंणीमार्फत शिक्षण दिले जावू लागले. स्त्रीयांची राहणेची व्यवस्था पूर्णपणे वेगळी असे. स्त्रीयांसाठी नियम अत्यंत कडक असत. दोन वर्षाच्या प्रशिक्षणानंतर त्यांचा प्रवेश कायम होई.

स्त्रीयांची मठातील संख्या कमी असे. परंतु त्यांचे आध्यात्मिक ज्ञान उच्च दर्जाचे होते. अनेक स्त्रिया तत्त्वज्ञान, वाङ्मय अशा प्रांतात प्रभुत्व असणाऱ्या होत्या. शील, भत्ताटिका, प्रभुदेवी, व्यंका प्रसिद्ध कवयित्री व लेखिका होत्या. सम्राट अशोकाची बहीण संघमित्रा भिक्षुणी होती. स्त्रीयांनी प्रचारिका म्हणूनही काम केल्याचे आढळते.

एकंदरीत स्त्री शिक्षणासाठी बुद्ध धर्माने भरीव कार्य केले असे म्हणता येईल.

### २.२.११ बौद्धकालीन शिक्षणाची बलस्थाने / गुण :

- शिक्षण मठ व विहारामधून दिले जाई. त्यामुळे गुरू-शिष्य संबंध दृढ व प्रेमपूर्ण असत.
- ब्रह्मचर्य पालन व विकारापासून आपोआप मुक्ती मिळे. अहिंसेच्या पालनासाठी उत्तम वातावरण होते.
- भिक्षाटनामुळे विनय व नम्रता निर्माण होई.
- जातीभेदापासून मुक्त वातावरणात शिक्षण.
- विद्यापीठांची स्थापना ही मोठी देणगी आहे.
- धर्म प्रसारकामुळे भारताबाहेर चीन, सुमात्रा, जावा, तिबेट येथे धर्मप्रसार.
- मातृभाषेतून शिक्षण
- शारिरीक शिक्षेचा अभाव.
- राजकारणापासून अलिप्तता.
- स्वावलंबनावर भर
- व्यावसायिक व आत्मसंरक्षणासाठी शिक्षणामुळे व्यावहारिक प्रगती.

### २.२.१२ बौद्धकालीन शिक्षणातील उणीवा :

- धार्मिक शिक्षणावर जास्त भर. त्यामुळे लष्करी शिक्षणाकडे दुर्लक्ष.
- स्त्री शिक्षणाची उपेक्षा- सुरूवातीच्या काळात स्त्री शिक्षण नव्हते तर नंतर मुलीसाठी व्यवस्था सक्षम नव्हती.
- लौकिक जीवनाप्रती उदासीनता.
- अहिंसेच्या शिक्षणामुळे शस्त्रनिर्मिती शौर्य, पराक्रमाकडे दुर्लक्ष.
- शिक्षणाचा उद्देश केवळ धर्मप्रसार एवढाच राहिला.

- समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाचे कार्य कमी पडेल.
- नंतरच्या काळात मठ हे विलासाचे केंद्र बनले.
- नंतरच्या काळात 'हिनयान' व 'महायान' पंथनिर्मितीमुळे धर्मप्रसाराचे कार्य थांबले.

## २.३ पारिभाषिक शब्द/ शब्दार्थ

**आर्यसत्त्वे** : मानवाची दुःखापासून सुटका करण्यासाठी बुद्धांनी सांगितलेली आहे.

**अष्टांगिक मार्ग** : दुःख मुक्तीसाठी बुद्धांनी सांगितलेले मार्ग.

**पब्बजा** : संघ प्रवेशासाठी ८ व्या वर्षी केलेला विधी.

**उपसंपदा** : १२ वर्षाच्या शिक्षणानंतर मठ सोडताना केला जाणारा विधी.

**श्रमण** : संघात शिक्षण घेणारा विधी.

**उपाध्याय** : संघात अध्यापन करणारा गुरू.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**१) आर्यसत्त्वे** : १) दुःख २) दुःख समुदाय ३) दुःखनिरोध ४) दुःखनिरोधगामिनी प्रतिपद

**२) अष्टांग मार्ग** : १) सम्यक दृष्टी २) सम्यक संकल्प ३) सम्यक वाणी ४) सम्यक कर्म ५) सम्यक अर्जन, ६) सम्यक प्रयत्न ७) सम्यक स्मृती ८) सम्यक समाधी

**३) त्रिरत्ने** : प्रज्ञा, शील व करूणा

## २.५ सारांश

इ. स. पूर्व ६ वे शतक हा बुद्धकालीन कालखंड मानला जातो. या काळात वैदिक रूढी व परंपरा यांचे महत्त्व वाढले. यज्ञयाग, पशुबळी इ. कर्मकांडाना उत आला होता. खरा धर्म सामान्य माणसाला समजणे अवघड होते. त्यावरचे मळभ दूर सारून भगवान बुद्धांनी पुन्हा एकदा सामान्य जनतेला समजणाऱ्या भाषेत शुद्ध धर्म प्रतिपादित केला. ज्याचा प्रसार भारताबरोबर बाहेरच्या देशातसुद्धा झाला.

निर्वाणप्राप्ती / मोक्षप्राप्ती हे ध्येय असणारा शास्त्रीय पायावर आधारीत साधनापद्धती असणारा धर्म सोप्या भाषेत लोकांप्रत पोहचला. या काळात अर्थातच शिक्षणाचे ध्येय मोक्षप्राप्ती होते. त्याला अनुसरून विद्यार्थी शिक्षक, अभ्यासक्रम इ. बरोबरच स्त्री शिक्षणाची त्यावेळेची स्थितीची मुद्देसूद चर्चा बौद्धकालीन शिक्षणावर प्रकाश टाकते.

## २.६ सरावासाठी प्रश्न

१) बौद्धकालीन शिक्षक विद्यार्थी नातेसंबंध स्पष्ट करा.

२) बौद्धकालीन अध्यापन पद्धती थोडक्यात स्पष्ट करा.

३) बौद्धकालीन स्त्री शिक्षणावर चर्चा करा.

## २.७ अधिक वाचनांसाठी संदर्भ :


- देशमुख एल. जी. (२००४) : भारतातील शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- जाधव मोहन, भोसले भारती, सरपोतदार प्राची (२००३) : भारतीय शिक्षणाचा विकास फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- गद्दे गीता, गद्दे ल. रा. (१९७७) : शिक्षणाचा इतिहास भाग १, नूतन प्रकाशन पुणे.
- सौ. पेडके प्रतिभा सुधीर (२००५) : भारतीय शिक्षणपद्धतीचा विकास. श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर.
- Chaube S. P. (1989) : History & Problems of Indian Education.
- शेखर गणेश, शेवतेकर शारदा, जोशी शोभना (२००२) : भारतीय शिक्षणाचा इतिहास, मृण्मयी प्रकाशन, औरंगाबाद


❖❖❖

## घटक – ३

# इस्लामिक काळातील शिक्षण

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ भारतातील इस्लामिक राज्यकर्ते आणि त्यांचे शैक्षणिक योगदान
- ३.२.२ इस्लामिक शिक्षणाचे स्तर
- ३.२.३ इस्लामिक शिक्षणाची ध्येये
- ३.२.४ इस्लामिक शिक्षणाचा अभ्यासक्रम
- ३.२.५ इस्लामिक शिक्षणातील अध्यापन पद्धती
- ३.२.६ इस्लामिक शिक्षणातील विद्यार्थी शिस्त
- ३.२.७ इस्लामिक शिक्षणातील शिक्षकाची भूमिका
- ३.२.८ इस्लामिक शिक्षणाची वैशिष्टे
- ३.२.९ इस्लामिक शिक्षण पद्धतीचे गुण व मर्यादा

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकांच्या अभ्यास केल्यानंतर आपल्याला.

१) भारतातील मुस्लिम राज्यकर्ते व त्यांचे शैक्षणिक योगदान समजण्यास मदत होईल.

२) इस्लामिक शिक्षणाचा स्तर स्पष्ट करता येईल.

३) इस्लामिक शिक्षणाची ध्येये स्पष्ट करता येतील.

४) इस्लामिक शिक्षणाचा अभ्यासक्रम सांगता येईल.

५) इस्लामिक शिक्षणाच्या अध्यापन पद्धती स्पष्ट करता येतील.

६) इस्लामिक शिक्षणातील विद्यार्थी शिस्त व शिक्षकाची भूमिका स्पष्ट करता येईल.

७) इस्लामिक शिक्षणाची वैशिष्टे व गुणमर्यादा यांची चिकित्सा करता येईल.

## ३.१ प्रस्तावना :

भारतातील मुस्लिम शासन ६५० वर्षे (इ.स. ११९१ ते १८५७) होते. इ.स. ११९२ मध्ये महंमद घोरीने त्यानंतर कुतुबुद्दीन ऐबकने भारतावर राज्य केले व भारतात मुस्लीम राजवट सुरू झाली. इ.स. १२०६ ते १८५८ या प्रदीर्घ कालखंडात भारतात मुस्लिम राजवट होती. या काळात गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद, लोदी आणि मुघल घराण्यांनी भारतात राज्य केले. प्रत्येक सत्तांतराबरोबर शिक्षणात फरक होत गेला. हा फरक शासकाच्या आवडी –निवडीनुसार व इच्छेनुसार होत होता. या काळात भारताच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच धार्मिक परिस्थितीत बदल घडत गेला. आधीची भारतीय शिक्षण व्यवस्था कोलमडली. नवीन शिक्षण प्रणालीला सुरूवात झाली. तिला 'मध्ययुगीन शिक्षण प्रणाली' म्हणून संबोधले जाते. अरबी, फारशी भाषांचा उदय झाला. शिक्षणात धार्मिक दृष्टी होती.

या प्रकरणाच्या सुरूवातीला आपण भारतातील काही प्रमुख मुस्लिम राज्यकर्ते व त्यांचे शैक्षणिक कार्य यांची माहिति घेऊ.

## ३.२ विषय विवचेन :

### ३.२.१ भारतातील मुस्लिम राज्यकर्ते आणि त्यांचे गुलाम साम्राज्य (१२०६ ते १२८६) :

१) **कुतुबुद्दीन ऐबक** : गुलाम साम्राज्याचा पाया याने घातला म्हणून त्याला गुलाम साम्राज्याचा संस्थापक म्हणतात. त्याने आयुष्यभर हिंदूचा द्वेष केला. भारतातील मंदिरे, मठ, विहार यांचा विध्वंस केला. त्या ठिकाणी मशिदी बांधल्या. इस्लामिक शिक्षण देण्यास सुरूवात केली.

२) **आल्तमश** : आपली सत्ता बळकट करता येईल तितकी बळकट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यामुळे शिक्षणाकडे विशेष लक्ष देता आले नाही.

३) **रजिया** : ही आल्तमशची मुलगी ती फार पराक्रमी तसेच शिक्षणप्रेमी होती. ती कुशल प्रशासक होती. तिने शिक्षणाला प्रोत्साहन मिळणे म्हणून 'मुईइशी मदरशा' सुरू केली.

४) **नसिरूद्दीन** : हा शिक्षणप्रेमी होता. त्याने शिक्षणप्रसाराला चालना दिली. त्याने पवित्र कुराणाची नक्कल केली. फारशी भाषा त्याच्यात काळात विकसित झाली. त्याच्या कारकिर्दीत दोन महाविद्यालये स्थापन झाली. तसेच अनेक पुस्तके लिहिली गेली.

५) **बल्बन** : हा प्रभावी सुलतान होता. तो वाङ्मयाचा भोक्ता होता. बल्बन आपल्या दरबारी अनेक विद्वानांना आश्रय दिला. त्याच्या दरबारात सुप्रसिद्ध कवी, 'अमीर खुसरो' आश्रयाला होता. त्याच्या कारकिर्दीत संस्कृती, वाङ्मय यांना प्रोत्साहन मिळाले.

६) **महंमद** : हा बल्बनचा मुलगा तो शिक्षणप्रेमी व तत्त्वज्ञ होता. त्याने वाङ्मय मंडळाची स्थापना केली. तो अनेक विद्वान मित्रांना एकत्रित जमवित असे. त्याच्या काळात साहित्य निर्मितीला प्रोत्साहन मिळाले.

## खिलजी साम्राज्य : (१२९० ते १३१६)

**१) जलालउद्दीन खिलजी** : हा खिलजी घराण्याचा संस्थापक होता. हा शिक्षण प्रेमी व विद्वान होता. त्याने अनेक विद्वानांना प्रोत्साहन दिले. तो ग्रंथप्रेमी होता. त्याने दिल्लीजवळ किलगुरी येथे एक भव्य ग्रंथालय सुरू केले.

**२) अल्लाउद्दीन खिलजी (१२९६ ते १३१६)** : हा मोठा विचित्र स्वभावाचा होता. निर्दयी व जुलमी राजा होता. शिक्षणात त्याला मुळीच स्वारस्थ नव्हते. अनेक शिक्षणसंस्था त्याने बंद केल्या.

## तुघलक साम्राज्य (१३२० ते १३८९)

**१) गयासुद्दीन तुघलक** : हा मोठा भाषा पंडित व तत्वज्ञानी होता. त्याने विद्वानांची कदर केली. त्यांना बक्षिसे दिली. त्यांच्या सवलती चालू ठेवल्या.

**२) महंमद तुघलक** : हा गयासुद्दीन तुघलकचा मुलगा मोठा शिक्षणप्रेमी होता. आपल्या दरबारात त्याने अनेक विद्वान लेखक कलाकार, तत्त्ववेते ठेवले होते. त्याने अनेक मक्ताब व मदरसा बांधल्या.

**३) फिरोजशहा तुघलक** : हा शांतताप्रिय होता. त्याने राज्य सुनियंत्रीत ठेवण्यावर भर दिला. तसेच तो शिक्षणप्रेमी होता. विद्वान होता. त्याने अनेक मक्ताब व मदरसा बांधल्या. त्याने संस्कृत ग्रंथांचा फारशी भाषेत अनुवाद केला. अनेक शिक्षण संस्थांना जोडून वसतिगृहे सुरू केली.

## लोदी साम्राज्य (१४५१ ते १४८१)

**१) बहलोल लोदी** : हा लोदी साम्राज्याचा पहिला राज्यकर्ता. तो उत्तम प्रशासक होता. शिक्षणाविषयी त्याच्या मनात प्रेम होते. त्याच्यामुळे शिक्षणाला गती मिळाली. त्याने काही मक्ताब व मदरसा सुरू केल्या.

**२) सिकंदर लोदी** : बहलोल लोदीचा हा पुत्र. तो चांगला प्रशासक होता. विद्वान होता. तसेच एक महान लेखक होता. कवितांचा संग्रह करण्याचा त्याला छंद होता. ९००० कवितांचा त्याने संग्रह केला होता. त्याच्या दरबारात अनेक परदेशी विद्वान येऊन गेले.

**३) इब्राहिम लोदी** : हिंदू शाळांचा विध्वंस करून त्याने अनेक मक्ताब व मदरसा बांधल्या. 'गुलइस'

या टोपण नावाने त्याने कविता लिहिल्या.

## मुघल साम्राज्य (१५२६ ते १७०७)

**१) बाबर** : याने भारतात मुघल साम्राज्याचा पाया घातला. त्याला तुर्की अरबी आणि फारशी भाषा अवगत होत्या. तो स्वतः विद्वान होता. त्याने स्वतःचे आत्मचरित्र लिहिले होते. त्याने काही मक्ताब व मदरसा स्थापन केल्या.

**२) हुमायून** : हा बाबरचा मुलगा. तो वडिलाप्रमाणे विद्वान होता. त्याने दिल्लीत एक मोठी शैक्षणिक संस्था सुरू केली. त्याने मक्ताब व मदरसा सुरू केल्या. विद्वान लोकांचा तो आदर करीत असे.

**३) अकबर** : अकबरची कारकीर्द ही त्याच्या शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा व संस्कृती यातील योगदानामुळेच महत्त्वपूर्ण ठरली. त्याने मुस्लिम शिक्षणाबरोबरच हिंदू शिक्षणाकडेही लक्ष दिले. त्याने शाळांमधून संगीत, चित्रकला, तत्त्वज्ञान, गणित यासारख्या विषयाचे शिक्षण सुरू केले. त्याने व्यवसायिक शिक्षणाला चालना दिली. त्याने हिंदू-मुस्लिम ऐक्याची प्रक्रिया विकसित केली.

**४) जहांगीर** : हा स्वत: विद्वान होता. कलाप्रेमी होता. साहित्यप्रेमी होता. त्याने 'जहांगीरनामा' ग्रंथ लिहिला. सूरदास, तुलसीदास व केशवदास हे कवी त्याच्याच काळात प्रसिद्धीस आले.

**५) शहाजहान** : हा कलाप्रेमी म्हणून प्रसिध्द होता. त्याने वडिलांचे व आजोबांचे शैक्षणिक कार्य पुढे चालू ठेवले. त्याने आपल्या दरबारी अनेक विद्वानांना, कलाकारांना बक्षिसे, शिष्यवृत्त्या दिल्या. सर्व भाषांना त्याने उत्तेजन दिले.

**६) औरंगजेब** : हा इस्लामचा कट्टर अनुयायी होता. त्याने अनेक हिंदू मंदिरे व शाळा उद्ध्वस्त केल्या. अनेक मक्ताब व मदरसा बांधल्या. इस्लामचा प्रसार करणे हा त्याचा प्रमुख हेतू होता.

### ◆ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १

खालील विधाने चूक की बरोबर ते ओळखा.

१) आल्तमशने गुलाम साम्राज्याचा पाया घातला. चूक/बरोबर

२) रजिया ही शिक्षणप्रेमी होती. चूक/बरोबर

३) अल्लाउद्दीन खिलजीने शिक्षणाचा मोठा प्रसार केला. चूक/बरोबर

४) सिकंदर लोदी याला शिक्षणाबद्दल आस्था नव्हती. चूक/बरोबर

५) अकबराच्या कारकिर्दीत हिंदू शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले गेले नाही. चूक/बरोबर

६) औरंगजेबने मदरसा बरोबरच अनेक हिंदू शाळा बांधल्या. चूक/बरोबर

## ३.२.२ इस्लामिक शिक्षणाचे स्तर

**इस्लामिक धर्माचे दोन स्तर होते.**

१) प्राथमिक स्तर २) उच्च शिक्षण

### १) प्राथमिक शिक्षण :

प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांना 'मक्ताब' म्हणत असत. मशीद अथवा दरगाह या ठिकाणीही प्राथमिक शिक्षण मिळत असे. प्राथमिक शिक्षण सुरू करण्यापूर्वी बालकावर एक धार्मिक संस्कार करण्यात येत असे त्यास 'बिसमिल्ला' विधी म्हणत. मुस्लीम धर्मामध्ये 'कुराण' प्रत्येकाने स्वत: वाचायला पाहिजे असा आग्रह असल्यामुळे प्रत्येक बालकावर बिसमिल्ला हा संस्कार करण्यात येत असे. त्यावेळी बालकास उत्तम पोशाख घालून आसनावर बसविण्यात येत असे. 'बिसमिल्ला' संस्कार बालक ४ वर्षे, ४ महिने व ४ दिवसांचे झाल्यावर करण्यात येत असे.

### २) उच्च शिक्षण :

उच्च शिक्षण हे 'मदरसा' या ठिकाणी दिले जात असे. प्राथमिक शिक्षण म्हणजे मक्ताब मधील शिक्षण पूर्ण झाल्यावर मदरसामध्ये विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाई. मदरसा म्हणजे काही अंशी महाविद्यालये व काही अंशी माध्यमिक शाळाच होत. 'मदरसा' हे उच्च शिक्षणाचे केंद्र होते. मदरशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली जात असे. तसेच विद्यार्थ्यांसाठी या ठिकाणी वसतिगृहाची सोय असे. उच्च शिक्षणाचा कालावधी १० ते १२ वर्षांचा असत असे.

## ३.२.३. इस्लामिक शिक्षणाची ध्येये

इस्लामिक राजवटीत अनेक राजे होऊन गेले. हे सर्व इस्लाममधील कट्टर अनुयायी होते. इस्लाम धर्माचा प्रसार करणे हे त्यांचे प्रमुख ध्येय होते. काहींनी हिंदू शिक्षणाला कडवा विरोध केला. इस्लामिक शिक्षणाची ध्येये पुढीलप्रमाणे–

**१) ज्ञानाचा प्रसार :** इस्लामिक शिक्षणाचे हे पहिले ध्येय होते. इस्लाम धर्माचे संस्थापक महंमद पैगंबर यांचे धर्मवचन होते की स्त्री–पुरुष कोणीही असो ज्ञानसंपादन करणे हे त्याचे कर्तव्य आहे. ज्ञानामुळे जीवनातील अयोग्य व वाईट गोष्टी टाळता येतात. सुखाचा शोध घेता येतो. ज्ञानामुळे जीवनात उदात्त, उन्नत, उत्तम स्थिती निर्माण करता येते व सुखाने जगता येते.

पैगंबरांचा हा उपदेश प्रत्यक्ष कार्यवाहित आणण्यासाठी मुस्लिम प्रशासकांनी शिक्षणात ज्ञान प्रसाराला महत्त्व दिले.

**२) इस्लाम धर्माचा प्रसार :** इस्लामिक शिक्षणाचे दुसरे ध्येय म्हणजे इस्लाम धर्माचा प्रचार व प्रसार करणे. प्रत्येक मुस्लिम सम्राटाची हीच मनोभूमिका होती. इस्लाम धर्माचा प्रसार करण्यासाठी शिक्षण हे साधन

उपयुक्त ठरते म्हणून राजकर्त्यांनी मक्ताब व मदरसा बांधल्या. मक्ताबमध्ये कुराणाचे आणि मदरसामध्ये साहित्य, तत्त्वज्ञान व धार्मिक सिध्दांताचे ज्ञान दिले जात असे.

**३) नैतिकता वाढविणे** : नीतीमत्तेत वाढ करणे हे शिक्षणाचे आणखी एक ध्येय होते. इस्लामचे कायदे, सामाजिक परंपरा यार आधारलेल्या इस्लामीनीती तत्त्वांचा पुरस्कार करून समाजाची नीतीमत्ता वाढविणे हा शिक्षण देण्यामागचा हेतू होता. सुखी व स्थिर जीवन जगता यावे म्हणून नीतिमत्तेचा संस्कार शिक्षणाद्वारे देणे हा उद्देश होता.

**४) ऐहिक उन्नती साधणे** : नैतिकता वाढविण्याबरोबरच जीवनात सुख आणि समृध्दी आणण्यासाठी ऐहिक उन्नतीला महत्त्व दिले. म्हणून समाजाची उन्नती करण्यासाठी आवश्यक असणारे कारागीर, कवी, इतिहासकार, व्यावसायिक निर्माण करण्यावर भर दिला. विद्यार्थ्यांना विद्यावेतने, जहांगिरी, बक्षिसे अशा सुविधा पुरविल्या. शिक्षणामुळे व्यक्ती सुखी व स्वावलंबी व्हावी हा हेतू यापाठीमागे होता.

**५) राज्याला स्थैर्य व बळकटी आणणे** : हिंदुस्थानावर राज्य गाजविण्यासाठी, राज्याला सुस्थिरता प्राप्त करण्यासाठी भारतीयांची सहानुभूती मिळविणे गरजेचे होते. यासाठी शिक्षण देण्याचा हेतू मनात ठेवून शिक्षण व्यवस्था राबविली गेली. क्षिणाच्या माध्यमातून मुस्लीम संस्कृतीचा प्रसार करता येईल हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून शिक्षणाची व्यवस्था केली गेली.

**६) चारित्र्य संवर्धन** : महंमद पैगंबराने म्हटले आहे की, व्यक्तीच्या चारित्र्याला त्याच्या जीवनात अतिशय महत्त्व आहे. म्हणून मक्ताब व मदरशामध्ये विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी लावण्याचा प्रयत्न केला जात असे. विद्यार्थ्यांचे चांगले चारित्र्य घडवून एक उत्तम व्यक्तिमत्त्व निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय होते.

◆ **स्वयंअध्ययन प्रश्न – २**

एका वाक्यात उत्तर लिहा.

१) इस्लामिक शिक्षणाचे स्तर कोणते होते?

२) इस्लामिक शिक्षणात प्राथमिक शिक्षण कोठे दिले जात असे?

३) उच्च शिक्षण ज्या ठिकाणी दिले जात असे त्या केंद्रास काय म्हणतात?

४) शिक्षणास सुरवात करण्यापूर्वी कोणता धार्मिक विधी केला जाई?

५) इस्लामिक शिक्षणाची प्रमुख ध्येये कोणती होती?

## ३.२.४. इस्लामिक शिक्षणाचा अभ्यासक्रम

इस्लामिक शिक्षणाचा अभ्यासक्रम जाणून घेण्यासाठी मक्ताब आणि मदरशामधील शिक्षणाचा विचार करावा लागतो.

**प्राथमिक स्तर (मक्ताब)**

प्राथमिक शिक्षणात लेखन, वाचन व अंकगणित यावर भर दिला जात असे. मुळाक्षरे व हस्ताक्षर याकडे लक्ष दिले जाई. अभ्यासक्रमात कुराणातील काही कलमे व काही शब्द शिकविले जात असत. याबरोबरच शरीर विज्ञान, व्याकरण, धर्मशास्त्र, तर्कशास्त्र, इतिहास, गणित या विषयांचाही समावेश असे. प्राथमिक अंकगणित, पत्रव्यवहार यांचा समावेश होता. कुराणचे पठण हा एक आवश्यक भाग समजला जाई. उर्दू हा एक विषय म्हणून शिकावा लागे. दिवसातून चार ते पाच तास एवढा वेळ अक्षरांवर खर्च करीत. उत्तम हस्ताक्षरासाठी कवितेतील काही ओळी घटवून घेतल्या जात. विद्यार्थ्यांना प्रार्थना तोंडपाठ कराव्या लागत. फारशी भाषेचे व्याकरण पाठ करावे लागे. शुध्द व अचूक उच्चारण करण्यात लक्ष दिले जात असे.

**उच्च शिक्षण (मदरशा)** – मदरशातील शिक्षण धार्मिक व लौकिक या दोन्ही प्रकारचे होते. लौकिक शिक्षणात अरबी व्याकरण, गद्य, वाङ्‌मय, तर्कशास्त्र, तत्वज्ञान, कायदा, अंकगणित, शेती, इतिहास, भूगोल, वैद्यकी, राज्यशास्त्र, धार्मिक विधी असे विषय असत. तसेच नक्षीकाम, हस्तकला यावर आधारित कौशल्य शिक्षण दिले जाई. शिक्षणाचे माध्यम अरेबिक असे. धार्मिक प्रार्थना मातृभाषेतून करता येत असे.

धार्मिक अभ्यासक्रमात पवित्र कुराणाचा सांगोपांग अभ्यास शिकविला जाई. कुराणातील भाष्ये, वचने, तसेच इस्लामी कायदा, सुफी पंथाचे तत्त्वज्ञान यांचा समावेश असे. अकबराच्या कालखंडात त्याने जीवनोपयोगी, व्यवहारपयोगी, संसारपयोगी शिक्षणावर लक्ष दिले.

मदरशामध्ये बहुविध विषय शिकविले जात होते. अरबी, फारशी वाङ्‌मय, व्याकरण, अलंकारशास्त्र, काव्य हे विषयही अभ्यासक्रमात होते. येथील अभ्यासक्रम बहुव्यापक असा होता.

## ३.२.५. इस्लामिक शिक्षणातील अध्यापन पध्दती

मुस्लिम काळातील शिक्षण हे मौखिक पध्दतीवरच आधारलेले होते. शिक्षणाची अध्यापन पध्दती ही मौखिकच होती. मक्ताबमध्ये सुरूवातीला मुळाक्षरे शिकविली जात. त्यांचे अचूक उच्चारणा करून घेत. शुध्द उच्चार करण्याबरोबरच उत्तम हस्ताक्षर काढण्यावर भर दिला जाई. पाठांतरावर जास्त भर होता. पठण आणि पाठांतर या दोन पध्दती अध्यापनात वापरल्या जात होत्या. विद्यार्थ्यांना पवित्र कुराण व प्रार्थना तोंडपाठ कराव्या लागत. पठणापूर्वी हस्तलेखन करावे लागत असे.

अध्यापनाची पध्दती मौखिक होती त्यामुळे शिक्षकांचे मुख्य काम म्हणजे विद्यार्थ्यांना व्याख्यान देणे व नंतर वाचन घेणे. लेखन, वाचन या पध्दतीही महत्त्वाच्या मानल्या जात. हस्तकला, नक्षीकाम यासारख्या विषयांचे प्रात्यक्षिक ज्ञानही दिले जाई.

थोडक्यात इस्लामिक काळात पठण, स्वाध्याय, लेखन, हस्ताक्षर या पध्दती होत्या.

### ३.२.६ इस्लामिक शिक्षणातील विद्यार्थी शिस्त

मुस्लिम शिक्षणात वैदिक शिक्षणाच्या तुलनेत गुरूबद्दल आदर कमी झाला होता. 'मदरसांमध्ये' वसतिगृहांची सोय असल्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांबरोबरच वसतिगृहात राहत असत. त्यामुळे विद्यार्थ्यांवर नियंत्रण राखले जाई. तसेच विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होत. परंतु 'मक्ताब'मध्ये वसतिगृह नसत. मक्ताब मधील लहान मुले शिक्षकांचा नेहमीच आदर करीत असत. बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा केली जात असे. शिक्षेचे सर्व अधिकार शिक्षकाला असत.

बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा केली जात असे. छडी मारणे, दूर अंतर पळायला लावणे, उलटे टांगणे अशा प्रकारच्या शिक्षा केल्या जात. हुशार आणि आज्ञाधारक विद्यार्थ्यांचा आदरही केला जात असे. त्यांना बक्षिसे दिली जात. काही श्रीमंत लोक शिस्तप्रिय विद्यार्थ्यांना बक्षिसे देत असत. शिक्षक स्वत: आपल्या चारित्र्याचा आदर्श विद्यार्थ्यांपुढे ठेवत असत. त्यांचे चारित्र्य घडविण्याकडे लक्ष देत.

### ३.२.७ इस्लामिक काळातील शिक्षकाची भूमिका :

इस्लामिक शिक्षणात शिक्षकाची भूमिका फार महत्त्वाची होती. समाजात शिक्षकाला मानाचे स्थान होते. शिक्षकांना 'मौलवी' असे संबोधले जात असे. ज्याप्रमाणे विद्यार्थी शिक्षकांचा आदर करीत त्याप्रमाणे शिक्षकही विद्यार्थ्यांचा आदर करीत असत. मदरशांमध्ये विद्यार्थ्यांची चांगली काळजी घेणे. त्यांची विचारपूस करणे, हे शिक्षकाचे काय होते. विद्यार्थ्यांच्या चारित्र्यांची जडणघडण करणे, त्यांना ज्ञानसंपन्न बनविणे तसेच व्यावसायिक शिक्षण देणे व त्यांना स्वावलंबी बनविणे. त्यांच्या मनात इस्लाम धर्माविषयी अभिमान निर्माण करणे ही शिक्षकाची भूमिका होती. शिक्षक स्वतः ज्ञानी, नीतीमान, निःस्वार्थी चारित्र्यसंपन्न असत. त्यामुळे राजदरबारी त्यांचा मानसन्मान केला जाई. शिस्तप्रिय विद्यार्थ्यांवर ते पुत्रवत प्रेम करत. तर बेशिस्त विद्यार्थ्यांना तसेच गुन्हेगार विद्यार्थ्यांना कठोर शिक्षाही देत. विद्यार्थ्यांचा नैतिक विकास घडवून आणणे. त्यांना व्यावसायिक शिक्षण देणे, इस्लाम धर्माचा प्रसार करणे ही शिक्षकाची महत्त्वाची भूमिका होती.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) मक्ताबमधील शिक्षणात कोणत्या शिक्षणावर भर दिला जाई?

२) मदरशामधील शिक्षण कोणत्या प्रकारचे होते?

३) मक्ताबमध्ये अध्यापनासाठी कोणती अध्यापन पद्धती वापरली जात असे?

४) बेशिस्त वागणाऱ्या विद्यार्थ्यांना कशाप्रकारचे शासन केले जात असे?

५) शिस्तप्रिय विद्यार्थ्यांना कशी वागणूक दिली जात असे?

### ३.२.८ इस्लामिक शिक्षणाची वैशिष्टे :

**१) शिक्षणाची ध्येये** : मुस्लिमाचा प्रमुख हेतू धर्माचा प्रसार करणे हाच होता. त्यामुळे शिक्षणाचे ध्येय इस्लामाचा प्रसार करणे हेच होते. शिक्षणाच्या माध्यमातून इस्लामचे कायदे, नियम, तत्त्वे, रूढी, परंपरा यांचे शिक्षण देणे हे शिक्षणाच्या ध्येयातून साध्य करण्याचा प्रयत्न होता.

**२) शिक्षणाला राजाश्रय** : मुस्लिम शिक्षणाला राजाश्रय मोठ्या प्रमाणात होता. अनेक मुस्लिम राज्यकर्ते शिक्षणप्रेमी असल्याने त्यांनी मोठ्या प्रमाणावर मक्ताब मदरसा, ग्रंथालये बांधली. बुद्धिमान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या बक्षिसे दिली.

**३) फारसी माध्यमातून शिक्षण** : फारसी ही राजभाषा असल्यामुळे शिक्षणाचे माध्यम फारसी होते. फारसी भाषा येणाऱ्यांना नोकऱ्या दिल्या जात असत त्यामुळे भाषा विकासाला संधी मिळाली नाही.

**४) विद्यापीठांचा अभाव** : मुस्लिम शिक्षण केवळ मक्ताब व मदरसांमधूनच दिले जात असे शिक्षणात विद्यापीठांचा अभाव होता.

**५) विद्यार्थी शिस्त** : विद्यार्थी शिक्षकांचा आदर करीत असत. विद्यार्थ्याला गुरूची सेवा करावी लागत असे. विद्यार्थ्यांनी शिस्तीने वागावे अशी अपेक्षा असे.

**६) शिक्षकाचा दर्जा** : शिक्षकाला शिक्षणात मानाचे स्थान होते. शिक्षक, चारित्र्यवान, आत्मसंयमी, आदर्श होते. त्यामुळे समाजात मानाची पदे भूषवीत असे.

**७) परीक्षा पद्धती** : मुस्लिम काळात परीक्षा पद्धती नव्हती. गुरूच्या मर्जीनुसार चांगले ज्ञानार्जन केलेल्या विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात प्रवेश मिळे.

**८) निःशुल्क शिक्षण पद्धती** : मुस्लिम काळात शिक्षण निःशुल्क होते. कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नव्हती. मदरसांमध्ये भोजन, निवास सुविधा मोफत होती.

**९) शिस्त, पारितोषिके आणि शिक्षा** : बुद्धिमान विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जात असत. तसेच विद्यावेतनही दिले जाई. सरकारी नोकऱ्या दिल्या जात. बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांना कडक शासन करण्यात येत असे. तर शिस्तीने वागणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान-सन्मान केला जाई.

**१०) अभ्यासक्रम** : इस्लामिक शिक्षणाचा अभ्यासक्रम हा धार्मिकतेवर आधारलेला होता. मक्ताबमध्ये हस्ताक्षरावर भर तसेच तोंडपाठ करणे यावर भर दिला जाई. मदरसांमध्ये अरबी व्याकरण, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, इतिहास, कायदा, भूगोल या विषयाबरोबर धार्मिक शिक्षणही होते.

**११) अध्यापन पद्धती** : मक्ताबमध्ये पठण, वाचन, लेखन आणि मदरसांमध्ये मौखिक व्याख्यान, प्रात्यक्षिक, स्वंयअध्ययन या पद्धतींचा अवलंब केला जात असे.

**१२) स्त्री शिक्षण** : मक्ताबमध्ये मुली शिक्षण घेऊ शकत परंतु मदरसांमध्ये मुलींना प्रवेश दिला जात नसे. श्रीमंत लोक घरी शिक्षणाची सोय करत. सामान्यांना मात्र ते शक्य नसल्यामुळे स्त्रीया शिक्षणापासून दुर्लक्षित राहिल्या.

**१३) हस्तकलांचे शिक्षण** : मुस्लिम शिक्षणात जीवनास उपयुक्त शिक्षणास महत्त्व दिले गेले. त्यामुळे हस्तकलांचे शिक्षण देण्यावर भर दिला गेला. हस्तकलांना राजाश्रयही होता.

## ३.२.९ इस्लामिक शिक्षण पद्धतीचे गुण व मर्यादा

**इस्लामिक शिक्षणाचे गुण :**

१. धार्मिक मुल्ये, भौतिक गरजा आणि सुखसमृद्धी यावर शिक्षण पद्धती आधारलेली होती.

२. शिक्षण मुलांसाठी सक्तीचे होते.

३. गुरू-शिष्य संबंध सलोख्याचे होते.

४. शिक्षणात चारित्र्य संवर्धनाला महत्त्व होते.

५. अभ्यासक्रमात विविध विषय समाविष्ट होते.

६. व्यावहारी शिक्षणावर विशेष भर होता.

७. बुद्धिमान विद्यार्थ्यांना बक्षिसे व शिष्यवृत्त्या दिल्या जात.

८. शिक्षण विनाशुल्क होते.

९. राज्यकर्त्यांनी वाङ्मय विकासावर भर दिला.

१०. राज्यकर्त्यांनी मक्ताब, मदरसा स्थापन करण्याकडे लक्ष दिले.

**इस्लामिक शिक्षणाच्या मर्यादा :**

१. अरबी आणि फारशी भाषांना महत्त्व दिल्यामुळे इतर विषयांकडे दुर्लक्ष झाले.

२. मक्ताब व मदरसा चालविण्यासाठी निश्चित यंत्रणा नव्हती.

३. हिंदू शिक्षण दुर्लक्षित राहिले.

४. शिक्षणात कडक शारीरिक शिक्षा दिल्या जात त्याचा वाईट परिणाम होत असे.

५. वैदिक काळाच्या तुलनेत गुरूला मानाचे स्थान नव्हते.

६. मुस्लिम शिक्षणात वैश्विक दृष्टिकोनाचा अभाव होता.

७. वाचन आणि लेखन यात योग्य समन्वय साधण्याचा प्रयत्न केला गेला नाही.

८. स्त्री शिक्षणावर विशेष भर दिला गेला नाही.

९. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले गेले नाही.

१०. प्राथमिक शिक्षणात स्मरणावर अधिक भर देण्यात आला.

## ३.३ पारिभाषिक शब्द व अर्थ :

**ईस्लाम** : महंमद पैगंबरांनी शिकवण दिलेल्या धर्मास ईस्लाम म्हणतात.

**मक्ताब** : प्राथमिक शिक्षणाचे केंद्र

**मदरसा** : उच्च शिक्षणाचे केंद्र

**कुराण** : मुस्लिम समाजाचा धर्मग्रंथ

**बिसमिल्ला** : मुस्लिम समाजातील शिक्षणात प्रवेश घेते वेळी केला जाणारा विधी.

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

- **स्वयं अध्ययन प्रश्न – १**

  १) चूक

  २) बरोबर

  ३) चूक

  ४) चूक

  ५) चूक

  ६) चूक

- **स्वंय अध्ययन प्रश्न – २**

  १) इस्लामिक शिक्षणाचे प्राथमिक शिक्षण व उच्च शिक्षण हे दोन स्तर होते.

  २) इस्लामिक शिक्षणात प्राथमिक शिक्षण मक्ताब मध्ये दिले जात होते.

  ३) उच्च शिक्षण दिले जात होते त्या केंद्रास मदरसा म्हणतात.

  ४) शिक्षणास सुरूवात करण्यापूर्वी 'बिसमिल्ला' हा धार्मिक विधी केला जाईल.

  ५) ज्ञानाचा प्रसार, इस्लाम धर्माचा प्रसार, नैतिकता वाढविणे, ऐहिक उन्नती साधने, राज्याला स्थैर्य व बळकटी आणणे व पर्यावरण संवर्धन ही इस्लामिक शिक्षणाची मुख्य ध्येये होती.

- **स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

  १) मक्ताब मधील शिक्षणात लेखन, वाचन व अंकगणित यावर भर दिला जाई.

  २) मदरसामधील शिक्षण लौकिक व धार्मिक प्रकारचे होते.

  ३) मक्ताब मध्ये अध्यापनासाठी मौखिक पद्धती वापरली जात होती.

  ४) बेशिस्त वागणाऱ्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा केल्या जात.

  ५) शिस्तप्रिय विद्यार्थ्यांना मान-सन्मानाची वागणूक दिली जाई.

## ३.५ सारांश

इस्लामिक काळातील शिक्षण हे वैदिक काळातील शिक्षणाहून भिन्न स्वरूपाचे होते. मुस्लिम राज्यकर्त्यांनी आपल्या राज्याला स्थैर्य व बळकटी यावी म्हणून शिक्षणात इस्लामच्या प्रसाराला विशेष प्राधान्य दिले. ज्या राज्यकर्त्यांनी शिक्षणात रस घेतला त्यांनी मक्ताब, मदरसा बांधण्यावर भर दिला. इस्लामचा प्रसार करण्यासाठी शिक्षणाची ध्येये, अभ्यासक्रम हे त्याच दृष्टिकोनातून तयार करण्यात आले होते. त्याचप्रमाणे शिक्षणाचा उपयोग भौतिक प्रगती साधण्यासाठी केला गेला. इस्लामिक काळात वाङ्मय निर्मितीला चांगले दिवस आले. शिक्षणाचा प्रसार फारसा झाला नाही. पाठांतरावर जास्त भर देण्यात आला. कुराणच्या अभ्यासावर भर दिला गेला. स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. इस्लामिक शिक्षण मोफत असल्याकारणामुळे श्रीमंत-गरीब सर्वांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

१) भारतातील इस्लामिक शिक्षणाची वैशिष्ट्ये लिहा.

२) भारतातील इस्लामिक शिक्षणाचा अभ्यसाक्रम सांगून अध्यापन पद्धती स्पष्ट करा.

३) इस्लामिक शिक्षणातील विद्यार्थी शिस्त व शिक्षकाची भूमिका विशद करा.

४) इस्लामिक शिक्षणाचे गुण-मर्यादा विशद करा.

**टीपा लिहा.**

अ) इस्लामिक शिक्षणाची ध्येये.

ब) इस्लामिक शिक्षणातील स्तर

क) मक्ताब मधील शिक्षण

ड) मदरसामधील शिक्षण

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

गद्रे गीता, गद्रे ल. रा. (१९७७) शिक्षणाचा इतिहास, नूतन प्रकाशन, पुणे.

देशपांडे के. ना, माळी आ. ल. (२००६) भारतीय शिक्षणाचा इतिहास नित्य नूतन प्रकाशन, पुणे

देशमुख एल. जी. (२००४) भारतातील शिक्षणाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

जाधव मोहन, भोसले आरती सरपोतदार प्राची (२००३) भारतातील शिक्षणाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

❖❖❖

## घटक – ४

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–१९८६

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

४.0 उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – १९८६
- ४.२.२ १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची वैशिष्टे
- ४.२.३ राष्ट्रीय अभ्यासक्रमाची सर्वसामान्य रचना
- ४.२.४ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची नाविन्यता
  - i) ऑपरेशन ब्लॅकबोर्ड मोहिम
  - ii) नवोद्य विद्यालय

४.३ पारिभाषिक शब्द

४.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न–उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यासानंतर तुम्हाला

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची वैशिष्टे स्पष्ट करता येतील.

२) राष्ट्रीय अभ्यासक्रमाची सर्वसामान्य रचना सांगता येईल.

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची नाविन्यता विशद करता येईल.

४) ऑपरेशन ब्लॅकबोर्ड व नवोदय विद्यालय यातील नाविन्यता सांगता येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

शिक्षणाने व्यक्ती व समाज या दोहोंचे उन्नयन साधायचे असते. व्यक्तीच्या बहुमुखी विकासाचे ध्येय त्याचबरोबर त्याच्या क्षमतांचा पूर्ण विकास हे शिक्षणाचे उद्दिष्ट असते. त्याचबरोबर सामाजिक विकासात व्यक्तिला आपल्या क्षमतांचा सदुपयोग करण्याला प्रेरित करून प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्ष, स्वतंत्र विचारांचा, वैज्ञानिक जाणिवा असलेला व ज्ञानाच्या प्रस्फोटात सक्षमतेने ज्ञान व कौशल्य आत्मसात करणारा समाज घटक व पर्यायाने राष्ट्राचा घटक निर्माण करणे शिक्षण प्रक्रियेचे ध्येय असते.

स्वतंत्र भारताच्या शैक्षणिक इतिहासामध्ये अशाच प्रकारचे व्यापक ध्येय समोर ठेवून विविध शिक्षण आयोग व समित्या नेमल्या. नेमलेल्या प्रत्येक आयोगाने व समितीने भारतीय शिक्षण पद्धतीला पुढे नेण्याचेच कार्य केले. स्वातंत्र्योत्तर भारतीय शैक्षणिक वाटचालीत १९६८ च्या शिक्षणविषयक धोरणाचे महत्त्व लक्षणीय आहे. परंतु अंमलबजावणी स्तरावर म्हणावे तितके यश प्राप्त झाले नाही. शिक्षणाच्या विकासासाठी जो बहुव्यापक (Comprehensive) दृष्टिकोन मांडला होता त्याकडे दुर्लक्ष झाले. शिक्षणाच्या सर्व स्तरांवरील गुणवत्तेचा विकास हवा त्या प्रमाणात होऊ शकला नाही. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील शिक्षण विषयक पहिले धोरण असणारे १९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अपेक्षित ध्येय साध्यतेमध्ये, अंमलबजावणीच्या अंगाने कमी पडले. यामुळेच संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे पुनरावलोकन करण्याची व त्या आधारे नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली.

## ४.२ विषय विवेचन :

भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी भारताच्या २१ व्या शतकातील पदार्पणाच्या दृष्टिने नवीन शैक्षणिक धोरण ठरविण्याचा मानस व्यक्त केला. ''शिक्षण हा मानवी विकासाचा केंद्रबिंदू आहे. शिक्षण पद्धती अंमलात येण्यासाठी बराचसा कालावधी लागतो. त्यामुळे वेगाने पाऊले उचलली पाहिजेत. लोकसंख्या म्हणजे समस्या नसून एक उत्पादक शक्ती आहे व ती एक जमेची बाजू आहे असा आपण विचार केला पाहिजे.'' अशी अपेक्षा राजीव गांधी यांनी आपल्या नवीन शैक्षणिक धोरणाबाबत व्यक्त केली. या अपेक्षेतूनच त्यांनी राष्ट्राला वैज्ञानिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये एकविसाव्या शतकाकडे घेऊन जाण्यासाठी सक्षम असते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देण्याचे अभिवचन दिले. शिक्षण मंत्रालयाने हे काम हाती घेऊन २० ऑगस्ट १९८५ रोजी

शैक्षणिक आव्हान एक धोरणात्मक यथार्थ दर्शन हा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालामध्ये प्रमुख असे चार भाग होते ते पुढीलप्रमाणे

१) शिक्षण, समाज आणि विकास

२) शैक्षणिक विकासाचे विहंगमावलोकन

३) समीक्षणात्मक मूल्यमापन

४) शैक्षणिक पुनर्रचनाविषयक दृष्टिकोन

या प्राथमिक अहवालावर विस्तृत चर्चा करून सुधारित अहवाल तयार केला. पुढे १३ मे १९८६ रोजी या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणचा स्विकार केला. या शैक्षणिक धोरणातील महत्वाच्या तीन बाबी आहेत.

१) शैक्षणिक आव्हान

२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

३) कृती कार्यक्रम

केवळ चांगले धोरण असून भागत नाही. हे धोरण राबविणारी शासकीय यंत्रणा, धोरण राबविण्याकरिता लागणारा आवश्यक तो वित्तपुरवठा व देशहिताची जाणीव ही नागरिकांच्या ठिकाणी असणे आवश्यक असते. त्यांच्यात राष्ट्रीय धोरणाविषयी आत्मीयता निर्माण झाली पाहिजे म्हणजे कागदावरील धोरण प्रत्यक्ष अंमलबजावणीत येते. नागरिकांचा सहयोग व जबाबदारीची जाणीव यांच्या ठिकाणी असणे यावर धोरणाचे यश अवलंबून असते.

### ४.२.१ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – १९८६ :

१९६८ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे स्वतंत्र भारताच्या इतिहासातील शिक्षणविषयक पहिले धोरण होते. हे धोरण स्वीकारल्यानंतर १९८६ पर्यंत देशात बरेच बदल घडून आले. नव्या गरजा निर्माण झाल्या. या पार्श्वभूमीवर १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. त्याची कार्यवाही योग्य दिशेने व्हावी म्हणून मानवी संसाधन विकास मंत्रालयाने कृती कार्यक्रम विकसित केला. या कृती कार्यक्रमाबरोबरच या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची निश्चित अशी काही उद्दिष्टे होती.

१) शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सौंदर्यदृष्टीचा व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न करणे.

२) वैज्ञानिक दृष्टिकोन व लोकशाही वृत्तीची जोपासना करणे.

३) अपरिचित परिस्थितीला तोंड देण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करणे.

४) भौतिक, सामाजिक, तांत्रिक, सांस्कृतिक व आर्थिक परिस्थितीची जाणीव निर्माण करणे.

५) श्रमप्रतिष्ठेबाबत निरोगी मन तयार करणे.

६) सर्व धर्मसमभाव व सामाजिक न्यायाची तत्त्वे अंगी बाणणे.

७) राष्ट्रीयत्त्वाची भावना राष्ट्र सन्मानाकरिता स्वतःला वाहून घेण्याची भावना राष्ट्रविकासाच्या दृष्टिने तयार करणे.

८) आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी विद्यार्थ्यांची मनोधारणा निर्माण करणे.

९) नैतिक मूल्यांची जोपासना करणे.

या निश्चित असा उद्दिष्टांवर १९८६ चे धोरण निश्चित करण्यात आले होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षणाचे सार व भूमिका मांडताना शिक्षण हा आपल्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे असे म्हंटले आहे. शिक्षणाची एक विशिष्ट भूमिका आहे. ते संवेदनशीलता आणि दृष्टिकोन शुद्ध करते. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता, वैज्ञानिक दृष्टिकोन, विचारांचे व आत्माचे स्वातंत्र्य याचा लाभ होतो. शिक्षणामुळे मनुष्यबळ वाढील लागते. त्यामुळे राष्ट्र आत्मनिर्भर होईल. शिक्षण ही आजची आणि उद्याची एकमेवाद्वितीय अशी गुंतवणूक आहे. यासारखी तात्विक भूमिका व निश्चित उद्दिष्टे घेऊन १९८६ चे शैक्षणिक धोरण मांडले गेले. हे अत्यंत वैशिष्टयपूर्ण असे शैक्षणिक धोरण आहे. त्याची प्रमुख वैशिष्टे आता आपण पाहणार आहोत.

## ४.२.४ १९८६ च्या शैक्षणिक धोरणाची वैशिष्टे

विशिष्ट तात्त्विक भूमिका व त्यासाठी निश्चित असा कृतिकार्यक्रम हाती घेवून २१ व्या शतकात गतिमान वाटचाल करण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी व मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असणारे १९८६ चे शैक्षणिक धोरण ज्या वैशिष्टयामुळे महत्त्वपूर्ण ठरते त्याचा तपशील येथे दिला आहे.

### १) शिक्षणाचा भूतकाळ व भविष्यकाळ यात मेळ :

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यथोचित दखल घेण्याबरोबर भविष्यकालीन गरजांचा वेधही घेण्यात आला आहे. अशा प्रकारे शिक्षणाचा भूतकाळ व भविष्यकाळ यात समन्वय साधून क्रमशः विकासाची वाटचाल निश्चित करण्यात आली. २० वे शतक संपताना भारताची लोकसंख्या शंभर कोटीवर पोहोचेल असा अंदाज लक्षात घेवून त्या दृष्टिने शैक्षणिक धोरण व त्या अनुषंगाने कृतिकार्यक्रम आखले पाहिजे. मानव साधनसामग्रीचा विकास केंद्रस्थानी ठेवून त्यादृष्टिने शैक्षणिक ध्येय धोरणांची अंमलबजावणी झाली पाहिजे असे या धोरणात स्पष्ट केले आहे.

### २) संविधानाधारे राष्ट्रीय शिक्षण पद्धतीनुसार शिक्षण

राष्ट्रीय शिक्षणपद्धतीची संकल्पना संविधानातील तत्त्वांवर आधारित आहे. विशिष्ट स्तरापर्यंत सर्व विद्यार्थी मग ते कोणत्याही जातीचे, वंशाचे, भागातले असो वा पुरूष, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता आले पाहिजे हे राष्ट्रीय शिक्षणपद्धतीत गृहीत धरले आहे. संविधानातील विविध कलमातील तरतुदींवर आधारित राष्ट्रीय शिक्षण पद्धतीनुसार शिक्षणाची तरतुद हे या धोरणाचे महत्त्वपूर्ण व मूलभूत असे वैशिष्ट्य आहे. सर्वांसाठी शिक्षणाचा समान असा एकच आकृतिबंध सुचविण्यात आला. शिक्षण ही आजची व उद्याची एकमेवा द्वितीय अशी गुंतवणूक होय असा या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. यासाठी समान राष्ट्रीय अभ्यासक्रम हा विचार प्रथमच प्रस्तुत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आला. याबरोबर १९६८ च्या धोरणात शिफारस केल्याप्रमाणे, सर्वांसाठी एकच शाळा या पद्धतीचा अवलंब करण्यासाठी पावले उचलण्यात येतील ज्यामुळे शिक्षणाची समान संधी सर्वांना मिळू शकेल.

### ३) शिक्षणाची समान संधी व समानतेकरिता शिक्षण

सामाजिक विषयमता दूर करण्याच्या तत्त्वानुसार देशातील वर्गीकृत जाती जमाती, स्त्रिया, अल्पसंख्याक व अपंग यांना शिक्षणाची समान संधी देण्यास १९८६ चे शैक्षणिक धोरण कटिबद्ध आहे. स्त्रियांची निरक्षरता व त्यांना प्राथमिक शिक्षणात येणारे अडथळे दूर करण्याकरिता प्राथमिक शिक्षणाला सर्वाधिक प्राधान्य देण्यात येईल. स्त्री-पुरूष भेदावर आधारित साचेबद्धपणा घालविण्याचा जोरकस प्रयत्न या धोरणाद्वारे व्यक्त करण्यात आला.

सर्व शैक्षणिक पातळ्यांवर व सर्व क्षेत्रांमध्ये ग्रामीण स्त्री, ग्रामीण पुरूष यांस वर्गीकृत जाती जमातींना इतर प्रमुख प्रवाहाबरोबर आणणे हे शैक्षणिक विकासाचे प्रमुख धोरण निश्चित करण्यात आले. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याकरिता अल्पसंख्याकांनी स्वतःच्या शैक्षणिक संस्था सुरू करणे व त्या चालविणे तसेच त्यांच्या भाषा व संस्कृति यांना संरक्षण देणे असा प्रयत्न करणे यात अपेक्षित होते. शारीरिक व मानसिक दृष्ट्या अपंग असणाऱ्याकरिता विशेष लक्ष पुरविले जाणार ज्यातून त्यांच्या शिक्षणाची गरज पूर्ण होऊ शकेल.

### ४) विविध स्तरावर शिक्षणाची पूर्नरचना

शिक्षणाच्या पूर्व प्राथमिक स्तरापासून शिक्षणाच्या उच्च स्तरापर्यंत पुनर्रचना करण्याचे धोरण आखण्यात आले. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची पार्श्वभूमी म्हणून पूर्व प्राथमिक शिक्षणाचाही प्राधान्याने विचार केला गेला. पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टिने बालसंगोपनगृहे स्थापन करणे, मुलामुलींचा सांभाळ करणाऱ्यांना शिक्षण घेण्याची संधी देणे व कर्मचारी स्त्रियांना शिशुसंगोपनासाठी आधार देणे या बाबीकडे विशेष लक्ष दिले. त्यादृष्टिने एकात्मिक बालविकास कार्यक्रमाचा स्वीकार केला. पूर्व प्राथमिक शिक्षणात क्रीडापद्धतीचा स्वीकार, औपचारिक शिक्षण पद्धतीवरील भर कमी करणे याचा उल्लेख आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर सार्वत्रिकरणाच्या दृष्टिने काही धोरणात्मक बाबी आखण्यात आल्या. यामध्ये सार्वत्रिक नोंदणी, १४ वर्षापर्यंतच्या मुलामुलींच्या सातत्यपूर्ण व गुणवत्तायुक्त शिक्षण देणे, प्रारंभी अनुतीर्ण न करणे, गळती थांबविणे, शारीरिक शिक्षा न देणे, शाळेत शैक्षणिक किमान सोयीसुविधा उपलब्ध करून देणे. प्रत्येक शाळेत किमान दोन शिक्षण व त्यातील एक महिला शिक्षक या धोरणात्मक बाबींचा विचार केला होता.

विशेष संस्थामधून किंवा माध्यमिक शिक्षणात बदल करून व्यावसायिक शिक्षण, प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी शाळा, प्रयोग करण्याचे स्वातंत्र्य असलेल्या निवासी व निःशुल्क विशेष शाळा (Special School) या बाबी माध्यमिक शिक्षणाच्या दृष्टिने करण्यात आल्या. प्रस्तुत धोरणाप्रमाणे १९९० पर्यंत १०% व १९९५ नंतर २५% विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रम करतील. व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने विशेष प्रयत्न करणे अपेक्षित होते.

विद्यापीठीय शिक्षणात क्षमतेनुसार प्रवेश, सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या सोयी वाढविणे, संशोधनानुसार भरीव मदत करणे व व्यवस्थापनासाठी स्वायतत्ता देणे, शिक्षणाच्या लोकशाहीकरण करण्याच्या दृष्टीने मुक्त विद्यापीठ स्थापन करणे, १९८५ मध्ये स्थापन झालेल्या इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाला समृद्ध करणे, पदवी व नोकरी यातील संबंध तोडणे, नवीन रूपरेषेप्रमाणे ग्रामीण विद्यापीठाची स्थापना करणे इत्यादी बाबींचा समावेश उच्च शिक्षणातील पुर्नरचनेत केल्याचे दिसून येते.

### ५) शिक्षक प्रशिक्षणात आधुनिकता :

शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील केंद्रबिंदू होय. शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. त्यादृष्टिने सक्षम शिक्षण पद्धती राबविण्याकरिता शिक्षक प्रशिक्षणात अमुलाग्र बदल करणे आवश्यक आहे. अध्यापनाच्या पद्धतीत सुधारणा व कमी खर्चिक शैक्षणिक साहित्य निर्मिती करून त्याचा अधिकाधिक वापर याद्वारे आधुनिकता आणता येईल. त्याकरिता शिक्षक प्रशिक्षणाचे व्यापक स्वरूपाचे कार्यक्रम हाती घेतले जातील. सेवेत असणाऱ्या शिक्षकांसाठी सेवांतर्गत अल्पावधी प्रशिक्षण कार्यक्रम, उद्बोधन वर्ग, चर्चासत्रे. यासारखे कार्यक्रम व्यापक स्वरूपात राबविण्याची तरतूद या धोरणाने केलेली दिसून येते.

### ६) शिक्षणात राष्ट्रीत उत्पन्नाच्या सहा टक्के गुंतवणूक

१९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमुद केल्याप्रमाणे राष्ट्रविकासासाठी शिक्षणातील गुंतवणूक ही राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के असावी. शिक्षणातील या सहा टक्के गुंतवणुकींचा पाठपुरावा या धोरणानेही केल्याचे दिसून येते. सदर सहा टक्के गुंतवणूकीकरिता पुढे वेळोवेळी प्रत्यक्ष लागणाऱ्या निधीची गरज योजनाबद्ध कार्यक्रमाद्वारे जाणून घेतली जाईल.

सातव्या पंचवार्षिक योजनाकाळात शिक्षणावर होणारा खर्च निर्धारित करणे व आठव्या पंचवार्षिक योजनेपासून सहा टक्के गुंतवणूकीचे ध्येय ठेवून भविष्यकाळात ही मर्यादा ओलांडण्याचा प्रयत्न करणे या शैक्षणिक धोरणानुसार अपेक्षित होते. शिक्षणासाठी अपुरी गुंतवणूक केली तर त्याचे भयानक व वाईट परिणाम देशाला सहन करावे लागतील. असा स्पष्ट इशारा या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आहे. दर पाच वर्षांनी या धोरणाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला पाहिजे. असे या धोरणात नमूद करण्यात आले आहे.

### ७) प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षणावर भर :

प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षणावर भर देण्याच्या दृष्टिने विविध व्यापक स्वरूपातील कार्यक्रम याविषयी या धोरणात निर्देश केले आहेत. १५ ते ३५ या वयोगटातील व्यक्तीची निरक्षरता दूर करण्यासाठी राष्ट्राने प्रतिज्ञा केली पाहिजे. त्याकरिता केंद्रसरकार, राज्य सरकार, राजकीय पक्ष व त्यांच्या संघटना, जनसंपर्क माध्यमे व विविध शैक्षणिक संस्था यांनी मोठ्या प्रमाणात साक्षरता प्रसाराचे विविध कार्यक्रम राबविण्याकरिता कटिबद्ध झाले पाहिजे. असे हे धोरण सांगते. शिक्षणाची क्षमता वाढविणे व निरंतर शिक्षणावर भर देणे याकरिता विविध उपाययोजना या धोरणात सुचविल्या आहेत. प्रौढ शिक्षण व निरंतर शिक्षण यासाठी आकाशवाणी, दूरदर्शन आणि चित्रपट या जनसंपर्क माध्यमांचा उपयोग करण्याचेही या धोरणाने सुचविले आहे.

अशाप्रकारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला जी वैशिष्ट्यपूर्णता प्राप्त झाली त्यात १९८६ च्या शिक्षणाची समान संधी, विविध स्तरावरील शिक्षणाची पुर्नरचना, शिक्षक प्रशिक्षणात आधुनिकता, राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के शिक्षणातील गुंतवणूक, प्रौढ व निरंतर शिक्षणावर भर या सारख्या प्रमुख वैशिष्टयाबरोबरच राष्ट्रीय शिक्षण पद्धत हे एक वैशिष्ट्य असल्याचे दिसते. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आणखी एक वैशिष्टयपूर्ण भाग म्हणजे राष्ट्रीय अभ्यासक्रम हा होय. त्यामुळेच यानंतर आपण राष्ट्रीय अभ्यासक्रमाविषयी माहिती पाहणार आहोत.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १**

रिकाम्या जागी योग्य शब्द निवडा.

१) स्वतंत्र भारताच्या शैक्षणिक इतिहासातील १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे ---- धोरण आहे.

अ) पहिले ब) दुसरे क) तिसरे ड) चौथे

२) १९८६ च्या राष्ट्रीय धोरणानुसार राष्ट्रीय उत्पन्नाच्या गुंतवणूक शिक्षणामध्ये करावी.

अ) ३% ब) ४% क) ५% ड) ६%

३) प्रौढ शिक्षणांतर्गत ------- या वयोगटातील व्यक्तींना साक्षर करणे अपेक्षित होते.

अ) १४ ते ३० ब) १५ ते ४० क) १५ ते ३५ ड) १८ ते ४०

### ४.२.३ राष्ट्रीय अभ्यासक्रमाची सर्वसामान्य रचना :

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्त्वपूर्ण बाब यांची जेव्हा चर्चा होते; तेव्हा राष्ट्रीय शिक्षण पद्धतीचा उल्लेख प्रामुख्याने होतो. या राष्ट्रीय शिक्षणाचा मूलभूत आधार म्हणजे संपूर्ण भारतात एक समान शैक्षणिक आकृतिबंध व समान राष्ट्रीय अभ्यासक्रम हा होय. समान शैक्षणिक आकृतीबंध आता भारतातील जवळ जवळ सर्व राज्यात अंमलात आला आहे. त्याप्रमाणेच समान राष्ट्रीय अभ्यासक्रम असावा. त्याची रूपरेषा असावी व त्या अनुषंगाने आवश्यक ते स्वातंत्र्य घेऊन आपल्या सर्वसंमत या निकषानुसार अभ्यासक्रम तयार करून तो लवकरात लवकर अंमलात आणावा ही राष्ट्रीय धोरणाची अपेक्षा आहे. राष्ट्रीयता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद व राष्ट्रप्रेम ही मूल्ये राष्ट्रीय स्तरावर पायाभूत अभ्यासक्रमाद्वारे (Core Curriculum) निर्माण व्हावी असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या अभ्यासक्रमाची राष्ट्रीय स्तरावर सर्वमान्य रचना ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध शिक्षणविषयक परिषदांच्या चर्चेतून साकार झाली आहे. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता टप्प्याटप्प्याने उद्दिष्टाप्रत जाण्याचा एक संपूर्ण कार्यक्रम असून तो राष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन परिषद (NCERT) नवी दिल्ली या संस्थेने तयार केला आहे. या कार्यक्रमाचे तीन महत्वाचे विभाग असून त्याचे ३५ उपविभाग (Modules) आहेत. प्रत्येक विभागात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची सर्वसामान्य रुपरेषा व तात्त्विक विवेचन असून दुसऱ्या विभागात प्राथमिक शाळेच्या शिक्षणाकरिता करावयाच्या कार्याची माहिती दिलेली आहे.

''राष्ट्रीय अभ्यासक्रम'' ही १९८६ च्या शैक्षणिक धोरणातील एक अभिनव कल्पना आहे. संपूर्ण भारतात एक समान शैक्षणिक आकृतिबंध असावा या कोठारी आयोगाच्या विचारसरणीवर आधारित एक समान शैक्षणिक आकृतिबंधाबरोबरच एकसमान राष्ट्रीय अभ्यासक्रम हा विचार प्रथमच प्रस्तुत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करण्यात आला आहे. एक समान राष्ट्रीय अभ्यासक्रम हा विचार मांडताना समान अभ्यासक्षेत्राचा विचार करण्यात आला आहे. या समान अभ्यासक्षेत्राचा किंवा पायाभूत घटकांचा विचार आता आपण करणार आहोत.

**राष्ट्रीय अभ्यासक्रमातील अभ्यासक्षेत्रे :**

ज्या मूलभूत अशा दहा गाभा घटकांवर किंवा पायाभूत अभ्यासक्षेत्रावर हा राष्ट्रीय अभ्यासक्रम तयार केला

आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश आहे.

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

२) भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या

३) राष्ट्रीय अस्मिता जोपसण्यासाठी आवश्यक आशय

४) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा.

५) समानतावाद (Egalitarianism) लोकशाही व धर्मनिरपेक्षता.

६) स्त्री –पुरूष समानता

७) पर्यावरण संरक्षण

८) सामाजिक अडसरांचे निर्मूलन

९) लहान कुटुंबाचा आदर्श

१०) वैज्ञानिक मनोवृत्तीची रूजवणूक.

राष्ट्रीय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेले हे दहा गाभा घटक हे स्वतंत्र अभ्यासवयाचे विषय नव्हेत तर विविध विषयामध्ये या सर्व घटकांचा समावेश असेल. या घटकांचे प्रतिबिंब हे विविध अभ्यासक्रमात, त्यांच्या उद्दिष्टात, विविध विषयांच्या आशयात पडलेले असणे आवश्यक व अपेक्षित होते.

इ. १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी जी अभ्यासयोजना राष्ट्रीय अभ्यासक्रमात सुचविली आहे. ती पुढीलप्रमाणे

१) प्राथमिक स्तरावर एक भाषा, पुढे उच्च प्राथमिक स्तरावर आणि माध्यमिक स्तरावर तीन भाषा यामध्ये हिंदी व इंग्रजीचा समावेश असेल.

२) गणित

३) परिसर अभ्यास (विज्ञान व सामाजिकशास्त्रे)

४) कार्यानुभव/समाजोपयोगी उत्पादक कार्य/ व्यवसायपूर्ण प्रशिक्षण

५) आरोग्य आणि शारीरिक शिक्षण

६) कला शिक्षण

राष्ट्रीय अभ्यासक्रमातील सर्व विषय हे इ. १० वी पर्यंत विद्यार्थ्यांना आवश्यक असे असतील. इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी समान स्वरूपाची अभ्यासयोजना विकसित करावी. या अभ्यास योजनेत वैकल्पिक विषयांचीही सोय असेल. या स्तरावर शैक्षणिक व व्यावसायिक अशा दोन विद्याशाखा निर्माण केल्या जाण्यात अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे.

प्राथमिक स्तरावर मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे. यानंतरच्या शिक्षणाच्या स्तरावर कोणतीही आधुनिक भारतीय भाषा शिक्षणाचे माध्यम ठेवावे.

अभ्यासक्रम हे शिक्षणाची राष्ट्रीय उद्दिष्टे गाठण्याचे साधन आहे. आपल्या देशाची परिस्थिती, आपली उपलब्ध साधनसामग्री व आर्थिक स्थिती यांचा विचार करून व आधुनिक काळाची गरज लक्षात घेऊन राष्ट्रीय अभ्यासक्रम तयार केलेला आहे. या अभ्यासक्रमाद्वारे भारतात सर्वत्र समान शैक्षणिक दर्जा, समान मूल्ये व राष्ट्रीय एकात्मतेचा आधार तयार व्हावा हा विचार आधारभूत होता. यासाठीच राष्ट्रीय अभ्यासक्रमात मूल्यशिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रसार, परिसर शिक्षण, गणित व शास्त्राचे प्रगत अध्यापन, क्रीडा व शारीरिक शिक्षण, युवकांची भूमिका व मूल्यमापन आणि परीक्षा सुधारणा कार्यक्रम या बाबींवर विशेष भर दिला आहे. या बाबींचीच चर्चा आता आपण करणार आहोत.

### १) मुल्य शिक्षण

ज्यासाठी आपण जगतो त्या कल्पना किंवा आदर्श म्हणजे मूल्य होय. मुल्य माणसाला पशुतूल्य जीवन जगण्यापासून परावृत्त करतात आणि विवेकबुद्धीने वागण्यास प्रेरणा देतात. म्हणूनच मुल्याधिष्ठित व्यक्तिमत्व घडविणे हे शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे. पण हे कार्य अत्यंत व्यापक स्वरूपाचे असल्यामुळे केवळ वर्ग खोलीतील शिक्षणावर याकरिता अवलंबून राहता येणार नाही. भारतीय जीवनाची मुल्ये ढासळत असून उच्च दर्जाची सामाजिकता व नैतिकता सांभाळायची जबाबदारी मुल्यशिक्षण या अभ्यासक्रमातील घटकावंर येते. समाजात नैतिक मुल्यांचा वाढत चाललेली उपहासवृत्ती हा चिंतेचा विषय आहे. त्यादृष्टीने मूल्यशिक्षणातून धर्मवेडे, दैववाद, हिंसाचार, लोकभ्रम नाहीसा करणे आवश्यक आहे. यासाठीच मूल्यशिक्षणाची तरतूद राष्ट्रीय अभ्यासक्रमात करण्यात आली होती.

### २) शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रसार :

मानवी जीवनातच्या सर्वच कक्षा तंत्रज्ञानाकडून व्यापले जाताना शिक्षण क्षेत्रही त्यापासून अलिप्त राहू शकणार नव्हते. त्यादृष्टीने शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढून त्याचा प्रसार शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण दुर्गम भागापर्यंत पोहोचले पाहिजे. औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून हा प्रसार कला व संस्कृती यांचे आदान प्रदान करण्यासाठी, ज्ञान देण्यासाठी झाला पाहिजे. शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या प्रसाराकरिता शिक्षक प्रशिक्षण व शिक्षकांना पुन्हा पुन्हा शिक्षण देण्याची गरज आहे. ज्या गावात वीज गेलेली नाही तेथे बॅटरी किंवा सौरघटांचा वापर करून हे ज्ञान पोहोचविले पाहिजे. राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ व दूर शिक्षण जनतेपर्यंत पोहोचविण्याचा या धोरणात निर्धार आहे.

### ३) परिसर शिक्षण :

परिसराचे योग्य ज्ञान विद्यार्थ्यांना देण्याची नितांत आवश्यकता या राष्ट्रीय अभ्यासक्रमात व्यक्त केली आहे. विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व वयाच्या लोकांना हे ज्ञान देण्याची गरज आहे. परिसराची जाणीव ही शाळा महाविद्यालयातील अभ्यासक्रमातून निर्माण झाली पाहिजे.

### ४) गणित व शास्त्राचे अध्यापन :

गणित व शास्त्र विषयाच्या मदतीने वैज्ञानिक विचार, कार्यकारणभाव, तार्किक विचार, पृथक्करण कौशल्य याबाबी विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाल्या पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाशी मेळ घालण्याच्या दृष्टिने या दोन विषयांच्या अभ्यासक्रमाची पुर्नरचना केली जाईल. आरोग्य, शेती, उद्योग व जीवनाशी संबंधित विविध अंगाशी

विज्ञानाचा संबंध प्रस्थापित करणे व त्याचे व्यापक स्वरूपात ज्ञान देणे याकरिता विज्ञान शिक्षणाचे कार्यक्रम आखले जातील. विज्ञान व गणित शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांत चौकसबुद्धी, सृजनशीलता, प्रश्नांचा वस्तुनिष्ठ विचार करण्याचे व प्रश्न विचारण्याचे धैर्य व सौदर्यदृष्टी विकसित करण्याचे ध्येय राहील.

**५) क्रीडा व शारीरिक शिक्षण :**

राष्ट्रीय स्तरावर शारीरिक शिक्षण व क्रीडा यांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव व त्यादृष्टाने अभ्यासक्रमाची पुनर्रचना असा विचार सर्वप्रथम या धोरणात व्यक्त झाला. शाळासुधार राष्ट्रव्यापी कार्यक्रम म्हणून शाळांना क्रीडांगणे, क्रीडासाहित्य, खेळाचे शिक्षक असा भाग राहील. शहरी विभागात क्रीडांगणे, क्रीडासाहित्य उपलब्ध करून देणे; खेळात प्राविण्य संपादित करणाऱ्यांना उत्तेजन देणे असा कार्यक्रम राहील. शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाला या दृष्टिने समृद्ध केले जाईल.

**६) युवकांची भूमिका :**

राष्ट्रीय विकासात व समाजविकासात युवकांची भूमिका महत्त्वाची असल्यामुळे त्यांना शैक्षणिक संस्था व शैक्षणिक संस्थांच्या बाहेर स्वतःचा विकास करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना यात विद्यार्थ्यांनी भाग घेण्याकरिता युवकांना प्रवृत्त केले जाईल. समाजसेवा, राष्ट्रप्रेम या भावनांचा परिपोष युवकांमध्ये निर्माण करण्यास हे उपक्रम उपयुक्त ठरतील.

**७) मूल्यमापन व परीक्षा सुधारणा कार्यक्रम :**

अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणून मूल्यमापन व त्यादृष्टीने परीक्षा यंत्रणेची पुनर्रचना आणि विश्वसनीय मूल्यांकन पद्धती महत्त्वाची ठरते. बाह्य मूल्यमापनावरील ताण कमी करून अंतर्गत मूल्यमापन पद्धतीत सुधारणा केल्या जातील. या सुधारणात पाठांतरावरील भर कमी करणे, प्रश्नांच्या उत्तरातील व्यक्तिनिष्ठता कमी करणे, अभ्यासातंर्गत व अभ्यासपूरक कार्यक्रमाचे सातत्याने मूल्यमापन करणे, माध्यमिक स्तरावर टप्प्याटप्प्याने सत्र पद्धती सुरू करणे, गुणांच्या ऐवजी श्रेणीचा वापर वगैरे बाबींचा समावेश राहील. या मूल्यमापन व परीक्षा सुधारणा कार्यक्रमाचा हेतूच मूल्यमापन प्रक्रियेत पारदर्शकता आणून विश्वसनियता प्रस्थापित करणे हा होता.

अशाप्रकारे राष्ट्रीय अभ्यासक्रमात मूल्यशिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रसार, परिसर शिक्षण, गणित व शास्त्राचे प्रगत अध्यापन, क्रीडा व शारीरिक शिक्षण युवकांची भूमिका, मूल्यमापन आणि परीक्षा सुधारणा कार्यक्रम या बाबींवर विशेष भर दिला असल्याचे दिसते. या अभ्यासक्रमाद्वारे संबंध भारतात समान मूल्य व राष्ट्रीय एकात्मतेचा आधार तयार व्हावा ही अपेक्षा असणारा अभ्यासक्रम अनेक वैशिष्टयांनी युक्त असा असल्याचे दिसते. त्यातील ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

१) भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत असलेल्या वैयक्तिक व सामाजिक मूल्यांचा विकासावर भर.

२) राष्ट्रीय विकासाचा उद्दिष्ट प्राप्तीसाठी मनुष्यबळाचा सुयोग्य वापर.

३) प्राथमिक व माध्यमिक स्तरावर शिकणाऱ्यांना अधिक सकस शिक्षण.

४) अध्यापनकेंद्री पद्धतीपेक्षा अध्ययन करणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या पद्धतींचा अधिक वापर.

५) अध्ययन घटक व शैक्षणिक अनुभूती यात लवचिकता, अधिक चांगल्या अध्ययन निष्पतींची साध्यता.

६) सर्व शिकणाऱ्यांना त्यांच्या उपलब्ध साधनसामग्रीनुसार अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी.

७) शिकणाऱ्यांना अत्यावश्यक सोयी सुविधांची व साधनांची शाळांतून उपलब्धता.

उच्च दर्जाची सामाजिक नैतिकता निर्माण करण्याच्या दृष्टिने हा अभ्यासक्रम उपयुक्त व वैशिष्ट्यूपर्ण असल्याचे लक्षात येते. १९८६ च्या धोरणाने राष्ट्रीय अभ्यासक्रमाबरोबरच काही महत्त्वपूर्ण व तेवढेच नाविण्यपूर्ण असे कार्यक्रम, उपक्रम शिक्षण प्रक्रियेत आणल्याचे दिसून येते. त्या दृष्टीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची नाविन्यता असणाऱ्या घटकाची चर्चा पुढे करण्यात आली आहे.

**▶ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

रिकाम्या जागी योग्य शब्द निवडा.

१) राष्ट्रीय अभ्यासक्रमामध्ये ---- अभ्यासक्षेत्रांचा विचार करण्यात आला आहे.

अ) ०५ ब) ०७ क) १० ड) १२

२) प्राथमिक स्तरावर ---- हेच शिक्षणाचे माध्यम असावे.

अ) राष्ट्रभाषा ब) मातृभाषा क) राज्यभाषा ड) इंग्रजी

३) परीक्षा सुधारणा कार्यक्रमातंर्गत ---- मूल्यमापनावरील ताण कमी करणे अपेक्षित होते.

अ) बाह्य ब) अंतर्गत क) स्थाननिश्चिती ड) निदानात्मक

## ४.२.४ राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची नाविन्यता :

राष्ट्राचा योग्य रीतीने विकास हा चांगल्या शैक्षणिक धोरणावर अवलंबून असतो. शैक्षणिक धोरणाला हा चांगला दर्जा त्याच्या वाढविणारी असणे मात्र गरजेची असते. १९८६ च्या शैक्षणिक धोरणाचा विचार केला असता, यात अनेक नाविन्यपूर्ण बाबींचा विचार करण्यात आलेला दिसतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची नाविण्यता दर्शविणाऱ्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे

१) ऑपरेशन ब्लॅकबोर्ड मोहीम

२) नवोदय विद्यालये

३) पदवी व नोकरी संबंध विच्छेद

४) शिक्षणाचे व्यवस्थापन

५) शिक्षकाची भूमिका

### १. ऑपरेशन ब्लॅकबोर्ड मोहीम :

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी अत्यंत आवश्यक असणारी साधनसामग्री उपलब्ध करून देणे हा या मोहिमेचा उद्देश होता. ऑपरेशन ब्लॅकबोर्ड मोहिम (Operation Black Board) हा शब्दप्रयोग केवळ प्रतिकात्मक असून या संकल्पनेत प्राथमिक शाळांना केवळ फळा पुरविणे येथपर्यत मर्यादीत नाही. फळा म्हंटले की खडू याला व खडू फळा मोहिम असे म्हंटले की शिक्षकाचा पुरवठा आलाच. यापद्धतीने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा प्रश्न आता युद्धपातळीवर हाती घेणे आवश्यक झाले आहे.

ऑपरेशन (Operation) हा शब्दप्रयोगही अर्थवाही आहे. ऑपरेशनद्वारे रोग समूळ नाहीसा करण्याचे ध्येय असते व ऑपरेशनसाठी विविध साहित्याची आवश्यकता आहे. साहित्याच्या अभावी डॉक्टर शस्त्रक्रिया करू शकत नाही. एक शिक्षकी शाळा ही कल्पना आता कालबाह्य ठरावयास हवी. ऑपरेशन ब्लॅकबोर्ड मध्ये प्रत्येकी प्राथमिक शाळेत दोन शिक्षक असावे अशी अपेक्षा आहे. त्यापैकी एक महिला असावी अशी अपेक्षा आहे.

सर्व हवामानात वापरता येण्यासारख्या दोन खोल्या, नकाशा, तक्ते, खेळणी वगैरे आवश्यक शिकण्याची साधने पुरविण्याची हमी या मोहिमेत आहे. यासाठी शासकीय, स्थानिक संस्था, सेवाभावी संस्था व व्यक्ती यांच्यासाठी टप्प्याटप्याने साध्य करण्याचा कार्यक्रम हाती घेण्याचा निर्देश या धोरणात केला आहे.

### २) नवोदय विद्यालये :

ग्रामीण क्षेत्रातील बुद्धिमान विद्यार्थ्यांना योग्य संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने एक आदर्श विद्यालय स्थापन करणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्वाचे पाऊल होते. या दृष्टीने नवोदय विद्यालयाची स्थापना ही राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची नाविन्यपूर्ण बाब ठरते. प्रत्येक जिल्ह्याला एक आदर्श विद्यालय या स्वरूपात विद्यालयाची स्थापना व्हावी असे अपेक्षित होते, त्यादृष्टिने भारतात ऑक्टोबर १९८७ पर्यंत अशी २१० नवोदय विद्यालये स्थापन झाली. नवोदय विद्यालयात ७५% विद्यार्थी ग्रामीण भागातील तर २५% विद्यार्थी शहरी भागातील असावे. जिल्ह्यात अनुसूचित जाती जमातीचे प्रमाण लक्षात घेऊन त्यानुसार त्यातील मागासवर्गीय विद्यार्थी असावे. अनुसुचित जमातींमधील ७५% असावे. त्यापैकी १/३ मुली असाव्यात असे ठरविण्यात आले

नवोदय विद्यालये ही भारतात सर्वदूर स्थापन व्हावी असा प्रयत्न असल्यामुळे निरनिराळ्या नवोदय विद्यालयातील अभ्यासक्रमात समानता, समान शैक्षणिक दर्जा, समान परीक्षापद्धती यावर भर आहे. नवोदय विद्यालये ही केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न असतात. सुरूवातीला प्रवेश इयत्ता सहावीमध्ये दिला जाई.

इयत्ता सहावी ते आठवी पर्यंत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा व त्यानंतर १२ वी पर्यंत हिंदी किंवा इंग्रजी हे माध्यम राहील. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ही प्रादेशिक भाषेतून प्रवेश परीक्षेसाठी चाचण्या तयार करील व प्रवेश परीक्षेतील गुणांनुसार प्रवेश दिला जाईल.

प्रत्येक नवोदय विद्यालयाचा स्थापन खर्च एक कोटी गृहीत धरण्यात आला असून सातव्या पंचवार्षिक योजनेत नवोदय विद्यालयाच्या स्थापनेकरीता ५०० कोटींची तरतूद करण्यात आली. या विद्यालयाकरिता लागणारी जमीन राज्यशासनाने उपलब्ध करून द्यावी अशी अपेक्षा आहे. शक्यतो ही नवोदय विद्यालये ग्रामीण भागात स्थापन व्हावी व त्याद्वारे राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावी ही अपेक्षा आहे. नवोदय विद्यालयात चार प्रकारचे अभ्यासक्रम राहतील. त्यात कला, विज्ञान, वाणिज्य व व्यावसायिक शाखा यांतील अभ्यासक्रम राहील.

शारीरिक शिक्षण, योग शिक्षण, पर्यावरण शिक्षण तसेच श्रमप्रतिष्ठा व सांस्कृतिक कार्यक्रमांना अभ्यासक्रमात महत्त्वाचे स्थान राहील. भारतात नवोदय विद्यालयाची स्थापना सर्वप्रथम महाराष्ट्रात प्रायोगिक स्वरूपात करण्यात आली.

▶ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न ३**

रिकाम्या जागा भरा.

१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची नाविन्यता दर्शविणारा ---- हा घटक आहे.

अ) ग्रामीण विद्यालय ब) व्यावसायिक विद्यालय क) रात्र विद्यालय ड) नवोदय विद्यालय

२) ऑपरेशन ब्लॅकबोर्ड मध्ये प्रत्येक प्राथमिक शाळेत किमान --- शिक्षक असावे अशी अपेक्षा आहे.

अ) एक ब) दोन क) तीन ड) चार

३) भारतात नवोदय विद्यालयाची स्थापना सर्वप्रथम --- राज्यात प्रायोगिक स्वरूपात करण्यात आली.

अ) महाराष्ट्र ब) कर्नाटक क) बिहार ड) राजस्थान

## ४.३ पारिभाषिक शब्दांचे अर्थ

अभ्यासक्रम : अभ्यासक्रम म्हणजे पुस्तकी अध्यापनाशिवाय शाळेत मिळणाऱ्या इतर सर्व अपेक्षित अनुभवांचा आराखडा किंवा आखलेला कृतीकार्यक्रम होय.

**शैक्षणिक तंत्रज्ञान** : शिक्षणातील अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये वापरले जाणारे तंत्रज्ञान. उदा. चित्रफित, चित्रपट

**परीक्षा** : प्राप्त केलेली क्षमता, कौशल्य व ज्ञान यांचे मूल्यमापन करण्याचे लेखी, मौखिक व प्रात्यक्षिक स्वरूपातील तंत्र म्हणजे परीक्षा होय.

**मूल्यमापन** : निर्णयाप्रत येण्यासाठी माहितीचे संकलन व विश्लेषण करण्यासाठीची सुव्यवस्थित प्रक्रिया म्हणजे मूल्यमापन होय.

**उद्‌बोधन वर्ग** : एखादा नवा व्यवसाय किंवा अध्यापनासाठी एखादा नवा विषय व्यक्तीस किंवा समूहास द्यावयाचा असेल तर तो व्यवसाय किंवा विषय यांचे पूर्वज्ञान देणे आवश्यक असते; त्यासाठी जो वर्ग आयोजित केला जातो त्यास उद्‌बोधन वर्ग म्हणतात.

**उजळणी वर्ग** : सेवांतर्गत कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण काळात मिळविलेल्या ज्ञानाची उजळणी करून, अद्ययावत ज्ञान प्राप्तीद्वारा व्यावसायिक प्रगती साध्य करावी यासाठी आयोजित करण्यात आलेला वर्ग.

**सत्र परीक्षा पद्धती** : प्रत्येक शालेय सत्राच्या शेवटी त्या सत्रासाठी निर्धारित अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा घेऊन मूल्यमापन करणे म्हणजे सत्र परीक्षा पद्धती होय.

**शिक्षक प्रशिक्षण** : शिक्षकांसाठीचा व्यावसायिक शिक्षणासंबंधीचा सैद्धांतिक, प्रात्यक्षिक व अध्यापन सराव यांनी युक्त सेवापूर्व व सेवातंर्गत अभ्यासक्रम.

**मूल्य शिक्षण** : मानवी जीवनाशी संबंधित सर्व चांगल्या मूल्याचे विद्यार्थ्यांना दिले जाणारे औपचारिक शिक्षण.

**निरंतर शिक्षण** : विविध व्यवसायात प्रत्यक्ष कार्यरत असताना प्रौढ व्यक्तींनी आपापल्या क्षेत्रातील व आनुषंगिक क्षेत्रातील ज्ञान अधिकाधिक व कायम मिळत राहण्याच्या प्रक्रियेला निरंतर शिक्षण म्हणतात.

## ४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची – उत्तरे

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १**

**उत्तरे –** १) ब) दुसरे

२) ड) ६%

३) क) १५ ते ३५

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

**उत्तरे –** १) क) १०

२) ब ) मातृभाषा

३) अ) बाह्य

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ३**

**उत्तरे –** १) ड) नवोदय विद्यालय

२) ब) दोन

३) अ) महाराष्ट्र

## ४.५ सारांश

स्वतंत्र भारताच्या इतिहासातील शिक्षण विषयक १९६८ चे पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय गरजांमध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात बदल झाला. त्यानुषंगाने संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचे पुनरावलोकन करण्याची व त्याधारे नविन शैक्षणिक धोरण तयार करण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. या पार्श्वभूमीवर १९८६ चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. विशिष्ट तात्विक भूमिका व त्यासाठी निश्चित असा कृतिकार्यक्रम हाती घेवून २१ व्या शतकात गतिमान वाटचाल करण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी व मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असणारे १९८६ चे शैक्षणिक धोरण वैशिष्टयपूर्ण असे होते. या धोरणाला जी वैशिष्टयपूर्णता प्राप्त झाली.

त्यात शिक्षणाचा भूतकाळ व भविष्यकाळ यात मेळ, शिक्षणाची समान संधी, विविध स्तरावरील शिक्षणाची पुर्नरचना, शिक्षक प्रशिक्षणात आधुनिकता, राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के शिक्षणातील गुंतवणूक, प्रौढ व निरंतर शिक्षणावर भर यासारख्या प्रमुख वैशिष्ट्याबरोबरच राष्ट्रीय शिक्षण पद्धत हे एक प्रमुख वैशिष्ट्य असल्याचे दिसते.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे राष्ट्रीय अभ्यासक्रम होय. या अभ्यासक्रमाद्वारे भारतात सर्वत्र समान शैक्षणिक दर्जा, समान मूल्ये व राष्ट्रीय एकात्मतेचा आधार तयार व्हावा हा विचार आधारभूत होता. यासाठीच १० गाभा घटकांचा आधार या अभ्यासक्रमास होता. राष्ट्रीय अभ्यासक्रमात मूल्यशिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञानाचा प्रसार, परिसर शिक्षण, गणित व शास्त्राचे प्रगत अध्यापन, क्रीडा व शारीरिक शिक्षण, युवकांची भूमिका व मूल्यमापन आणि परीक्षा सुधारणा कार्यक्रम या बाबींवर विशेष भर दिला.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अनेक नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश केला होता. यात प्रामुख्याने ऑपरेशन ब्लॅकबोर्ड, नवोदय विद्यालये, पदवी व नोकरी संबंध विच्छेद, शिक्षणाचे व्यवस्थापन व शिक्षकाची भूमिका या ठळक बाबींचा उल्लेख करता येईल. या नाविन्यतेमुळेच या धोरणाची उपयुक्तता व महत्त्व हे भारतीय शिक्षणाचा इतिहासात ठळकपणे अधोरेखित होते.

### ४.६ सरावासाठी प्रश्न

१) १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांची वैशिष्टये स्पष्ट करा.

२) १९८६ च्या राष्ट्रीय अभ्यासक्रमाची सर्वसामान्य रचना स्पष्ट करा.

३) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील नाविन्यता विशद करा.

४) १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचे मूल्यांकन करा.

### ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


❖ गटकळ, रं. सं. (२००७), माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास, नाशिक : प्राजक्त प्रकाशन.

❖ जाधव मो. भोसले, आ. व. सरपोतदार प्रा. (२००८), माध्यमिक शिक्षण, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

❖ नरवणे, मी (२००७) भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

❖ वास्कर, आनंद व वास्कर पु. (१९८८), भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण, पुणे : नूतन प्रकाशन.


❖❖❖

## घटक – १

# विद्यापीठ शिक्षण आयोग

**प्रास्ताविक**

१. १.१ विद्यापीठ शिक्षण आयोगाची रचना

१.२ आयोगाच्या प्रमुख शिफारशी

१.३ विद्यापीठ शिक्षण आयोगाची धोरणे आणि विद्यापीठ शिक्षणाची बदलती भूमिका

१.४ उपसंहार (सारांश)

२. २.१ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची उच्चशिक्षणासंदर्भातील तात्विक भूमिका.

२.२ विद्यापीठ शिक्षण आयोगावर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा प्रभाव

२.३ विद्यापीठ शिक्षण आयोगाची कार्यकक्षा व प्रयोजन

२.४ विद्यापीठ आयोगाची ध्येये

२.५ उपसंहार (सारांश)

३. ३.१ ग्रामीण विद्यापीठे

३.२ ग्रामीण विद्यापीठाच्या शिफारशी

३.३ अध्यापक

३.४ अध्यापक शिफारशी

३.५ कला व विज्ञान

३.६ कला व विज्ञानाच्या शिफारशी

३.७ अभ्यासक्रम

३.८ अभ्यासक्रम व शिफारशी

३.९ उपसंहार (सारांश)

## उद्दिष्टे –

विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या अभ्यासातून पुढील बाबी लक्षात येतील.

१. विद्यापीठ आयोगाची स्थापना व हेतु समजेल.

२. विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या प्रमुख शिफारशी समजतील.

३. विद्यापीठ शिक्षण आयोगाची रचना कळेल.

४. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व विद्यापीठ शिक्षण आयोगाचा संबंध लक्षात येईल.

५. विद्यापीठ शिक्षण आयोगावर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा प्रभाव समजेल.

६. विद्यापीठ शिक्षण आयोगाची कार्यकक्षा जाणून घेता येतील.

७. विद्यापीठ शिक्षण आयोगांच्या ध्येय धोरणाचा अभ्यास होईल.

८. ग्रामीण विद्यापीठे व त्यांच्या शिफारशींची ओळख होईल.

९. अभ्यासक्रम व त्यांच्या शिफारशी समजतील.

## प्रास्ताविक :

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढत होती. परिणामी भारतातील महाविद्यालये आणि विद्यापीठांची संख्या वाढत होती. अशा वेळी मात्र शिक्षणाचा दर्जा घसरत चाललेला होता. भारतातील लोक या शिक्षणाबाबत समाधानी नव्हते. केवळ परीक्षा घेणारे केंद्र म्हणून विद्यापीठाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण होवू नये म्हणून समाजातील गरजा आणि समस्या सोडवण्यासाठी या मिळालेल्या ज्ञानाचा व माहितीचा उपयोग कौशल्याने कसा करावा हे शिक्षण यातून मिळत नव्हते. परिणामी चांगले नेतृत्व व चांगला समाज, नागरिकत्व विकसित होत नव्हते. उच्च शिक्षणातून लोकशाही, समाजवादी जीवनपद्धती निर्माण व्हावी अशी अपेक्षा होती. समाजातून विज्ञान, कृषी, औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीबरोबरच लोकशाही जीवनपद्धतीला साजेसे उत्तम नागरिक बनावेत अशी मागणी होती. समाजाच्या गरजा लक्षात घेऊन विद्यापीठातून शिक्षणाची पुनर्रचना करण्यात आली. आंतरविद्यापीठ शिक्षण मंडळ आणि केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळींनी भारत सरकारकडे विद्यापीठ शिक्षणाचा विचार करण्यासाठी विद्यापीठ शिक्षण आयोग नेमण्याची मागणी केली.

## १.१ विद्यापीठ शिक्षण आयोगाची रचना

देशाच्या बदलत्या परिस्थितीनुसार देशाच्या विविध सामाजिक गरजा लक्षात घेऊन विद्यापीठ शिक्षणाची पुनर्रचना करण्यात यावी अशी मागणी होवू लागली. विद्यापीठ शिक्षणाचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास करण्याच्या दृष्टीने ४ नोव्हेंबर १९४८ ला केंद्रशासनातर्फे विद्यापीठीय शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. ही समिती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ शिक्षण आयोग नेमण्यात आला. डॉ. राधाकृष्णन आयोग असेही म्हणतात.

विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या रचनेमध्ये एकूण १० व्यक्तींचा समावेश होता. यात अध्यक्ष, सचिव व आठ सदस्य अशा प्रमुख दहा व्यक्तींचा समावेश होता. यातील दहा सदस्यांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

- अध्यक्ष : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन
- सदस्य : डॉ. ताराचंद, डॉ. जेम्स एफ. हफ., डॉ. झाकीर हुसेन, डॉ. आर्थर इ. मॉर्गन, डॉ. मुदलियार, डॉ. मेघनाथ साहा, डॉ. कर्मनारायण बही, डॉ. जॉन जे टायगर्ट.
- सचिव : श्री निर्मलकुमार सिध्दांत

विद्यापीठ शिक्षणासंबंधात सूचना, शिफारशी करण्यापूर्वी आयोगाने शिक्षणाची ध्येय निश्चित केली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या चार तत्त्वावर शिक्षणाची उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत. यात नेतृत्वाचा विकास, संस्कृती, संक्रमण व संवर्धन बौध्दिक विकास योग्य व्यक्तिमत्वाचा विकास, आंतरराष्ट्रीय सद्भावनेचा विकास, मूल्यांचा विकास अशा प्रकारच्या ६६ बाबींचा उल्लेख केला आहे. या अभ्यासक्रमात विज्ञान व तंत्रज्ञानामुळे झालेली प्रगती तसेच मागासवर्गीयांसाठी विशेष सहायता अशा प्रमुख बाबींचा त्यात समावेश आहे.

## १.२ विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या प्रमुख शिफारशी

विद्यापीठ आयोगाची स्थापना झाल्यानंतर आयोगाने अध्यापक वर्गासंदर्भात सविस्तर मांडणी करून असे स्पष्ट केले आहे की, शिक्षकांकडे विषयज्ञान नसल्यामुळे अध्यापनाचा दर्जा सातत्याने ढासळत आहे. याचा परिणाम शिक्षकांचे वेतन, सेवाशर्ती यावर झालेला दिसून येतो. महाविद्यालयात किंवा विद्यापीठात पुरेशा प्रमाणात ग्रंथालय व संशोधनाच्या सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. शैक्षणिक सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी भविष्यासाठी निधी, निवासाच्या सुविधा, अभ्यास-रजा प्राध्यापक, प्रपाठक, अधिव्याख्याता व निर्देशक असे शिक्षकाचे चार स्तर असावेत अशा सूचना केले आहेत. विद्यापीठ आयोगाने अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रत्येक प्रांतात सुसज्ज व पुरेसा शिक्षक आणि कर्मचारी वर्ग असलेली महाविद्यालये स्थापन करावी. जरी पदव्युत्तर स्तरावरील उपस्थिती ऐच्छिक असली तरी पदवी पर्यंत विद्यार्थी उपस्थित असावेत. बाहेरून परिक्षा देण्यास परवानगी असावी. नोकरी करत शिकणाऱ्या लोकांसाठी  सायंकाळीन महाविद्यालयात प्रयोग राबवावा. अभ्यासक्रमामध्ये टोकाच्या विशेषीकरणात सुधारणेत वेळ न घालवता सामान्य शिक्षणाची सैध्दान्तिक व प्रात्यक्षिक बाजू यांची अभ्यासक्रमात प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी. प्रत्येक क्षेत्रात असणारा सामान्य शिक्षण व विशेष शिक्षण यांच्यात संबंध योग्य असावा. संशोधन, पदव्युत्तर शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, कृषी, वाणिज्य या विद्या शाखांसंदर्भात आयोगाने शिफारशी केल्या आहेत.

भारत स्वतंत्र झाल्यामुळे विद्यापीठ शिक्षण आयोगाने माध्यमाची भाषा करताना भारताची राष्ट्रभाषा समृद्ध करावी असे म्हटले. त्यासाठी वेगवेगळ्या मार्गांनी भारतीय भाषांमध्ये आलेल्या शब्दांचा वापर करावा. राष्ट्रभाषा प्रादेशिक भाषा विकासासाठी तातडीने प्रयत्न व्हावेत. वाढत्या ज्ञानाशी संपर्क रहावा म्हणून माध्यमिक शाळा आणि विद्यापीठ इंग्रजी विषय अभ्यासला जावा.

राधाकृष्णन आयोग हा भारतीय शिक्षणाचा परिपूर्ण विचार करणारा आयोग आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाविषयक असणारा पहिलाच अहवाल असल्याने त्याचे महत्त्व फार आहे. हा अहवाल ऑगस्ट १९४९

मध्ये केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळासमोर सादर केला गेला. एप्रिल १९५० मध्ये आयोगाच्या प्रमुख शिफारशी स्विकारण्यात आल्या. या आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार भारतात स्वातंत्र्योत्तर काळात उच्च शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. विद्यापीठ आयोगाची स्थापना, तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम उच्च शिक्षण संशोधनासाठी अनुदान, एन.सी.सी., एन.एस.एस. योजनांचे प्रारंभ, गुणवत्ता प्राप्त शिक्षण संस्थाची स्थापना विविध बाबींचा लाभ हा या आयोगाच्या शिफारशीची देणगी आहे.

## १.३ विद्यापीठ शिक्षण आयोगाची धोरणे आणि विद्यापीठ शिक्षणाची बदलती भूमिका :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नवभारताच्या निर्मितीसाठी राष्ट्राने विविध क्षेत्रांमध्ये सुधारणा होत गेल्या. या काळात सरकारने शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केले. याकाळात सरकारने शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केले. शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये उच्चशिक्षणाला प्राथमिकता देण्यात आली. ब्रिटिश सरकारने भारतात स्थापन केलेल्या विद्यापीठांमधून दिले जाणारे शिक्षण हे केवळ सैध्दांतिक आणि पुस्तकी ज्ञानावर आधारित होती. हे ज्ञान देशापुढील प्रश्न सोडवणे तसेच आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी असमर्थ होते. त्यामुळे भारताला विकसित देशांच्या पंक्तीत बसवणारे उच्च शिक्षण समाजाला देण्याची गरज वाटू लागली. त्यासाठी १९४८ मध्ये भारत सरकारने डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोगाने गठन केले. याला 'विद्यापीठ आयोग' म्हणतात.

पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपली विद्यापीठ शिक्षणाबाबतची भूमिका स्पष्ट केली होती ती अशी,

"A University stands for humanism for tolerance, for reason for the adventure of ideas and the search of truth. It stands for the onward march of the human race towards even higher objective."

यावरून विद्यापीठ निर्मिती हा मानवता, सहिष्णुता, बुध्दिप्रामाण्यता, कल्पनांचे साहस व सत्यता याकरिता असते. प्रत्येक विद्यापीठाने हे कार्य प्रमाणिकपणाने करावे, उच्च ध्येये साध्य करण्यासाठी विद्यापीठांनी प्रयत्नशील राहावे. डॉ. राधाकृष्णन कमिशन अहवालात म्हटले आहे की, विद्यापीठे ही बौध्दिक साहसाची वसतिस्थाने आहेत.

## १.४ उपसंहार (सारांश)

१९४७ नंतर नवभारताच्या निर्मितीसाठी राष्ट्राने विविध क्षेत्रात सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू केले. भारताला विकसित देश होण्यासाठी सर्वाधिक लक्ष केंद्रित केले ते शिक्षणावर शिक्षराच्या सर्वच स्तरावर अगदी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षणावर सुधारणा केल्या. यातून भारतीय विद्यापीठीय शिक्षण सुधारण्यासाठी १९४८ रोजी राधाकृष्णन आयोगाची स्थापना झाली. याचे अध्यक्ष डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन होते.

प्रामुख्याने भारतीय विद्यापीठीय शिक्षणावर आधारित अहवाल सादर करणे आणि देशाला वर्तमान परिस्थितीत तसेच भावी परिस्थितीतील आवश्यकता किंवा गरजा भागवण्यासाठी शिक्षणामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी सूचना देणे. दिलेल्या सूचनांचा विचार करून सरकारला अहवाल देणे ही उद्दिष्टे आयोगाची होती.

**उपघटकावरील स्वयंअध्ययनासाठी विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न :**

१. विद्यापीठ आयोगाची रचना स्पष्ट करा.

२. विद्यापीठ शिक्षण आयोगाची बदलती भूमिका सांगा.

३. विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या शिफारशींची माहिती द्या.

## २.१ डॉ. राधाकृष्णन यांची उच्च शिक्षणासंदर्भातील तात्त्विक भूमिका व विद्यापीठ शिक्षण आयोग

भारतीय संस्कृतीने नेहमी गुरूला उच्च स्थान दिले आहे. सातत्याने सुमारे चाळीस वर्षे नि:स्पृहपणे डॉ. राधाकृष्णन हे एक उत्तम शिक्षक होतेच परंतु त्याचबरोबर ते एक तत्त्वज्ञही होते. अनेक शिक्षण आयोगाचे सदस्यत्व अध्यक्षपद विश्वविद्यालयाचे कुलगुरू अशी अनेक सन्मान्य पदेही त्यांनी भुषवली होती. दक्षिण भारतातील तमिळनाडूतील तिरूत्ताणी येथे त्यांचा जन्म व प्राथमिक शिक्षण झाले. तत्वज्ञानासारख्या अवघड विषयात त्यांनी पदवी संपादन केली. पुढील काळात त्यांनी पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचाही सखोल अभ्यास केला. म्हणून त्यांच्या शिक्षणविषयक विचारांना तत्त्वज्ञानाचे भक्कम सहाय्य लाभले आहे.

सामान्य माणसापेक्षा तत्त्वज्ञानाचे वैचारिक अधिष्ठान लाभलेला माणूस नेहमीच वेगळा विचार करतो. हे डॉ. राधाकृष्णन यांनी मांडलेल्या शिक्षणाच्या धोरण आणि ध्येयातून दिसून येते. डॉ. राधाकृष्णन यांच्या मते शिक्षणातून मानवी स्वभावातून आढळणाऱ्या सद्गुणांवर विश्वास ठेवणारा सुजाण, सुसंस्कृत नागरिक घडवणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. लोकशाही माध्यमातून न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व हे भाव वाढणे, जीवन जगणे ही काही यांत्रिक गोष्ट नसून ती सुंदर कला आहे. ही जाणीव शिक्षणातून होते. या जगण्याच्या कलेचे प्रशिक्षण मानवी बुद्धीला देणे ही शिक्षणाचे ध्येय आहे.

डॉ. राधाकृष्णन धर्म व विज्ञान यांना परस्परविरोधी न मानता सत्यशोधनासाठी दोन्हींही घटकांची आवश्यकता असल्याचे सांगतात. मानव व मानवी जीवन यांच्या विश्वात्मकतेचे स्वप्न सत्यात उतरवणे हे ही शिक्षणाचे कार्य आहे. थोडक्यात शिक्षण म्हणजे व्यक्तित्त्वाचा दुसऱ्या व्यक्तिमत्त्वावर होणारा साधक बाधक परिणाम होय. म्हणूनच शिक्षणातून मानवी मूल्यांवर विश्वास असणारे साक्षर निर्माण होणे अपेक्षित आहे.

डॉ. राधाकृष्णन यांनी स्त्री शिक्षणावर आधारित विचार मांडले. ''स्त्रियांकडे प्रचंड ऊर्जा शक्ती असते. त्याचा योग्य वापर करून समाजाच्या प्रगतीत योगदान देण्याचे शिक्षण स्त्रियांना द्यायला हवे. बौध्दिक व आत्मिक विकासाची समान संधी स्त्रियांना दिली गेली पाहिजे.

१९४८ मध्ये डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी राधाकृष्णन आयोगाचे अध्यक्षपद भूषवले. संपूर्णत: या आयोगाने विद्यापीठीय शिक्षणावर भर दिला म्हणूनच याला भारतीय विद्यापीठ शिक्षण आयोग असेही म्हणतात. संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात याव्यात. विद्यापीठात संशोधन विभाग निर्माण करण्यात यावेत. तसेच ग्रामीण भागात कृषी महाविद्यालये, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्रे चालू करावीत. अशा उपयुक्त गोष्टी तत्कालीन परिस्थितीचा विचार करून प्रस्तुत आयोगाने सुचवल्या.

## २.२ विद्यापीठ शिक्षण आयोगावरील डॉ. राधाकृष्णन यांचा प्रभाव

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे ख्यातनाम शिक्षणतज्ञ व तत्त्वज्ञ होते. भारतीय तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक असून विद्यापीठ शिक्षण आयोग किंवा राधाकृष्णन आयोग हा त्यांच्या अध्यक्षतेखाली होता. विद्यापीठ शिक्षण आयोगाचा अहवाल प्रसिद्‌ध होण्यापूर्वीच डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे भारतीय तत्त्वज्ञानावर असणारे प्रभुत्व आणि जीवनविषयक तत्त्वज्ञानावर आधारित दृष्टिकोन होता. उदात्त भावना यांच्या शिक्षणविषयक विचारामध्येही पाहावयास मिळते. शिक्षण मानवी जीवनाला दिशा देते. बुद्‌धी, आत्मा व हृदयाच्या संतुलित विकासातून फक्त साक्षर निर्माण करण्यापेक्षा एकमेकांना समजून घेणारी माणसे निर्माण करणे हे खरे शिक्षण असे त्यांनी संगितले. मानव हा विविध वृत्ती-प्रवृत्तींचा संगम आहे. त्यांच्या या वृत्ती व प्रवृत्तींना परिस्थितीनुरूप सुसंस्कृत, नैतिक वळण लावणे म्हणजेच शिक्षण होय. विश्वातील संघर्ष नाहीसा करण्यासाठी व सदाचाराचा अंगीकार करण्यासाठी शिक्षणाला पर्याय नाही. विश्वसंघर्षाची भावना समूळ नष्ट करण्यासाठी सहिष्णुता व सहानुभूती व सदाचार या त्रिसूत्रीस शिक्षणामध्ये मौलिक स्थान प्राप्त व्हावयास हवे असे डॉ. राधाकृष्णन यांचे मत आहे.

## २.३ विद्यापीठ शिक्षण आयोगाची कार्यकक्षा व प्रयोजन

विद्यापीठ शिक्षण आयोगाची कार्यकक्षा व्यापक होते. भारतातील सर्व विद्यापीठ संबंधित अहवाल सादर करणे तसेच देशाच्या सध्याच्या व भविष्यकालीन काही गरजा अनुरुप ठरतील. सुधारणा व विकासात्मक कार्यक्रम सुचवणे अशी महत्त्वाची जबाबदारी या आयोगाकडे सोपवली होती.

आयोगाने उच्च शिक्षणाच्या सर्व पैलुसंदर्भात एक विस्तृत अशी प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली शिक्षणतज्ञ, तत्त्वज्ञ, शिक्षणाधिकारी, शिक्षक या सर्वांना दिली. जवळ-जवळ ६०० लोकांनी या प्रश्नावलीचे उत्तर पाठवले. प्रश्नावली भरून पाठवली. याचबरोबर आयोगाच्या सर्व सदस्यांनी देशभर भ्रमण करून विद्यापीठातील प्रशासक, शिक्षक, प्रतिनिधी, विद्यार्थी संघटनेचे प्रतिनिधी यांची भेट घेऊन उच्च शिक्षणाच्या विविध पैलूंशी संबंधित महत्त्वपूर्ण माहिती जाणून घेतली. या माहितीच्या आधारे आयोगाने एक विस्तृत अहवाल तयार केला आणि २५ ऑगस्ट १९४८ रोजी भारत सरकारला सादर केला. पहिल्या भागात ७४७ पान आणि १८ अध्याय आहेत. यात उच्च शिक्षणाच्या सर्व पैलुंवर विस्तृत विचार मांडले आहेत. तर दुसऱ्या भागात आकडे आणि प्रश्नावली आहे. स्वातंत्र्यानंतर स्थापन केलेल्या उच्च शिक्षणासंदर्भातील या पहिल्या आयोगाने विद्यापीठीय शिक्षणाचा एक समग्र आराखडा तयार केला. 'युवक विकास' हे प्राथमिक 'लक्ष्य' राधाकृष्णन आयोगाचे होते.

केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ आणि आंतर विद्यापीठ शिक्षण परिषद या संस्थांनी भारतातील विद्यापीठीय शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठी आणि देशाची संस्कृती, परंपरा आणि गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या शिक्षणासाठी उच्च शिक्षणाची पुनर्रचना करणारा आयोग नियुक्त करावा. अशी शिफारस भारत सरकारला केली होती. भारतीय विद्यापीठीय शिक्षणावर अहवाल सादर करणे आणि देशाला वर्तमान परिस्थितीत तसेच भावी काळातील आवश्यकता किंवा गरजा भागवण्यासाठी विचार, शिक्षणामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी सूचना देणे, दिलेल्या सूचना किंवा शिफारसींवर विचार करून सरकार अहवाल सादर करणे या उद्देशाने आयोगाची स्थापना करण्यात आली होती. विद्यापीठीय शिक्षणाचे सर्वच पैलू जे विद्यापीठीय शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आवश्यक होते या सर्वच पैलूंवर विचार करण्याची जबाबदारी आयोगावर होती. त्या अनुषंगाने

महाविद्यालयातील आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी जीवनाभिमुख शिक्षण देणे गरजेचे आहे. असे मत विद्यापीठ शिक्षण आयोगाने नोंदविले.

भारतीय युवकांना सक्षम आयुष्य जगण्यासाठी आयुष्याचा सकारात्मक अर्थ समजावणे, लोकशाहीचे सुयोग्य प्रशिक्षण देणे, स्वयं विकासाचे तंत्र अवगत करून देणे, मनातील नकारात्मक विचार आणि भीती घालवणाऱ्या सद्सद्विवेक बुध्दीस चालना देणाऱ्या आणि एकाग्रता वाढवणाऱ्या मूल्यांचा विकास करणे, सांस्कृतिक ठेवा जपूण त्याची शिकवण देणे, शिक्षण ही जीवनभर निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, भूतकाळ-वर्तमानकाळ-भविष्यकाळ समजण्याची क्षमता विकसित करणे, व्यावसायिक शिक्षण प्रदान करणे आणि आपल्या शैक्षणिक, आर्थिक तसेच राजकीय संस्था ज्या लोकशाही मूल्यांवर आणि नैतिक सामाजिक तत्त्वांवर चालतात त्या तत्त्वाची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे अशा उद्दिष्टांवर विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या शिफारशी आधारित होत्या.

विद्यापीठ शिक्षण आयोगाने स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाची रचना, गरजा व हाती असलेली संसाधने यांचा सखोल विचार करून उच्च शिक्षणप्रणाली समोर काही मुलभूत तत्त्वे जाहीर केली.

अ) शिक्षणपद्धती व रोजगारांचे पर्याय यामध्ये समन्वय साधणे.

ब) उच्च शिक्षणात्मक दर्जाची बांधणी करणे.

क) वैज्ञानिक दृष्टिकोन रूजवणे व त्याबरोबरच सांस्कृतिक उन्नती साधणे.

ड) प्रत्येक जिल्ह्यापर्यंत उच्च शिक्षणाच्या सुविधा पुरविणे.

इ) व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षणाच्या योजना राबविणे. अशा प्रकारे या तत्त्वांवरच १९५७ ला खरगपूर येथे IIT ची स्थापना करण्यात आली. तर १९६१ साली NCERT ची स्थापना झाली.

## २.४ विद्यापीठ शिक्षणाची ध्येये

स्वतंत्र भारताच्या उभारणीनंतर स्वप्नातील भारत सत्यात उतरवण्यासाठी भारतात सन १९४८ साली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना झाले. यात प्रामुख्याने स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वांचा आदर्श समोर ठेवून आयोगाने विद्यापीठ शिक्षणाची ध्येये निश्चित केली आहेत. ती पुढीलप्रमाणे :-

### १. नेतृत्वगुणांचा विकास :-

भारतीय स्वातंत्र्यानंतर राजकीय, सामाजिक, आर्थिक सांस्कृतिक क्षेत्रात फारच बदल झाले. या क्षेत्रातील नेतृत्व कार्यक्षम राहावे. यासाठी या क्षेत्रात आज कुशल, बुध्दिमान हुशार व दूरदृष्टी असणारे साहसी नेतृत्वाची गरज आहे. विद्यापीठांनी राजकारण, प्रशासन, व्यावसायिक क्षेत्र, उद्योगधंदे आणि व्यापार या क्षेत्रांतील नेतृत्व घडवले पाहिजे.

### २. संस्कृती संक्रमण आणि संवर्धन :-

संस्कृतीचे जतन संक्रमण व संवर्धन करण्याचे शिक्षण हे प्रभावी माध्यम मानले जाते. शिक्षणाच्या साहाय्याने ही जबाबदारी पेलण्याचे काम उगवत्या पिढीचे आहे. संस्कृतीचे भवितव्य भौतिक प्रगती किंवा

राजकीय सत्ता यावर अवलंबून नसते तर ते चारित्र्यसंपन्न नागरिकांवर अवलंबून असते. विद्यापीठांनी युवकांना सांस्कृतिक उन्नयनासाठी प्रेरित केले पाहिजे.

### ३. बौध्दिक विकास करणे :–

विद्यापीठे ही बौध्दिक साहसाची वसतिस्थाने आहेत. असे मत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनीच मांडले होते. माहिती व ज्ञानाचा आज सगळीकडे विस्फोट झाला आहे. विद्यार्थ्यांचा विद्यापीठांच्या ज्ञानशाखेतून बौध्दिक विकास झाला पहिजे.

### ४. आध्यात्मिक व नैतिक विकास :–

आध्यात्मिक ज्ञान हेच मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे. सर्व मानव जातीशी समभावाची भावना ठेवणे म्हणजे अध्यात्मिकता ठेवणे. दु;खी, दरिद्री लोकांबद्दल सहानुभूती निर्माण व्हावी. अन्यायाविरूद्ध आवाज उठवण्याची क्षमता निर्माण व्हावी. तसेच शांतता व स्वातंत्र्य याबद्दल मनात प्रेमाची भावना निर्माण व्हावी. यासाठी विद्यापीठ शिक्षणातून प्रयत्न झाले पाहिजेत. त्यातून विद्यार्थ्यांचा अध्यात्मिक व नैतिक विकास साधला जावा.

### ५. व्यक्तिमधील जन्मजात गुणांचा विकास :–

विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या सुप्त गुणांना, कौशल्यांना संधी देण्याचे काम विद्यापीठाने करावे. युवा कौशल्य युवा शक्ती मध्ये लपलेल्या गुणांचा विकास विद्यापीठ शिक्षणातून झाला पाहिजे. तसेच त्यासाठी पोषक अशी वातावरण निर्मिती करण्याची जबाबदारी विद्यापीठांनी पेलली पाहिजे.

### ६. योग्य व्यक्तिमत्त्वाचा विकास :–

विद्यापीठ शिक्षणातून सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वे घडली पाहिजेत. सामाजिक बांधिलकी जोपासणारे, सामाजिक जबाबदारीची जाणीव असणारे, सामाजिक गरजांची जाण असणारे, ज्ञान–पिपासू विद्यार्थी विद्यापीठ शिक्षणातून निर्माण व्हावेत. NCC, NSS अभ्यासपूरक कार्यक्रम, सामाजिक कार्य, उद्बोधन याद्वारे हे कार्य विद्यापीठ शिक्षणातून झाले पाहिजे.

### ७. मूल्यांचा विकास :–

भारताने लोकशाही शासनप्रणालीचा स्विकार केला आहे. लोकशाही समाजवादावर आधारित नवसमाज निर्मिती करण्याचे प्रयत्न स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरू झाले. यामध्ये मूल्ये जपणे, दुरापास्त होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही मूल्यांचे विद्यापीठांनी रक्षण केले पाहिजे व विद्यापीठ शिक्षणातून मूल्यांचा विकासासाठी प्रयत्न केले पाहिजे.

अशा प्रकारची प्रमुख ध्येय विद्यापीठ शिक्षण आयोगाने निश्चित केली. या ध्येयांच्या माध्यमातून विद्यापीठ शिक्षणाने भारतातील युवक सक्षम, सर्वगुणसंपन्न, प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा, शरीराने सुदृढ, आंतरराष्ट्रीय भावना जोपासणारा, लोकशाहीची मूल्ये अंगीकारणारा असा सामाजिक बांधिलकी जोपसणारा नागरिक तयार व्हावा. ही विद्यापीठ शिक्षण आयोगाची अपेक्षा आहे.

## २.५ उपसंहार

देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात उच्च शिक्षणाचा महत्त्वाचा वाटा असतो. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय समाजाच्या गरजा लक्षात घेऊन महाविद्यालयात आणि विद्यापीठात उच्च शिक्षण घेणारा विद्यार्थी सुशिक्षित, सुसंस्कृत आणि कौशल्याधिष्ठीत झाला पाहिजे हा उदात्त हेतू ठेवूनच विद्यापीठ शिक्षण आयोगाची स्थापना झाली. कारण औद्योगिक विकास, सांस्कृतिक उन्नयन, राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक ऐक्य साधण्यासाठी सक्षम, समतोल, एकात्मिक आणि परिपूर्ण उच्च शिक्षणाची योजना राष्ट्रीय स्तरावर तातडीने उभी करावी अशी गरज तत्कालीन स्वतंत्र भारतात निर्माण झाली होती. भारतीय लोकशाही समाजव्यवस्थेत व्यक्तिविकासाबरोबरच समाज विकास साधणे आवश्यक असते. राष्ट्रीय जीवनात व्यक्तिगत विकासाबरोबरच सामाजिक विकासालाही महत्त्व आहे. व्यक्तिगत प्राविण्य, बुध्दिमत्ता, प्रतिभा, नवनिर्माण क्षमता राष्ट्राचे जीवन उंचावते पण त्याचबरोबर सामाजिक कार्यक्षकता, सामाजिक जबाबदारी आणि सामाजिक ऐक्यसुद्‌धा राष्ट्रीय विकासाला आवश्यक आहे. व्यक्ती समाजनिरपेक्ष जीवन जगू शकत नाही. तद्वतच कर्तृत्ववान व्यक्तीच राष्ट्राला आणि समाजाला पुढे नेत असतात. हा विचार समोर ठेवून भारतीय लोकशाही विकसित करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर एक विद्यापीठीय शिक्षण योजना आखण्याचे ध्येय समोर ठेवले होते.

**उपघटकावरील स्वयं अध्ययनासाठी विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न**

**प्रश्न १. टिपा लिहा.**

१. हॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे योगदान

२. विद्यापीठ शिक्षण आयोगाची ध्येय.

**प्रश्न २.** विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या शिफारशींवर सविस्तर विवेचन करा.

**प्रश्न ३.** विद्यापीठ शिक्षण आयोगाची कार्यकक्षा स्पष्ट करा.

## ३.१ ग्रामीण विद्यापीठे

आयोगाने ग्रामीण जनतेला उच्च शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात यासाठी ग्रामीण विद्यापीठाच्या स्थापनेचा क्रांतीकारी विचार मांडला. या संदर्भात आयोगाने सांगितले आहे की, ग्रामीण भारताच्या सामान्य प्रगतीसाठी कुशलता आणि प्रशिक्षणाची व्यवस्था व गुण यामध्ये निरंतर विस्तार करावा लागेल. ग्रामीण जनतेला शिक्षण देण्यासाठी आणि शिक्षित नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रामीण महाविद्यालय आणि ग्रामीण विद्यापीठांची पध्दती आवश्यक आहे. भारत हा देश शेती प्रधान व खेडी प्रधान असल्यामुळे देशाचा बराचसा भाग हा खेड्यांनी व्यापलेला आहे. भारतात लोकशाही प्रणाली स्वीकारलेली असल्याने देशासमोर ग्रामीण भागाचा विकास हे फार मोठे आव्हान होते. यासाठी देशातील ग्रामीण भाग सुधारणे हे गरजेचे आहे. ग्रामीण भागातला ग्रामीण युवक हा सर्वगुणसंपन्न व सुसंघटित व्यक्तिमत्त्वाचा निर्माण झाला पाहिजे. यासाठी त्याच्या शिक्षणाची सोय करणे गरजेचे होते. ग्रामीण विद्यापीठे व ग्रामीण महाविद्यालये यांची गरज स्पष्ट करताना आयोगाने स्पष्ट केले आहे की, 'कौशल्य व प्रशिक्षणाचा दर्जा व विस्तार यावर ग्रामीण भारताची प्रगती अवलंबून आहे. या बाबींच्या पूर्ततेसाठी आणि शिक्षित नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रामीण महाविद्यालये व विद्यापीठे आवश्यक आहेत.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी ग्रामीण भागात विकासाच्या दृष्टीने संस्था स्थापन्यावर भर दिला होता. राधाकृष्णन कमिशनने पदवीपूर्ण शिक्षण केंद्रे व स्वतंत्र विद्यापीठ ग्रामीण विभागाकरिता स्थापन्याची आवश्यकता प्रतिपादन केली होती. पदवी व पदव्युत्तर अभ्यासात फार तफावत नसावी. पदवी अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासाचे विषय अभ्यासता यावे व व्यवसाय निवडता यावा या दृष्टीने प्रयत्न करण्यात यावेत.

## ३.२ ग्रामीण विद्यापीठांच्या शिफारशी :-

१. ग्रामीण भागात वसतिगृहयुक्त महाविद्यालये स्थापन करावीत व त्यातून पदवीपूर्ण शिक्षण देण्यात यावे.

२. ग्रामीण विद्यापीठ केंद्रस्थानी स्थापन करावे.

३. प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थी संख्या ३०० व संपूर्ण विद्यापीठात विद्यार्थ्यांची संख्या २५०० असावी.

४. प्रत्येक महाविद्यालयासाठी स्वतंत्र अध्यापक वर्ग असावा.

५. ग्रामीण विद्यापीठांशी संलग्नीत महाविद्यालयांसाठी केंद्रस्थानी ग्रंथालये, प्रयोगशाळा, आरोग्यकेंद्र, क्रिडांगण असावे.

६. ग्रामीण विद्यापीठांनी ग्रामीण जीवनाशी निगडीत व्यवसाय उद्योग विकसित करावेत.

७. विद्यार्थी व्यक्तिगत आवड आणि मनोवृत्ती विकसित करणे हे ग्रामीण महाविद्यालयाचे प्रमुख उद्दिष्ट असावे.

८. कमवा व शिका ही योजना अवलंबावी.

९. पदवी व पदव्युत्तर योजनेचा अवलंब करावा.

**अध्यापक –**

राधाकृष्णन आयोगाने आपल्या अहवालात शिक्षकांचे महत्त्व, स्थिती, कर्तव्य, गुण इ. वर विचार करून त्यांच्या महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. आयोगाच्या मते शिक्षण प्रक्रियेला यशस्वी करण्यामध्ये शिक्षकाचे योगदान व स्थान महत्त्वपूर्ण आहे. योग्य, कर्तव्यपरायण, निष्ठावान, चारित्रवान शिक्षकच उच्च शिक्षणात सुधारणा घडवून आणू शकतात. भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विद्यापीठीय शिक्षणात शिक्षकांचा दर्जा घसरत असल्याने राधाकृष्णन आयोगाच्या लक्षात आले. या आयोगाने प्रथम शिक्षकांच्या घसरत्या सामाजिक प्रतिष्ठेचा विचार केला. आयोगाने शिक्षकाचे महत्त्व स्पष्ट करताना म्हटले की, ''शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये शिक्षकास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.'' शिक्षणातून शिक्षक वजा करणार असल्यास शिक्षण प्रक्रियेला अर्थ उरणार नाही.

**शिक्षकांच्या स्थितीबाबत आयोगाची मते –**

१. शिक्षकांचे शिक्षणक्षेत्रात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

२. शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयीची रूची निर्माण केली पाहिजे.

३. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती व स्वतंत्र निर्णय घेण्याची वृत्ती निर्माण केली पाहिजे.

४. शिक्षकांचे वेतन समाधानकारक नाही.

५. सेवाशर्ती आकर्षित नाही.

६. शिक्षकांना संशोधन व ग्रंथालय सुविधा पुरेशा नाहीत.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे हाडाचे शिक्षक असल्याने त्यांना शिक्षकांच्या तत्कालीन समस्यांची प्रकर्षाने जाणीव झाली व त्या सोडवण्यासंदर्भात आयोगाने काही महत्त्वपूर्ण शिफारशी सांगितल्या आहेत.

**अध्यापकांच्या बाबतीत शिफारशी :-**

१. अध्यापकांची नियुक्ती करताना त्याच्या शैक्षणिक योग्यतेबरोबर अध्यापनाचा अनुभव व नेतृत्व करण्याची योग्यता लक्षात घ्यावी.

२. शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे असावे.

३. विद्यापीठातील प्राध्यापकांना वयाच्या ६४ वर्षापर्यंत सेवावाढ मिळावी.

४. अध्यापकांना अध्ययन करण्यासाठी सुट्टी द्यावी.

५. शिक्षकांसाठी भविष्य निर्वाह निधीच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

६. प्रत्येक विद्यापीठात संशोधन छात्र असावेत.

७. सक्षम शिक्षकांच्या निवडीसाठी योग्य काळजी घेतली जावी.

८. अध्यापकांच्या बढतीवेळी गुणवत्तेचा विचार व्हावा.

९. महागाई व काळाची गरज लक्षात घेऊन आयोगाने चांगली वेतनश्रेणी द्यावी.

१०. समाजाने अध्यापकाचे महत्त्व आणि त्याच्या जबाबदाऱ्या मान्य कराव्यात.

**कला व विज्ञान :**

विद्यापीठे व महाविद्यालयीन स्तरावरील कला व विज्ञान शाखेतील अध्यापनाचा दावा व त्यामध्ये येणाऱ्या समस्यांचा विचार आयोगाने केलेला होता.

आयोगाच्या मते, या स्तरावरील अध्यापनाचा परीक्षांचा व प्रात्यक्षिक कार्याचा दर्जा फार कनिष्ठ आहे. दरवर्षी विद्यापीठ परीक्षांमध्ये सामान्यत: ३७ ते ६०% मुले नापास होतात हे विद्यापीठ शिक्षणाचे अपयश आहे.

**कला व विज्ञान शिक्षणाविषयीच्या शिफारशी –**

विद्यापीठ शिक्षणात सुधारणा होण्यासाठी आयोगाने काही शिफारशी सुचवल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –

१. अवाजवी विद्यार्थी संख्या रोखण्यासाठी कला व विज्ञान शाखेसाठी विद्यापीठामध्ये जास्तीत जास्त ३००० आणि संलग्न महाविद्यालयामध्ये जास्तीत जास्त १५०० विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

२. शालेय व इंटरमिजिएट स्तरावरील शिक्षण पूर्ण केल्यानंतरच १२ वर्षापर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यापीठ अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

३. प्रपाठ, ग्रंथालय वापर आणि लेखा सराव यांची व्याख्यानाला जोड दिली जावी.

४. परीक्षेचा वेळ वगळता कामाचे दिवस कमीतकमी १८० असावेत.

५. दिवसभर अध्ययन करू न शकणाऱ्या व्यक्तिंसाठी सायंकालीन अभ्यासवर्ग सुरू करावेत.

६. आधुनिक सोयी सुविधा असलेल्या प्रयोगशाळा व ग्रंथालये उपलब्ध करून द्यावी.

७. सेमिनार व कृतीसत्रे यांचे आवश्यकतेनुसार नियोजन करावे.

८. पुरेशा शिष्यवृत्त्या देण्यात याव्यात.

### अभ्यासक्रम

औपचारिक शिक्षणामध्ये अभ्यासक्रम हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. विविध ज्ञानशाखेतील पध्दतशीर अभ्यासाकरिता अभ्यासक्रम हे महत्त्वाचे साधन आहे. अनुभव प्रयोग यांच्या सहाय्याने ज्ञान समृद्ध होणे गरजेचे आहे. आजच्या विज्ञानयुगात अनेक नवीन विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होत आहे. विषय विशेषीकरण ही काळाची गरज आहे.

#### उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाविषयी शिफारशी

अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण व्हावेत तसेच त्यांनी निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य व्हावीत. आधुनिक काळात विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान देणारे पाठ्यांश अभ्यासक्रमात असावेत. अभ्यासक्रमात सुधारणा करण्यासाठी डॉ. राधाकृष्णन आयोगाने पुढील शिफारशी केल्या आहेत.

१. विद्यार्थ्यांना महाविद्यालये, विद्यापीठे आणि व्यावसायिक शाळांमध्ये १२ वर्षाच्या शालेय अथवा समकक्ष शिक्षणानंतर प्रवेश द्यावा.

२. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना एक वर्षाच्या कालावधीनंतर आणि पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना दोन वर्षाच्या कालावधीनंतर पदव्युतर पदवी दिली जावी.

३. विद्यापीठे आणि माध्यमिक शाळांनी सामान्य शिक्षणाचा सैध्दान्तिक भाग वा प्रात्यक्षिक भाग यांचा अभ्यास सुरू करावा.

४. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व व त्याच्या अभिरूची, नागरिकत्व याबाबी लक्षात घ्याव्यात.

५. त्यानुसार प्रत्येक क्षेत्रातील सामान्य शिक्षण व विशेष शिक्षण यामध्ये सुसंबंध्द सहकार्य प्रस्थापित करावे.

## उपसंहार (सारांश)

भारत हा देश खेडीप्रधान असल्याने देशाचा बराचसा भाग हा खेड्यांनी व्यापलेला आहे. ग्रामीण भागाचा विकास करणे हे देशसमोरील मोठे आव्हान मानले जाते. हे आव्हान पेलण्यासाठी व देशाला सुधारित विकसित

बनवण्यासाठी ग्रामीण भागात शिक्षण जाणे गरजेचे आहे. यासाठी ग्रामीण भागातील युवक परावलंबी न राहता स्वावलंबी बनला पाहिजे. तसेच तो सर्वगुणसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा झाला पाहिजे व म्हणूनच त्याच्या शिक्षणाची सोय करणे गरजेचे आहे.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली असणारे राधाकृष्णन आयोग हे स्वातंत्र्योत्तर काळातील विद्यापीठीय शिक्षणाची ध्येये व आदर्श निश्चित करणारे पहिलेच कमिशन होते. या आयोगामुळे स्वातंत्र्योत्तर भारतात उच्च शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला.

उपघटकावरील स्वयं अध्ययनासाठी विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न

१. ग्रामीण विद्यापीठांची आवश्यकता स्पष्ट करा.

२. ग्रामीण विद्यापीठांच्या शिफारशी स्पष्ट करा.

३. विद्यापीठ शिक्षण आयोगाच्या दृष्टीने शिक्षकाचे स्थान स्पष्ट करा.

४. राधाकृष्णन आयोगाच्या अध्यापकांच्या शिफारशी स्पष्ट करा.

५. विद्यापीठ शिक्षण आयोगाने सांगितलेल्या कला व विज्ञान शिक्षणाच्या शिफारशी स्पष्ट करा.

६. विद्यार्थी शिक्षण आयोगाने सुचवलेले अभ्यासक्रमातील बदल सांगून त्यांच्या शिफारशी स्पष्ट करा.

## संदर्भ ग्रंथ सूची


- ंगटकळ, रंजना संतोष (२००७) – 'माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास' प्राजक्त प्रकाशन, नाशिक तृतीय आवृत्ती
- जाधव, मोहन, भोसले, आरती, सरपोतदार प्राची (२००७) – 'भारतीय शिक्षणाचा विकास' फडके प्रकाशन, कोल्हापूर
- जीवन शिक्षण – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे, विविध अंक
- तांबोळी, शमशुद्दीन व तांबोळी बेनझीर (२००७) – 'प्रभावशाली शिक्षणतज्ज्ञ' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे (२००९)
- दुनाखे, अरविंद (२००६)– 'भारतीय शिक्षणपध्दती व माध्यमिक शिक्षण', नित्यनूतन प्रकाशन, पुणे
- नरवणे मीनल (२००८)– 'भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या' नित्यनूतन प्रकाशन, पुणे
- पाटील, विजय (संपादक) (१९९६) – 'शिक्षणप्रवाह' जीवन शिक्षण प्रकाशन, पुणे
- पाटील, लीला (१९९५) – 'परिवर्तनशील शिक्षण', उन्मेष प्रकाशन, पुणे
- पानसे, रमेश (२००८) – शिक्षण 'परिवर्तनाची सामाजिक चळवळ', डायमंड पब्लिकेशन, पुणे
- भगत, रा. तु. माळी, अ. ल. (१९७८) – 'थोर शिक्षणतज्ज्ञ' गो. य. राणे प्रकाशन, पुणे

- 'महाराष्ट्रातील शिक्षणाचा विकास' – संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे १९७८
- मजुमदार, शा. ब. – 'सिबॉयोसिस – एका संकल्पनेचा चरित्र कथा', मॅकमिलन, पुणे प्रथमआवृत्ती
- महिला व बालविकास – धोरण आणि निर्णय, प्रकाशक – यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे, प्रथम आवृत्ती, २००४
- राऊत, गणेश व राऊत ज्योती (२००७) – 'महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास इ.स. १८१८ ते १९६०', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६) – 'शैक्षणिक आव्हांनाकडून कृती कार्यक्रमाकडे 'जीवन शिक्षण प्रकाशन, पुणे
- जाधव, भोसले व सरपोतदार (२००३) – भारतीय शिक्षणाचा विकास, कोल्हापूर, फडके प्रकाशन.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – गाभाघटक परिचय, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन, (१९८६) प्रशिक्षण संस्था पुणे
- पवार, ना. ग. – 'भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह पुणे, नूतन प्रकाशन
- हिरा अहेर, हिरा – उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक नागपूर, विद्या प्रकाशन
- गद्रे, गीता व गद्रे ल. रा. – शिक्षणाचा इतिहास भाग १,२,३ पुणे, व्हिनस प्रकाशन
- प्रा. देशमुख एल. जी. (२००३) – शिक्षणाचे तत्त्वज्ञानात्मक व समाज शास्त्रीय अधिष्ठान कोल्हापूर, फडके प्रकाशन, जुलै

❖❖❖

# घटक – २

## माध्यमिक शिक्षण आयोग (मुदलियार आयोग १९५२–१९५३)

## Secondary Education Commission (Mudaliar Commission 1952-1953)

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

२.०. उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१. भारतातील माध्यमिक शिक्षण

१. ऐतिहासिक आढावा

२. आयोगाच्या स्थापनेमागील पार्श्वभूमी

३. आयोगाची रचना

४. आयोगाची कार्यकक्षा

५. माध्यमिक शिक्षणातील दोष

२.२.२. माध्यमिक शिक्षण आयोगाच्या शिफारशी

१. माध्यमिक शिक्षणाचे ध्येय

२. माध्यमिक शिक्षणाचा नवीन आकृतिबंध

३. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम

४. पाठ्यपुस्तके

५. अध्यापनाच्या पद्धती

६. विद्यार्थ्यांचे शारीरिक शिक्षण

७. विद्यार्थी कल्याण

अ. धार्मिक व नैतिक शिक्षण

ब. शिस्त व चारित्र्य निर्मिती

क. शालेय ग्रंथालय

ड. अभ्यासपूरक कार्यक्रम

इ. माध्यमिक शाळांमधील मार्गदर्शन व समुपदेशन

ई. परीक्षा व मूल्यमापन

८. शिक्षक वर्ग

९. शालेय व्यवस्थापनाच्या समस्या

२.२.३. आयोगाचे मूल्यमापन

२.२.४. स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.२.५. संदर्भसूची

## २.0 उद्दिष्टे:

या घटकाचे अभ्यासानंतर आपणास –

- भारतातील माध्यमिक शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा, माध्यमिक शिक्षण आयोगाच्या स्थापनेमागील पार्श्वभूमी सांगता येईल.
- माध्यमिक शिक्षण आयोगाची रचना, माध्यमिक शिक्षण आयोगाची कार्यकक्षा आणि माध्यमिक शिक्षणातील दोष इत्यादीची माहिती सांगता येईल.
- माध्यमिक शिक्षणाची ध्येये, माध्यमिक शिक्षणाचा नवीन आकृतिबंध व शालेय अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्यापनाच्या पद्धती, शारीरिक शिक्षण, विद्यार्थी कल्याण, शिक्षक वर्ग आणि शालेय व्यवस्थापन यांच्या संदर्भात माध्यमिक शिक्षण आयोगाच्या शिफारशी तुमच्या शब्दात सांगता येईल.
- माध्यमिक शिक्षण आयोगाच्या कार्य कक्षाचे आणि शिफारशींचे मूल्यमापन करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

माध्यमिक शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या जीवनाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. माध्यमिक शिक्षण हा विद्यार्थी जीवनामध्ये प्राथमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. बऱ्याच वेळेला बहुसंख्य विद्यार्थी माध्यमिक शिक्षणाच्या अखेरीस आपले शिक्षण पुरे करतात. माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठ शिक्षणासाठी विद्यार्थी येथूनच वळतात. उच्च शिक्षणामध्ये प्रवेश करून एखाद्या विशेष शाखेमध्ये ज्ञान ग्रहण करण्याचे काम आणि त्याचा पाया या माध्यमिक शिक्षणामध्ये भक्कम होत असतो.

माध्यमिक शिक्षण हे जर सदोष असेल तर एकंदर शिक्षणव्यवस्थेचा पायाच डळमळीत होऊ शकतो. स्वातंत्र्यपूर्व काळात, माध्यमिक शिक्षणाचे सर्वकष परीक्षण झाल्याचे दिसत नाही. माध्यमिक शिक्षण हे विद्यार्थी जीवनामध्ये अत्यंत महत्वाचे आहे. माध्यमिक शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक अशा अनेक पातळीवर बदल होतात. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाची स्थिती चांगली असणे अत्यंत गरजेचे आहे. माध्यमिक शिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी आणि माध्यमिक शिक्षणाचा सांगोपांग विचार करण्यासाठी भारत सरकारने डॉ. ए. एल. मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना १९५२ साली केली.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१. भारतातील माध्यमिक शिक्षण

या भागांमध्ये भारतातील माध्यमिक शिक्षणाची थोडी माहिती आपण पाहू या.

### १) ऐतिहासिक आढावा

माध्यमिक शिक्षणाची सुरुवात १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटिश सरकारने जे सर्वेक्षण केले त्याच्याशी निगडित आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारने ज्या विविध समित्या भारतातील शिक्षणावर विचार करण्यासाठी नेमल्या होत्या, त्यांनी केलेल्या काही शिफारशी व त्यांचा परिणाम थोडक्यात असा –

सन १८३५ च्या मेकॉलेच्या जाहीरनामा –

युरोपीय साहित्य आणि विज्ञान यांचा भारतीय लोकांत प्रसार

भारतीय लोकांना शिक्षण देण्याचा ब्रिटिश सरकारचा हेतू निश्चित

सन १८५४ च्या वुडचा खलिता –

भारतात विद्यापीठांची स्थापना होऊन उच्च शिक्षणाला सुरुवात

माध्यमिक शिक्षणासंबंधीचे विद्यापीठांना अधिकार

माध्यमिक शिक्षणाला केवळ विद्यापीठ शिक्षणाची पूर्वतयारी असे दुय्यम स्थान प्राप्त

सन १८८२ च्या हंटर कमिशन –

माध्यमिक शिक्षणस्तरावर विभिन्न अभ्यासक्रमांची सोय

अनुदानाची शिफारस

सन १९०२ च्या विद्यापीठ आयोग –

माध्यमिक शाळांना मान्यता देण्याचे अधिकार विद्यापीठांवर

सन १९१७ सालच्या कलकत्ता विद्यापीठ आयोग –

इंटरमीडिएट कॉलेजेस निवडक माध्यमिक शाळांना जोडावीत

इंटर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना विद्यापीठात प्रवेश

सन १९२९ च्या हरटॉग समिती –

हंटर कमिशनच्या शिफारशींचीच पुनरुक्ती

माध्यमिक स्तरावर व्यावसायिक अभ्यासक्रमाची सोय करावी

सन १९३४ च्या सप्रू समिती –

विभिन्न अभ्यासक्रमाची शिफारस केली.

सन १९३६–३७ च्या बट – वुड समिती

व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या स्थापनेची शिफारस

सन १९४४ च्या सार्जंट समिती –

सर्वसाधारण शाळांच्या बरोबरीने तांत्रिक शाळांची आवश्यकता प्रतिपादन

स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ ताराचंद समिती तसेच डॉ. राधाकृष्णन आयोग यांनी माध्यमिक शिक्षणासंदर्भात काही महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

## २) आयोगाच्या स्थापनेमागील पार्श्वभूमी

भारतात माध्यमिक शाळा केवळ इंग्रजी भाषेचे ज्ञान देण्याच्या हेतूने सुरू झाल्या. या शाळांमधून विद्यार्थ्यांची विद्यापीठाकडून घेतल्या जाणाऱ्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेची तयारी आणि त्या दृष्टीने केवळ पुस्तकी अभ्यासक्रम अशाच स्वरूपाचे शिक्षण होते. १८८२ सालच्या हंटर कमीशनने माध्यमिक शिक्षणातील दोष नजरेस आणले. त्यांच्या शिफारशींचा माध्यमिक शिक्षणावर फारसा प्रभाव झाला नसल्याचे दिसते. केवळ अभ्यासक्रमाची विविधता निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाल्याचे दिसते.

सन १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले त्या वेळी माध्यमिक शिक्षण हे विद्यार्थ्यांना केवळ महाविद्यालयीन शिक्षणासाठी पात्र बनविणे आणि त्यासोबतच इतर कोणत्याही क्षेत्रांसाठी अपात्र ठरविणे असे एकमार्गी स्वरूपाचे बनले होते. माध्यमिक शिक्षणाचा दर्जाही वाढत्या संख्येमुळे खालावत चाललेला होता. तेव्हा माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना करणे, माध्यमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमात विविधता आणणे, जीवनाच्या विविध क्षेत्रांत प्रवेश करण्यासाठी विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करून घेणे आणि त्यांना त्या क्षेत्रांकडे वळविणे ही काळाची गरज बनली होती. सन १९४८ साली नेमलेल्या डॉ. राधाकृष्णन आयोगानेही विद्यापीठ शिक्षणाच्या योग्य विकासासाठी माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे असे सूचित केले होते.

सन १९४८ मध्येच केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने आपल्या बैठकीत माध्यमिक शिक्षणाचा विचार करण्यासाठी एक स्वतंत्र आयोग नियुक्त केला जावा असा प्रस्ताव भारत सरकारपुढे मांडला होता. त्यानुसार भारत सरकारने तत्कालीन शिक्षण सल्लागार डॉ. ताराचंद यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नियुक्ती केली. या समितीने माध्यमिक शिक्षणासंदर्भात काही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. १९४८ साली केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या सरकारने केलेल्या शिफारशींचा काहीही अंमल न झाल्याने पुन्हा १९५१ मध्ये मंडळाने माध्यमिक शिक्षण आयोगाच्या नियुक्तीचा पुनरुच्चार केला.

या सर्व परिस्थितीचा विचार करून भारत सरकारने २३ सप्टेंबर, १९५२ ला डॉ. ए. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली 'माध्यमिक शिक्षण' आयोगाची नियुक्ती केली. डॉ. मुदलियार हे अनुभवी शिक्षणतज्ज्ञ असून त्या वेळी मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू होते.

### ३) आयोगाची रचना

या आयोगामध्ये एक अध्यक्ष, सात सदस्य, एक सचिव आणि एक उपसचिव अशा दहा लोकांचा समावेश होता, आयोगाची रचना खालीलप्रमाणे होती.

**Chairman -**

Dr. A. Lakshmanaswami Mudaliar : Vice-Chancellor Madras University.

**Members**

1. Principal John Christie: Jesus College, Oxford.
2. Dr. Kenneth Rast Williams: Associate Director, Southern Regional Education Board, Atlanta (U. S. A.)
3. Mrs. Hansa Mehta: Vice Chancellor Baroda University.
4. Shri. J. A. Taraporevala: Director of Technical Education, Government of Bombay.
5. Dr. K. L. Shrimali: Principal, Vidya Bhavan Teacher's Training College, Udaipur.
6. Shri. M. T. Vyas: Principal New Era School, Bombay.
7. Shri. K. G. Saiyidain : Joint Secretary to the Government of India. Ministry of Education (Ex. Officio Member)

**Secretary**

Principal A. N. Basu : Central Institute of Education, Delhi

**Assistant Secretary**

Dr. M. S. Chari: Education Officer, Ministry of Education.

याशिवाय, आयोगाच्या भेटीवेळी काही राज्यांनी आपापल्या राज्यात शिक्षणविभागातील व्यक्तीची अथवा शिक्षणतज्ज्ञाची स्वीकृत सदस्य म्हणून आयोगावर निवड केली होती. स्वीकृत सदस्यांची एकूण संख्या १७ होती.

### ४) आयोगाची कार्यकक्षा

आयोगाकडे प्रामुख्याने खालील दोन महत्त्वाच्या बाबींची जबाबदारी देण्यात आली होती.

(अ) भारतातील माध्यमिक शिक्षणाच्या सर्व बाबींच्या सद्य:स्थितीची पाहणी करून अहवाल तयार करणे

(ब) माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना व सुधारणा ह्यासंबंधी खालील गोष्टींना अनुलक्षून उपाय सुचविणे.

१. माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्टे, व्यवस्थापन व अभ्यासक्रम.

२. प्राथमिक, मूलोद्योग व उच्च शिक्षणाशी त्याचा संबंध.

३. विविध प्रकारच्या माध्यमिक शाळांचे परस्परसंबंध.

४. राष्ट्राला आपल्या गरजा व साधनस्रोत यांचा विचार करता माध्यमिक शिक्षणाची सक्षम व समान पद्धती अनुकूल ठरेल अशा इतर आनुषंगिक बाबी.

भारताचे त्यावेळचे शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या हस्ते या आयोगाचे दि. ६ ऑक्टोबर, १९५२ रोजी उद्घाटन झाले. आयोगाने प्रश्नावली, प्रत्यक्ष पाहणी यांच्या साह्याने माहिती मिळवून १५ अध्यायांमध्ये विभागलेला २४२ पृष्ठांचा मुख्य अहवाल (निष्कर्ष, सारांश, शिफारशी व परिशिष्टासह– ३११ पृष्ठे) २९ ऑगस्ट, १९५३ रोजी सरकारला सादर केला.

आयोगाने आपल्या अहवालात माध्यमिक शिक्षणातील अनेक दोष निदर्शनास आणले आहेत.

**५) माध्यमिक शिक्षणातील दोष**

आयोगाने सर्व दोषांचे सहा गटात वर्गीकरण केले आहे.

१. आपल्या शाळांमधून दिले जाणारे शिक्षण विद्यार्थ्यांच्या जीवनापासून पूर्णत: अलिप्त आहे.

२. हे शिक्षण अत्यंत संकुचित आणि एकांगी स्वरूपाचे आहे. विद्यार्थ्यांच्या अभिवृत्ती, कल, अभिरुची, रसास्वाद यांचा विचार केला जात नाही.

३. सध्याच्या शिक्षणावर इंग्रजी भाषेचे वर्चस्व आहे.

४. विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता किंवा कार्यक्षमता विकसित केली जात नाही.

५. त्यामुळे शिक्षकांच्या कार्यक्षमतेचा ऱ्हास होत आहे

६. परीक्षेचे ओझे, साचेबंद अभ्यासक्रम, यांत्रिक व जीवनशून्य अध्यापन पद्धती, प्रयोगशीलतेची खच्चीकरण होत असल्याने शिक्षकांच्या स्वयंम कर्तृत्वास, नवचैतन्यास अडथळा निर्माण होतो.

## २.२.२. माध्यमिक शिक्षण आयोगाच्या शिफारशी

### १. माध्यमिक शिक्षणाची ध्येये

लोकशाहीमधील सुजाण व जबाबदार नागरिकत्व घडविणे, देशाच्या विकासासाठी उत्पादनक्षमता वाढविणे आणि लोकांचे राहणीमान उंचावणे, त्यांचा सांस्कृतिक विकास घडविणे या हेतूंच्या संदर्भात आयोगाने माध्यमिक शिक्षणाची ध्येये निश्चित केली आहेत. निश्चित केलेल्या ध्येयांचा सारांश पुढीलप्रमाणे –

### अ. लोकशाही नागरिकत्वाचा विकास

माध्यमिक शिक्षणाचे प्रमुख ध्येय लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे असले पाहिजे. सुस्पष्ट व स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता, लेखन व संभाषणातील सुस्पष्टता, शिस्त, सहकार्य, सामाजिक संवेदनशीलता, सहनशीलता, राष्ट्रभक्तीची आणि विश्व नागरिकत्वाची भावना या बाबींचा विकास माध्यमिक शिक्षणातून झाला पाहिजे.

### ब. व्यावसायिक कार्यक्षमतेचा विकास

विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक, तांत्रिक कौशल्ये, उत्पादक कार्यक्षमतेचा विकास होण्यासाठी सर्व शाळांमध्ये हस्तकला अणि उत्पादक कार्यांवर अधिक भर दिला गेला पाहिजे. व्यावसायिक अथवा उत्पादक कार्याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना शाळांतून मिळाला पाहिजे. श्रमाविषयी त्याच्या मनात आदराची भावना निर्माण झाली पाहिजे. या स्तराच्या अखेरीस एखादा व्यवसाय निवडता येईल व त्याद्वारे जीवन यशस्वीपणे जगता येईल.

### क. व्यक्तिमत्त्वाचा विकास

विद्यार्थ्यांना नवनिर्माण क्षमतेची क्षेत्रे उपलब्ध होतील यादृष्टीने माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना केली पाहिजे. माध्यमिक शिक्षणातून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक, कलात्मक, साहित्यिक इत्यादी क्षेत्रांमधील विकास झाला पाहिजे आणि हा विकास समतोल असला पाहिजे. शिक्षणातून निकोप व्यक्तिमत्त्व वाढीस लागले पाहिजे. व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे हे माध्यमिक शिक्षणाचे ध्येय असावे.

### ड. नेतृत्व विकास

विद्यार्थ्यांना शिस्त आणि नेतृत्व यांचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे. राष्ट्रविकासाच्या दृष्टीने नि:स्वार्थी, ध्येयवादी नेतृत्वाची गरज आहे. ही गरज माध्यमिक शिक्षणाने पूर्ण केली पाहिजे. राष्ट्रविकासासाठी आपल्या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडणारे नागरिक तयार करणे हे माध्यमिक शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

### २. माध्यमिक शिक्षणाचा नवीन आकृतिबंध

माध्यमिक शिक्षणाचा आकृतिबंध, तंत्रशिक्षण, विविध प्रकारच्या इतर शाळा आणि सहशिक्षण या विविध बाबींचा विचार करून त्या संदर्भात आयोगाने खालील शिफारशी केल्या आहेत.

१. माध्यमिक शिक्षणाचा कालावधी सात वर्षांचा असावा.

२. ११ ते १७ या वयोगटातील मुलां-मुलींच्यासाठी माध्यमिक शिक्षण दिले जावे.

३. माध्यमिक शिक्षणाचा कालावधी दोन स्तरांत विभागला जावा.

   (१) मिडल स्कूल/कनिष्ठ माध्यमिक अथवा वरिष्ठ प्राथमिक स्तर - ३ वर्षे

   (कनिष्ठ प्राथमिक स्तरावरील ४ ते ५ वर्षांच्या शिक्षणानंतर)

   (ब) उच्च माध्यमिक स्तर ४ वर्षे

४. सध्याचे इंटरमिजिएटचे वर्ग बंद करावेत. त्यातील प्रथम वर्ष हायस्कूल शिक्षणाला जोडावे आणि द्वितीय वर्ष वरिष्ठ महाविद्यालयाला जोडावे.

५. विद्यापीठ शिक्षणाचा पदवी अभ्यासक्रम तीन वर्षांचा असावा.

६. बहुउद्देशीय शाळा स्थापन कराव्यात. विद्यार्थ्यांना आपली आवड, क्षमता अभ्यासक्रमाची निवड करता येण्यासाठी या शाळांतील अभ्यासक्रमात विविधता आणावी.

७. ग्रामीण शाळांमधून कृषी शिक्षण, बागकाम आणि पशुपालन शिक्षणाबाबत सर्व राज्यसरकारांनी प्रयत्न करावेत.

८. बहुउद्देशीय शाळा किंवा स्वतंत्र शाळांमधून विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण मिळावे म्हणून औद्योगिक केंद्राच्या ठिकाणी तंत्र शाळा सुरू केल्या जाव्यात.

९. स्थानिक शाळांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी मोठ्या शहरांमध्ये 'तांत्रिक संस्था' सुरू केल्या जाव्यात.

१०. 'तंत्रशाळा' प्रामुख्याने कारखान्याच्या जवळ अथवा औद्योगिक केंद्राच्या जवळ स्थापन केल्या जाव्यात. संबंधित औद्योगिक केंद्राच्या सहाकार्याने तेथील कामकाज चालावे. तंत्रशिक्षणाच्या विकासासाठी 'औद्योगिक शिक्षण कर' सुरू केला जावा.

११. सार्वजनिक शाळा (Public Schools), वसतिगृहयुक्त शाळा स्थापन कराव्यात.

१२. काही निवडक केंद्रांमध्ये निवासी शाळा स्थापन करून तेथे शिक्षक-विद्यार्थी संबंध दृढ करण्यासाठी अभ्यासपूरक कार्यक्रम आणि सर्जनशील उपक्रम राबवावेत.

१३. मुले-मुली यांच्या शिक्षणात फरक केला जाऊ नये. मुलींच्या शाळांमध्ये गृहशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी.

१४. मुलींसाठी स्वतंत्र शाळांची जेथे मागणी होईल तेथे त्या शासनामार्फत सुरू केल्या जाव्यात.

१५. निवडक विद्यार्थ्यांना राज्य व केंद्र सरकारने गुणवत्तेच्या आधारावर मोफत छात्र शिष्यवृत्ती द्यावी.

**३. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम**

**भाषांचा अभ्यास**

१. सामान्यतः मातृभाषा अथवा प्रादेशिक भाषा ह्याच शिक्षणाचे माध्यम म्हणून माध्यमिक शिक्षणासाठी सर्वत्र उपयोगात आणाव्यात. भाषिक अल्पसंख्याकांसाठी केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाच्या सूचनांची अंमलबजावणी करावी

२. मिडलस्कूल स्तरावर किमान दोन भाषा शिकविल्या जाव्यात. मात्र दोन्ही भाषा एकाच वर्षी सुरू करू नयेत.

३. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर किमान दोन भाषांचा अभ्यास केला जावा. यातील एक भाषा 'मातृभाषा' व दुसरी भाषा 'प्रादेशिक भाषा' असावी.

आयोगाने माध्यमिक शिक्षणाचे दोन स्तर निश्चित केले आहेत. या दोन्ही स्तरांवरील अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे -

**(अ) मिडल स्कूल / कनिष्ठ माध्यमिक / वरिष्ठ प्राथमिक (मूलोद्योग) स्तरांवरील अभ्यासक्रम**

(१) भाषा (दोन भाषा) (२) सामाजिक शास्त्र

(३) सामान्य विज्ञान (४) गणित

(५) कला व संगीत (६) हस्तव्यवसाय

(७) शारीरिक शिक्षण.

**(ब) माध्यमिक – उच्च माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रम**

(अ) भाषा:

(१) मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषा किंवा मातृभाषा आणि अभिजात भाषा (प्राचीन भारतीय भाषा) संयुक्त अभ्यासक्रम

(२) खालीलपैकी एक भाषा

(अ) हिंदी (मातृभाषा हिंदी असणाऱ्यांसाठी)

(ब) सामान्य इंग्रजी (कनिष्ठ माध्यमिक स्तरावर ज्यांनी अभ्यास नाही अशांसाठी)

(क) प्रगत इंग्रजी (कनिष्ठ माध्यमिक स्तरावर ज्यांनी अभ्यास आहे अशांसाठी)

(ड) एक आधुनिक भारतीय भाषा (हिंदी व्यतिरिक्त)

(इ) एक आधुनिक परदेशी भाषा (इंग्रजी व्यतिरिक्त)

(ई) एक अभिजात भाषा (प्राचीन भारतीय भाषा)

**(ब) (१) सामाजिक अभ्यास: सामान्य अभ्यासक्रम (पहिल्या दोन वर्षांसाठी)**

(२) गणित आणि सामान्य विज्ञान: सामान्य अभ्यासक्रम(पहिल्या दोन वर्षांसाठी)

**(क) हस्तव्यवसाय (खालीलपैकी एक हस्तव्यवसाय)**

(१) सूतकताई व विणकाम

(२) लाकूड-काम

(३) धातूकाम

(४) बागकाम

(५) शिवणकाम

(६) मुद्रणकला

(७) कार्यशाळा सराव

(८) शिलाई, सुईकाम व कशिदा

(९) प्रतिकृती तयार करणे.

**(ड) ऐच्छिक विषय :** (खालीलपैकी कोणत्याही एका गटातील तीन विषय)

**गट १ : मानव्यशास्त्र :**

(१) प्राचीन (Classical) भाषा अथवा 'अ मधून निवडलेली तृतीय भाषा.

(२) इतिहास

(३) भूगोल

(४) अर्थशास्त्र व नागरिकशास्त्राचे घटक

(५) मानसशास्त्र व तर्कशास्त्राचे घटक

(६) गणित

(७) संगीत

(८) गृहशास्त्र

**गट २ : विज्ञान :**

(१) भौतिकशास्त्र (२) रसायनशास्त्र

(३) जीवशास्त्र (४) भूगोल

(५) गणित

(६) शरीरशास्त्र व आरोग्यशास्त्राचे घटक (जीवशास्त्र विषय निवडला नसल्यास)

**गट ३ : तंत्रविज्ञान :**

(१) उपयोजित गणित व भौमितीय चित्रण (२) उपयोजित विज्ञान

(३) यांत्रिक अभियांत्रिकीचे घटक (४) विद्युत अभियांत्रिकीचे घटक

**गट ४: वाणिज्य:**

(१) वाणिज्य सराव (२) लेखापालन

(३) वाणिज्य, भूगोल किंवा अर्थशास्त्र व नागरिकशास्त्राचे घटक

(४) लघुलेखक आणि टंकलेखन

**गट ५ : कृषी:**

(१) सामान्य कृषी (२) पशुविज्ञान

(३) फलोद्यानशास्त्र आणि बागकाम (४) कृषी रसायन आणि वनस्पतिशास्त्र.

**गट ६ : ललित कला :**

(१) कला इतिहास (२) चित्रकला व आरेखन

(३) रंगकला (४) प्रतिकृती निर्मिती

(५) संगीत कला (६) नृत्यकला.

**गट ७ : गृहशास्त्र :**

(१) गृह अर्थशास्त्र (२) आहारशास्त्र व पाककला

(३) मातृव्यवसाय बलसंगोपन (४) गृहव्यवस्थापन व गृहशुश्रूषा.

वरील सात गटांपैकी कोणत्याही एका गटातील तीन विषय विद्यार्थ्याने निवडले तरी अ, ब, क विभागात दिलेले विषय हे गाभाभूत विषय सर्वांना सारखे असतील.

## ४. पाठ्यपुस्तके

माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकांचा दर्जा सुधारण्यासाठी आयोगाने खालील शिफारशी केल्या आहेत.

१. पाठ्यपुस्तकाची गुणवत्ता व दर्जा सुधारण्यासाठी उच्चाधिकारी असलेली पाठ्यपुस्तक समिती गठित केली जावी. ही समिती पूर्णतः स्वायत्त असावी.

२. पाठ्यपुस्तकाचा कागद, मांडणी, छपाई व स्वरूप यांसंबंधीचे निकष वरील समितीने निर्धारित करावेत.

३. पाठ्यपुस्तकांच्या विक्रीमधून प्राप्त होणारा निधी गरजू शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या पुस्तके व इतर बाबी पुरविण्यासाठी करावा.

४. पुस्तक मांडणीचे तंत्र विकसित करण्यासाठी केंद्र सरकारने एक नवीन संस्था स्थापन करावी अथवा सध्या अस्तित्वात असलेल्या कला महाविद्यालयांची मदत घ्यावी.

५. कलात्मक मांडणी असणाऱ्या पुस्तकांचे एक ग्रंथालय केंद्र अथवा राज्य शासनाने विकसित करावे आणि त्याद्वारे चांगली पुस्तक मांडणी होण्याकरिता पाठ्यपुस्तक समिती आणि प्रकाशक यांना नमुना पुस्तके पुरवावीत.

६. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र पाठ्यपुस्तक निर्धारित न करता, काही दर्जेदार पुस्तकांची शिफारस केली जावी. संबंधित शाळांनी त्यामधील पुस्तकांची निवड करावी.

७. भाषा विषयांसाठी प्रत्येक वर्गासाठी योग्य दर्जा असलेली निश्चित अशी पाठ्यपुस्तके निर्धारित केली जावीत.

८. पाठ्यपुस्तके आणि नियुक्त पुस्तके यांच्यात वारंवार होणारा बदल टाळावा.

९. कोणत्याही समाजाच्या अथवा जातिधर्माच्या आड येणारी किंवा कोणत्याही समाजाची मने दुखावणारी विधाने अथवा मजकूर पाठ्यपुस्तकात अथवा सामान्य अभ्यासासाठीच्या पुस्तकात असू नये, तसेच विशिष्ट राजकीय अथवा धार्मिक वैशिष्ट्यांचा तरुण विद्यार्थ्यांच्या मनावर पगडा निर्माण होईल अशी पुस्तके असू नयेत.

**५. अध्यापनाच्या पद्धती**

माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाच्या दृष्टीने योग्य, गतिमान आणि कृतिशीलतेवर आधारित अध्यापन पद्धतींच्या दृष्टीने आयोगाने खालील शिफारशी केल्या आहेत.

१. शाळांमध्ये उपयोगात आणल्या जाणाऱ्या अध्यापन पद्धतींचा उद्देश केवळ कार्यक्षम अथवा परिणामकारक पद्धतीने ज्ञान देणे एवढाच नसून विद्यार्थ्यांमध्ये चांगली मूल्ये, योग्य दृष्टिकोन आणि कामाची सवय विकसित करणे हा सुद्धा आहे.

२. अध्यापन पद्धती या विद्यार्थ्यांमध्ये श्रमासंबंधी कार्यासंबंधी प्रेम जागृत ते शक्य तितक्या कार्यक्षमतेने, प्रामाणिकपणे पूर्ण करण्याची सवय लावणाऱ्या असाव्यात.

३. अध्यापन हे केवळ शाब्दिक अथवा पाठांतरावर भर देणारे असू नये. तर ते पूर्णत: उद्दिष्टगामी, साकार आणि वास्तववादी असावे त्यासाठी अध्यापनात कृतिशील पद्धती आणि प्रकल्प पद्धतीच्या तत्त्वांचा एकत्रित वापर करावा.

४. अध्यापन पद्धती या विद्यार्थ्यांना कृतीच्या अध्ययनाची आणि वर्गात संपादन केलेल्या ज्ञानाचा

व्यवहारामध्ये वापर करण्याची संधी उपलब्ध करून देणाऱ्या असाव्यात. विविध प्रकारचे आविष्कार कार्य (Expression work) हा प्रत्येक शालेय विषयाचा महत्त्वपूर्ण भाग असावा.

५. सर्व विषयांचे अध्यापन करताना लेखी तसेच मौखिक दोन्ही स्वरूपात सुस्पष्ट विचार आणि अभिव्यक्ती यावर विशेष भर दिला जावा.

६. ज्ञान देण्यापेक्षा व्यक्तिगत प्रयत्नांद्वारा ज्ञान संपादनाच्या पद्धतींचे प्रशिक्षण देणे हा अध्यापन पद्धतींचा हेतू असला पाहिजे.

७. सामूहिक जीवन आणि सहकार्य हे गुण विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांना समूहात काम करण्याची तसेच सामूहिक प्रकल्प व कृती पूर्ण करण्याची संधी द्यावी.

## ६. विद्यार्थ्यांचे शारीरिक कल्याण

आयोगाने शारीरिक शिक्षणासंबंधी आपले विचार पुढील शब्दात व्यक्त केले आहेत. 'शारीरिक शिक्षण' हा शिक्षणाचा जोपर्यंत आवश्यक भाग म्हणून स्वीकारला जात नाही, तोपर्यंत राष्ट्रीय कल्याण साधण्यासाठी राष्ट्राचे युवक आपली जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने सक्षम होणार नाहीत. आरोग्य शिक्षण व शारीरिक शिक्षणाच्या संदर्भात आयोगाने केलेल्या प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे –

### (अ) आरोग्य शिक्षण

१. सर्व राज्यांमध्ये सुसंघटित स्वरूपाची शालेय आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जावी.

२. प्रत्येक वर्षी सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संपूर्ण आरोग्य तपासणी केली जावी.

३. प्रथमोपचार व आरोग्याची सामान्य तत्त्वे यासंबंधी काही शिक्षकांना प्रशिक्षित करावे.

४. वसतिगृहे व निवासी शाळांमधून योग्य पौष्टिक आहाराचा दर्जा टिकविला जावा.

### (ब) शारीरिक शिक्षण

१. विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता लक्षात घेऊन शाळेने शारीरिक उपक्रम राबवावेत.

२. चाळीस वर्षांखालील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी आयोजित उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा.

३. विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या प्रत्येक शारीरिक उपक्रमाची पूर्ण नोंद ठेवावी.

४. शारीरिक शिक्षणासंबंधीच्या प्रशिक्षणात सर्व आरोग्य शिक्षणाच्या उपक्रमांचा समावेश केला जावा.

५. शारीरिक शिक्षणाच्या शिक्षकांनी शरीरशास्त्र व आरोग्यशास्त्र या विषयांचे अध्यापन करावे.

६. शारीरिक शिक्षणासंबंधीच्या प्रशिक्षण सुविधांचा विस्तार केला जावा. शारीरिक शिक्षण देणारी नवीन महाविद्यालये सुरू करावीत.

## ७. विद्यार्थी कल्याण

### अ. धार्मिक व नैतिक शिक्षण

विद्यार्थ्यांच्या चारित्र्यनिर्मितीत धार्मिक व नैतिक शिक्षण महत्वपूर्ण भूमिका बजावते. आयोगाने या शिक्षणासंबंधी केलेल्या शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

१. धार्मिक शिक्षण हे शाळांमधून ऐच्छिक स्वरूपात शाळेच्या व्यतिरिक्त वेळेत दिले जावे.

२. हे शिक्षण पालक व व्यवस्थापन यांच्या अनुमतीने दिले जावे आणि विशिष्ट श्रद्धा असणाऱ्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित असावे.

### ब. शिस्त आणि चारित्र्यनिर्मिती

आयोगाने चारित्र्य शिक्षणावर विशेष भर दिला आहे. या संदर्भात केलेल्या महत्त्वपूर्ण शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

१. चारित्र्य शिक्षण ही शिक्षकांची जबाबदारी समजून शाळेच्या प्रत्येक उपक्रमातून ते उपलब्ध व्हावे.

२. विद्यार्थ्यामध्ये शिस्त वृद्धिंगत होण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील व्यक्तिगत संबंध बळकट व्हावेत.

३. सर्व शाळांमध्ये स्वयंशासन पद्धती निर्माण केली जावी. ती कुलपद्धतीप्रमाणे असावी किंवा वर्गनायक आणि विद्यार्थी मंडळाच्या स्वरूपात असावी. विद्यार्थ्यांसाठी आचारसंहिता तयार करणे व तिची कार्यवाही करणे याला ती जबाबदार असावी.

४. सतरा वर्षांखालील मुलांचा राजकीय प्रचारासाठी आणि निवडणूक मोहिमेसाठी वापर करणे हा गुन्हा समजून त्यासाठी योग्य कायदा संमत करावा.

५. समूह खेळांना आणि अभ्यासपूरक कार्यक्रमांना विशेष महत्त्व द्यावे. त्यांच्या शैक्षणिक शक्यतांचा शोध घ्यावा.

### क. शालेय ग्रंथालये

माध्यमिक शाळांतील ग्रंथालयासंबंधी आयोगाने खालील शिफारशी केल्या आहेत.

१. सुसज्ज ग्रंथालय हे विद्यार्थ्यांमध्ये साहित्य व संस्कृती याबद्दल अभिरुची निर्माण करते. तेव्हा प्रत्येक शाळेला ग्रंथालय असले पाहिजे. वर्ग ग्रंथालय व विषय ग्रंथालयाची सोयही शाळेत असली पाहिजे.

२. सर्व माध्यमिक शाळांत प्रशिक्षित ग्रंथपाल असावेत.

३. अध्यापक महाविद्यालयांद्वारे व उजाळा वर्गाद्वारे सर्व शिक्षकांना ग्रंथालयीन कामाची मूलभूत तत्त्वे समजावून दिली पाहिजे.

४. सार्वजनिक ग्रंथालयामध्ये मुलांसाठी आणि प्रौढांसाठी विशेष विभाग असावेत.

५. विद्यार्थ्यांच्या सोईसाठी दीर्घ सुट्टीच्या कालावधीतही शाळांतील ग्रंथालये उघडी असावीत.

## ड. अभ्यासपूरक कार्यक्रम

१. शाळांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा 'अभ्यासपूरक कार्यक्रम' हा एक महत्त्वाचा भाग मानला जावा. सर्व शिक्षकांनी निश्चित कालावधी यासाठी खर्च करावा.

२. राज्य शासनाने 'बालवीर' मोहिमेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा. बालवीर शिबिरांसाठी सुयोग्य क्षेत्रे निर्माण करण्यासाठी मदत करावी. शाळांनी आपल्या शाळांतील विद्यार्थी गटांना अशा शिबिरांत भाग घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

३. राष्ट्रीय छात्र सेना' ही केंद्रशासनाच्या अधिपत्याखाली आणावी. ज्यायोगे तिची योग्य देखभाल, प्रगती व विस्तार होऊ शकेल.

४. प्रथमोपचार प्रशिक्षण आणि ज्युनिअर रेडक्रॉस कार्य यांना सर्व शाळांमध्ये प्रोत्साहन दिले जावे.

## इ. माध्यमिक शाळांमधील मार्गदर्शन व समुपदेशन

आपले भवितव्य योग्य रीतीने घडविता येण्यासाठी माध्यमिक शाळांत मार्गदर्शन व समुपदेशन या संदर्भात आयोगाने केलेल्या महत्त्वपूर्ण शिफारशी समुपदेशन सुविधा असणे गरजेचे आहे. खालीलप्रमाणे

१. शिक्षणक्षेत्रातील अधिकारी व्यक्तींना शैक्षणिक मार्गदर्शनाचे पुरेसे अवधान असणे आवश्यक आहे.

२. औद्योगिक व्यवसायांचे स्वरूप, महत्त्व व व्याप्ती यांच्याविषयीच्या विद्यार्थ्यांच्या आकलनाच्या कक्षा रुंदावण्यासाठी विविध उद्योगांतील कामाच्या स्वरूपासंबंधीच्या चित्रफिती तयार कराव्यात तसेच प्रत्यक्ष भेटींची त्याला पूरक जोड द्यावी.

३. सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रशिक्षित मार्गदर्शन अधिकारी आणि व्यवसाय मार्गदर्शकांची सेवा क्रमाक्रमाने उपलब्ध करून द्यावी.

४. केंद्र सरकारने मार्गदर्शन अधिकारी व व्यवसाय मार्गदर्शक यांच्या प्रशिक्षणासाठी विभागवार केंद्रे सुरू करण्याची जबाबदारी उचलावी. राज्यांनी या केंद्रात शिक्षक व इतर व्यक्ती प्रशिक्षणासाठी पाठवाव्यात.

५. शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनासंबंधी संशोधन करण्याकरिता आणि भारतीय परिस्थितीचा आणि विद्यार्थ्यांच्या गरजांचा विचार करून विविध चाचण्या विकसित करण्याकरिता 'केंद्रीय संशोधन संघटना' स्थापन केली जावी.

६. वरील सर्व बाबी साध्य करण्यासाठी प्रत्येक राज्यात 'शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन मंडळ' असावे.

## ई. परीक्षा व मूल्यमापन

आयोगाने परीक्षा व मूल्यमापनाचे शिक्षणातील महत्त्व, परीक्षांचे प्रकार, प्रचलित परीक्षा पद्धतीमधील दोष आणि व्याप्ती, परीक्षांचे शिक्षणावरील परिणाम यांची तपशीलवार माहिती देऊन प्रचलित परीक्षा व मूल्यमापन पद्धतीत सुधारणा होण्यासाठी खालील शिफारशी केल्या आहेत.

१. बाह्य परीक्षांची संख्या कमी केली जावी.

२. वस्तुनिष्ठ चाचण्या आणि बदलत्या स्वरूपाच्या प्रश्नांद्वारे निबंधवजा प्रश्नांची व्यक्तिनिष्ठता कमी करावी.

३. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचे मूल्यमापन होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शालेय नोंदीची सुयोग्य पद्धती विकसित केली जावी.

४. अंतर्गत चाचण्या आणि विद्यार्थ्यांच्या शालेय नोंदी यांचा अंतिम परीक्षेसाठी विचार केला जावा.

५. अंतर्गत व बाह्य परीक्षेमधील कामाचे मूल्यमापन व श्रेणी पद्धती आणि शालेय नोंदी ठेवण्यासाठी संख्यात्मक गुणदानाऐवजी सांकेतिक पद्धतीचा वापर केला जावा.

६. माध्यमिक शिक्षण स्तरा अखेरीस एकच सार्वजनिक परीक्षा घेतली जावी.

७. विद्यार्थ्याला द्यावयाच्या प्रमाणपत्रात बाह्य परीक्षेमधील विविध विषयांतील निकालाबरोबरच अंतर्गत चाचण्यांचा निकाल आणि शालेय नोंदीतील महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश व्हावा.

८. अंतिम सार्वजनिक (बाह्य) परीक्षेवेळी विभागीय परीक्षा पद्धतीचा अवलंब केला जावा.

## ८. शिक्षकवर्ग

शिक्षणाच्या अपेक्षित पुनर्रचनेमध्ये शिक्षक हा अत्यंत महत्त्वपूर्ण असा घटक आहे. तसेच शाळेचा नावलौकिक आणि तिचा समाजजीवनावरील प्रभाव हा प्रामुख्याने तेथे काम करणाऱ्या शिक्षकांच्या प्रकारावर अवलंबून असतो असे आयोगाचे स्पष्ट मत होते. शिक्षकांशी निगडित असणाऱ्या सर्व प्रश्नांचा (उदा. शिक्षकांची भरती, शैक्षणिक पात्रता, सेवाशर्ती, सेवाशक्ती, सेवानिवृत्तीचे वय, शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या सवलती, शिक्षकांचे समाजातील स्थान व शिक्षकांच्या समस्या) बारकाईने अभ्यास करून त्या संदर्भात आयोगाने खालील शिफारशी केल्या आहेत.

१. सर्व प्रकारच्या शाळांमध्ये 'शिक्षक निवड व नेमणूक' यासाठी समान अशी प्रक्रिया असावी.

२. खाजगी संस्था आणि स्थानिक मंडळामार्फत चालविल्या जाणाऱ्या सर्व शाळांमध्ये कर्मचाऱ्यांच्या आणि शिक्षकांच्या नियुक्तीसाठी एक निवड समिती असावी. या समितीवर शिक्षक निवडीचे काम सोपवावे. शाळेचे मुख्याध्यापक हे सदर समितीचे पदसिद्ध सदस्य असावेत.

३. प्रशिक्षित शिक्षकांसाठी परिवीक्षा कालावधी साधारणतः एक वर्षाचा असावा.

४. माध्यमिक शाळांमध्ये काम करणारे शिक्षक हे पदवीधर आणि शिक्षणशास्त्रातील पदवी प्राप्त केलेले असावेत. तांत्रिक विषय शिकविणारे शिक्षक पदवीधर आणि संबंधित विषयात आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केलेले असावेत.

५. उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांनी इंटरमिजिएट कॉलेज स्तरावरील शिक्षकांसाठी जी शैक्षणिक पात्रता निर्धारित केलेली आहे ती प्राप्त केलेली असावी.

६. समान शैक्षणिक पात्रतेचे व समान स्वरूपाचे काम करणाऱ्या शिक्षकांसाठी समान वेतनश्रेणी असावी.

७. शिक्षकांना राहणीमानाचा योग्य दर्जा टिकविता येण्यासाठी वेतनश्रेण्यांच्या शिफारशी करिता एक विशेष समिती स्थापन केली जावी.

८. सर्व राज्यांमध्ये शिक्षकांकरिता विविध लाभ योजना, निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, विमा योजना सुरू केली जावी.

९. शिक्षकांच्या तक्रारी व न्यायालयीन दाद, मागणी यासाठी लवादाची अथवा मध्यस्थी मंडळाची' स्थापना करावी, त्यांनी शिक्षकांच्या सेवामुक्ती, निलंबन या स्वरूपाच्या बाबींचा विचार करावा.

१०. शारीरिकदृष्ट्या सुदृढ आणि सक्षम शिक्षकांना वयाच्या ६० वर्षांपर्यंत काम करण्याची परवानगी द्यावी.

११. शिक्षकांच्या मुलांना शालेय स्तरावरील संपूर्ण शिक्षण मोफत द्यावे.

१२. शाळेच्या जवळ राहता यावे आणि शाळेच्या बहुविध उपक्रमांसाठी जादा वेळ देता यावा यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांमार्फत निवासाची सोय उपलब्ध करून द्यावी.

१३. आरोग्यप्रद ठिकाणे, सुट्टीतील शिबिरे अथवा शैक्षणिक चर्चासत्रे, परिषदा इत्यादी यासाठी उपस्थित राहू इच्छिणाऱ्या शिक्षकांना प्रवास सवलत व रजेची तरतूद उपलब्ध करून द्यावी.

१४. दवाखाने व रुग्णालये यांमध्ये शिक्षकांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून द्यावी.

१५. प्रगत अभ्यासासाठी किंवा उच्च शिक्षणासाठी शिक्षकांना परदेशी जाण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

१६. 'खाजगी शिकवण्या' ची प्रथा बंद केली जावी.

**शिक्षक प्रशिक्षण**

शिक्षक प्रशिक्षणाचे महत्त्व, प्रशिक्षण संस्थांचे प्रकार, प्रशिक्षणाचे प्रकार, प्रशिक्षणासाठी प्रवेश व निवास, प्रशिक्षण महाविद्यालये, शिक्षण शास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम, प्रशिक्षण महाविद्यालयातील शिक्षकवर्ग इत्यादींसंबंधी सखोल अभ्यास करून आयोगाने या संदर्भात खालीलपमाणे शिफारशी केल्या आहेत.

१. शिक्षक प्रशिक्षणासाठी केवळ दोनच प्रकारच्या संस्था असाव्यात.

(१) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्राप्त केलेल्यांसाठी दोन वर्षे कालावधीचे प्रशिक्षण.

(२) पदवीप्राप्त केलेल्यांसाठी एक वर्षे कालावधीचे प्रशिक्षण; परंतु भविष्यामध्ये ते

(३) दोन वर्षाचे केले जावे.

२. पदवीधरांसाठी असणाऱ्या प्रशिक्षण संस्था विद्यापीठांशी संलग्न असाव्यात तर दुय्यम दर्जाच्या प्रशिक्षण संस्था (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र पात्र केलेल्यांसाठी असणाऱ्या) स्वतंत्र मंडळाच्या नियंत्रणाखाली असाव्यात.

३. विद्यार्थी-शिक्षकांना एका किंवा अनेक अभ्यासानुवर्ती उपक्रमांचे प्रशिक्षण प्राप्त हावे.

४. शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयांची उजाळा वर्ग, विशेष विषयांतील अल्पकालीन अभ्यास वर्ग, कार्यशाळांमधील प्रात्यक्षिक प्रशिक्षण यांचे आयोजन करावे.

५. अभ्यासक्रमातील सैद्धांतिक भागावर प्रशिक्षण महाविद्यालयांनी संशोधन हाती घ्यावे.

६. प्रशिक्षण महाविद्यालयात कसलेही शुल्क आकारले जाऊ नये. प्रशिक्षण कालावधीत सर्व शिक्षक-प्रशिक्षणार्थींना राज्य सरकारने योग्य विद्यावेतन द्यावे. सेवेत असणाऱ्या शिक्षकांना त्यांना सेवेत मिळणारे वेतन संपूर्ण प्रशिक्षण कालावधीत दिले जावे.

७. सर्व प्रशिक्षण महाविद्यालयात निवासाच्या पुरेशा सोई उपलब्ध करून दिल्या जाव्यात.

८. शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी किमान तीन वर्षे अध्यापन केलेल्या प्रशिक्षित पदवीधरास प्रवेश द्यावा.

९. स्त्री-शिक्षकांचा तुटवडा दूर करण्यासाठी विशेष अंशकालीन अभ्यासक्रमाची सोय केली जावी.

**९. प्रशासनाच्या समस्या**

आयोगाने माध्यमिक शाळांचे व्यवस्थापन आणि प्रशासन, शाळांच्या मान्यतेच्या अटी, शाळा इमारत वे त्यातील सुविधा, शाळा तपासणी, कामाचे तास व सुट्ट्या, सार्वजनिक सेवेतील भरती इत्यादीसंबंधी महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे -

**(अ) व्यवस्थापन आणि प्रशासन**

१. 'शिक्षण संचालक' हा मंत्र्याना सल्ला देणारा प्रमुख अधिकारी असावा. त्याला कमीत-कमी सहसचिवाचा दर्जा असावा आणि त्याचा मंत्र्याशी थेट संबंध असावा.

२. शिक्षणाचा सर्व स्तरावरील दर्जा उंचावण्यासाठी विचारविनिमय करण्याकरिता केंद्र स्तरावर तसेच प्रत्येक राज्यामध्ये एका समितीचे गठन केले जावे.

३. शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांतील सुधारणा आणि विस्तार यासाठी विविध कार्यक्षेत्रातील विभाग प्रमुखांची एक समन्वय समिती असावी.

४. माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या सर्व बाबींचा विचार करण्यासाठी व त्यासंबंधीचे धोरण ठरविण्यासाठी शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखाली जास्तीत जास्त २५ सदस्य असणारे माध्यमिक शिक्षण मंडळ असावे.

५. मंडळाची एक उपसमिती परीक्षेचे कामकाज पाहील.

६. पदवीपूर्व प्रशिक्षणासाठी आवश्यक अटी ठरविणे, पर्यवेक्षण करणे आणि धोरण ठरविण्यासाठी विद्यापीठांच्या अनुमतीने पदवीधर प्रशिक्षणाच्या सुधारणा सुचविणे याकरिता एक शिक्षक प्रशिक्षण मंडळ असावे.

७. सध्या अस्तित्वात असलेले केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळ हे अखिल भारतीय स्तरावरील शिक्षणाच्या समस्यांसंबंधी विचार करण्याकरिता 'समन्वयक संस्था' म्हणून काम करील आणि याच धर्तीवर राज्य

स्तरावर शिक्षण विभागाला सल्ला देण्याकरिता प्रत्येक राज्यात एक सल्लागार मंडळ स्थापन करावे.

**(ब) शाळांची तपासणी**

१. प्रत्येक शाळेच्या समस्यांचा अभ्यास करणे आणि शैक्षणिक उद्दिष्टांच्या संदर्भात त्यांचा सर्वसमावेशक विचार करून सुधारणेसाठी सूचना करणे ही निरीक्षकाची प्रमुख भूमिका असावी.

२. गृहविज्ञान, कला, संगीत इत्यादी विशेष विषयांच्या अध्यापनाचे निरीक्षण करण्याकरिता विशेष निरीक्षक अथवा निरीक्षकांचा गट नियुक्त करावा.

३. निरीक्षकपदी निवड केलेली व्यक्ती उच्च शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त, पुरेसा अध्यापन अनुभव असलेली किंवा माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक म्हणून विहित कालावधीचा अनुभव प्राप्त केलेली असावी. निरीक्षकांच्या प्रत्यक्ष भरतीव्यतिरिक्त पुढील क्षेत्रातील व्यक्तींना तीन ते पाच वर्षांसाठी निरीक्षकाचे काम करण्यास अनुमती द्यावी.

   (१) दहा वर्षांचा अनुभवप्राप्त शिक्षक

   (२) माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक

   (३) प्रशिक्षण महाविद्यालयातील शिक्षकवर्ग.

४. निरीक्षकांना प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडण्यास मदत करण्यासाठी सक्षम सेवकवर्ग असावा.

५. शाळेच्या शैक्षणिक कामकाजाचे निरीक्षण करण्याकरिता निरीक्षकाच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांचा एक गट असावा.

६. शाळा तपासणी करण्यासाठी तसेच दोन-तीन दिवस संबंधित शाळेच्या सेवक वर्गासमवेत राहून शालेय जीवन आणि समस्यांसंदर्भात सर्व बाबी जाणून शाळेच्या संबधित अधिकारीवर्गांशी चर्चा करण्याकरिता तीन वरिष्ठ शिक्षक किंवा मुख्याध्यापकांची शाळा भेटीसाठी निवड करावी.

**(क) व्यवस्थापन आणि शाळा मान्यतेच्या अटी**

१. योग्य दर्जा टिकविणे आणि योग्य पद्धतीने शाळा सुरू राहण्याची हमी देण्याच्या सुस्पष्ट अटींवरच शाळांना मान्यता द्यावी. .

२. सर्व शाळांचे व्यवस्थापकीय मंडळ नोंदणीकृत असावे. शाळांचे मुख्याध्यापक सदर मंडळाचा पदसिद्ध सभासद असेल.

३. शाळेच्या अंतर्गत प्रशासनामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणीही व्यवस्थापन मंडळाचा सभासद हस्तक्षेप करणार नाही.

४. प्रत्येक व्यवस्थापनाने सेवा शर्ती निश्चित करून त्याअंतर्गत वेतन, रजा इत्यादींबाबत नियम ठरवावेत.

५. प्रत्येक व्यवस्थापनाने योग्य रीतीने शाळा चालविण्यासाठी दरवर्षी निधी उपलब्ध करावा. दरवर्षी आर्थिक हिशेब दाखवावा.

६. शाळेच्या व्यवस्थापनाने शिक्षण शुल्क निश्चित करताना शिक्षण विभागाची पूर्व परवानगी घ्यावी.

७. शैक्षणिक शुल्क, इतर शुल्क, शाळेचा आर्थिक हिशेब आणि लेखापरीक्षण यामध्ये एकवाक्यता आणण्याकरिता शिक्षण विभागाने गरजेनुसार एक समिती नियुक्त करावी.

८. शिक्षण विभागाने घालून दिलेल्या अटीनुसार संलग्नतेसाठी अर्हताप्राप्त सेवकवर्ग आस्थापनाने नियुक्त करावा.

९. शाळेचे कामकाज सुरळीत व कार्यक्षमरित्या चालण्यासाठी आवश्यक इमारत, शैक्षणिक साधने इत्यादींबाबत व्यवस्थापनाने विभागाचे समाधान होईल असे पाहावे.

१०. प्रत्येक वर्गातील विद्यार्थी संख्या मर्यादित असावी. संख्या वाढविताना पूर्वपरवानगी घ्यावी.

११. शेजारील शाळांशी घातक स्पर्धा टाळण्यासाठी आणि शाळेच्या योग्य प्रगतीसाठी नियम निश्चित करावेत.

१२. शिक्षकवर्ग हा कोणत्याही विशिष्ट जातीमधील अथवा वर्गामधील नियुक्त न करता त्यासाठी व्यापक धोरणाचा अवलंब करावा.

१३. विविधतापूर्ण अभ्यासक्रमाचे महत्त्व आणि गरज लक्षात घेऊन जुन्या तसेच नव्या शाळांनाही आर्थिक साहाय्य व प्रोत्साहन द्यावे.

१४. व्यवस्थापनाने शाळा सुरू करण्यापूर्वी शिक्षण संचालकांची पूर्वपरवानगी घ्यावी. आणि संचालकांनी प्राथमिक अटींची पूर्तता केल्याशिवाय परवानगी देऊ नये.

**(उ) शालेय इमारत व साधने**

१. ग्रामीण भागात मध्यवर्ती ठिकाणी माध्यमिक शाळा स्थापन कराव्यात की जेणेकरून आसपासच्या खेड्यांतील मुलांना शाळेत येणे जाणे सहज सोपे जाईल.

२. शहरी भागातील शाळा गर्दी, गोंगाटापासून दूर असाव्यात मात्र तेथे येण्याजाण्यासाठी आवश्यक दळणवळण सुविधा उपलब्ध असाव्यात.

३. शहरातील मोकळ्या जागा' शाळांनी क्रीडांगण म्हणून वापराव्यात. केंद्र व राज्य शासनाने कायद्याने या जागेवर होणारे औद्योगिक, व्यापारी, गृहनिर्माण संस्थांचे अतिक्रमण थांबवावे.

४. शाळेसाठी इमारतीची आखणी करताना प्रत्येक विद्यार्थ्याला वर्गात १० चौ. फूट जागा उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी.

५. प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्या सामान्यत: ३० इतकी असवी आणि जास्तीत जास्त ४० पेक्षा अधिक असू नये. शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या सामान्यतः ५०० असावी आणि जास्तीत जास्त ती ७५० असावी.

६. शाळेसाठी भविष्यात बांधल्या जाणाऱ्या इमारतीत विविधतापूर्ण अभ्यासक्रमाची सोय उपलब्ध व्हावी.

७. शालेय इमारत, बैठक व्यवस्था इत्यादी बाबतीत सुधारणेच्या दृष्टीने संशोधन व्हावे.

८. विविधतापूर्ण अभ्यासक्रम आणि कार्यशाळा यासाठी आवश्यक खर्च आणि साधनसुविधा यांचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नियुक्ती केली जावी

९. विद्यार्थ्यांना पुस्तके, वह्या आणि इतर साहित्य खरेदी करता येण्यासाठी शाळेत 'सहकारी भांडार' स्थापन केले जावे.

१०. शिक्षकी पेशाकडे योग्य लोकांना आकर्षित करण्यासाठी आणि शालेय सहजीवन विकसित करण्यासाठी ग्रामीण तसेच शहरी भागात शक्यतो शिक्षकांना निवास व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.

## (इ) कामाचे तास आणि सुट्ट्या

१. स्थानिक वातावरण, व्यवसाय आणि सामाजिक गरजा विचारात घेऊन शाळेची वेळ ठरविण्याची मुभा शाळांना असावी.

२. प्रत्येक शाळेचे कामकाज आठवड्यातून सहा दिवस नियमित चालावे. त्यातील एका दिवशी शालेय कामकाज अर्धा दिवस असावे, यात शिक्षक व विद्यार्थी यांनी मिळून अभ्यासेत्तर उपक्रम आणि सामाजिक प्रकल्प यासंबंधी चर्चा करावी.

३. नियमाप्रमाणे शाळेचे वर्षभरातील एकूण कामकाजाचे दिवस किमान २०० शिक्षकाला प्रत्येक आठवड्यात ४५ मिनिटांच्या ३५ तासिकांचे काम असावे.

४. शासनाने घोषित केलेल्या सार्वजनिक सुट्ट्यांशी तंतोतंत जुळणाऱ्या शाळाच्या सुट्ट्या असू नयेत. साधारणत: एका वर्षात दोन महिन्याची उन्हाळी सुट्टी आणि १० ते १५ दिवसांचे दोन खंड सुट्टी असावी.

## (ई) सार्वजनिक सेवा भरती

१. सार्वजनिक सेवेतील निवड करताना निश्चित वयाची अट असावी. उदा. १६ ते १८, १९ ते २१, २२ ते २४.

२. संक्रमण काळात ५० टक्के जागांसाठी वयावर आधारित भरतीची ही पद्धती वापरली जावी आणि उर्वरित ५० टक्के जागा सध्याच्या पद्धतीनुसार भरल्या जाव्यात. हे प्रमाण क्रमश: कमी - कमी व्हावे.

३. सध्याच्या सार्वजनिक सेवेतील भरतीच्या अटींचा काळजीपूर्वक अभ्यास व्हावा. विशेषत: विद्यापीठ पदवी व सार्वजनिक सेवा यांच्यातील संबंधाचा अभ्यास केला जावा. तसेच पदवी पात्रतेची अट ही फक्त उच्च शैक्षणिक आवश्यकता असणाऱ्या पदांसाठीच असावी. सार्वजनिक सेवा भरती पद्धतीचा समग्र अभ्यास करण्यासाठी एक समिती नियुक्ती केली जावी. जेणेकरून शिक्षकांच्या विविध स्तरांवरील भरतीमध्ये गुणवत्ता व योग्यता टिकविता येईल.

**(फ) वित्त व्यवस्था**

१. माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना आणि सुधारणा या संदर्भात केंद्र व राज्य सरकारांमध्ये सहकार्यावर आधारित जवळचे संबंध असावेत.

२. व्यावसायिक शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी केंद्र स्तरावर 'व्यावसायिक शिक्षण मंडळ' स्थापन केले जावे. त्यात संबंधित खात्याच्या मंत्र्याचा समावेश असावा.

३. 'औद्योगिक शिक्षण कर' स्वरूपात कर वसूल करून निधी उभारावा आणि माध्यमिक स्तरावरील तांत्रिक आणि औद्योगिक शिक्षणाच्या मदतीसाठी हा निधी वापरावा.

४. राष्ट्रीयीकृत उद्योगधंदे किंवा रेल्वे, दळणवळण, पोस्ट व टेलिफोन इत्यादींसारख्या संबंधित क्षेत्रातून जमा होणाऱ्या महसुलातून ठरावीक हिस्सा तंत्रशिक्षणाच्या विकासासाठी उपलब्ध करून द्यावा.

५. आयकर कायद्यातून माध्यमिक शिक्षणाच्या विकासासाठी दिलेल्या देणग्यांना सवलत मिळावी.

६. धार्मिक व धर्मादाय देणग्यांची पडून असणारी रक्कम शैक्षणिक हेतूंसाठी खर्च करावी.

७. मृत व्यक्तीने आपल्या मृत्युपत्रात सार्वजनिक संस्थांना घोषित केलेल्या संपत्तीवर केंद्र शासनाने कोणताही कर न आकारता ती संपूर्ण संपत्ती शैक्षणिक हेतूंसाठी वापरण्याची परवानगी द्यावी.

८. सर्व शैक्षणिक संस्थांची जमीन व त्यांच्या मालकीची क्रीडांगणे ही मिळकत करातून वगळावीत.

९. राज्य व केंद्र शासनाने शाळांना शक्य तेथे क्रीडांगणासाठी, इमारतीसाठी, शेतीसाठी आणि इतर आवश्यक हेतूंसाठी मोफत जमीन उपलब्ध करून द्यावी.

१०. शिक्षणसंस्थांना आवश्यक शास्त्रीय उपकरणे, कार्यशाळा उपकरणे आणि शालेय ग्रंथालयासाठी आवश्यक पुस्तके विक्रीकरातून वगळावे.

११. माध्यमिक शिक्षणाच्या सध्याच्या पुनर्रचनेसाठी केंद्राने प्रत्यक्ष जबाबदारी म्हणून काही निधी निश्चित करून त्यासाठी अर्थसाहाय्य उपलब्ध करून द्यावे.

**२.२.३ आयोगाचे मूल्यांकन**

शिक्षणाच्या इतिहासात माध्यमिक शिक्षणाचा सर्वांगीण विचार करून मौलिक शिफारशी करणारा हा पहिलाच आयोग आहे. या आयोगाने माध्यमिक शिक्षणाच्या सर्व बाबींचा सखोल विचार करून त्यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने उपयुक्त आणि व्यवहार्य अशा सूचना व शिफारशी केल्या आहेत. भारताच्या शैक्षणिक इतिहासात माध्यमिक शिक्षण आयोगाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

**आयोगाच्या शिफारशी व गुण :**

आयोगाने माध्यमिक शिक्षणाच्या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करून त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण अशा शिफारशी केल्या. अनेक तज्ज्ञांनी शिफारशींचे मुक्तपणे कौतुकही केले. काही शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात अनुकूल परिवर्तनही घडले.

१. आयोगाने तत्कालीन माध्यमिक शिक्षणातील दोष नजरेस आणून देण्याची महत्वपूर्ण कामगिरी केली.

२. तत्कालीन परीक्षा पद्धतीमधील दोष दाखवून परीक्षा पद्धतीत संपूर्ण सुधारणा करण्यासाठी व्यवहार्य सूचना केल्या.

३. शिक्षकांची स्थिती सुधारण्यासाठी शिफारशी केल्या.

४. अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

५. शालेय इमारत व निरीक्षकाची कर्तव्ये स्पष्ट केली.

६. बदलत्या सामाजिक वातावरणात माध्यमिक शिक्षणाच्या उद्दिष्टांचा पुनर्विचार केला.

७. विद्यार्थ्यांच्या क्षमता व अभिरुची यांना योग्य ठरेल असा विविधतापूर्ण अभ्यासक्रम, बहुउद्देशीय शाळांची स्थापना, शेती शिक्षणाची सोय, शाळांमधून मार्गदर्शन व समुपदेशनाची व्यवस्था, शिक्षकांचा दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना, नवी परीक्षा पद्धती, संकलित अभिलेख, अंतर्गत गुणदान, अभ्यासानुवर्ती कार्यक्रम यासंबंधी महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

८. आयोगाने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे 'अखिल भारतीय माध्यमिक शिक्षण मंडळ' तसेच प्रत्येक राज्यात 'माध्यमिक शिक्षण मंडळाची' स्थापना झाली.

९. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात विज्ञान व गणित विषयांच्या अभ्यासक्रमात बरीच सुधारणा झाली.

१०. देशात 'आंग्लभाषा संस्था' आणि 'व्यावसायिक मार्गदर्शन मंडळे' यांची स्थापना झाली.

आयोगाच्या या शिफारशींचा परिणाम नंतरच्या काळातील माध्यमिक शिक्षणाचा दर्जा वाढण्यावर झाला.

**आयोगाच्या शिफारशीसंबंधीच्या उणीवा अथवा दोष**

माध्यमिक शिक्षण आयोगाच्या शिफारशींसंबंधी अनेकांनी उणीवा नजरेस आणून दिल्या आहेत. तसेच आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळे निर्माण होणाऱ्या समस्याही निर्देशित केल्या आहेत.

आयोगाच्या शिफारशीसंबंधीच्या उणीवा अथवा दोष खालीलप्रमाणे

१. माध्यमिक शिक्षण आयोगाने केलेल्या शिफारशी अमलात आणण्यासाठी अल्प व दीर्घ मुदतीच्या योजना सुचविलेल्या नाहीत.

२. आयोगाच्या शिफारशी अंमलात आणण्याच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या आर्थिक बाजूचा फार सखोल विचार केलेला नाही.

३. शेती शिक्षणासंबंधी आयोगाने महत्वपूर्ण शिफारस केली आहे. परंतु या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी निश्चित उपाययोजना सुचविलेली नाही.

४. आयोगाने शालेय शिक्षणाचा एकूण कालावधी किती राहील हे स्पष्ट शब्दांत निसंदिग्धपणे सांगितले नाही. त्यामुळे त्याबाबत गोंधळाची स्थिती निर्माण होऊ शकते.

५. माध्यमिक शाळांचे उच्च माध्यमिक शाळांमध्ये रूपांतर करणे आणि इंटरमिजिएट कॉलेज स्तरावरील वर्ग बंद करणे ही शिफारस काही राज्यांना योग्य न वाटल्याने त्यांनी ती कार्यवाहीत आणली नाही.

६. माध्यमिक शिक्षणातील शेवटच्या दोन वर्षांना शिकविण्यासाठी अध्यापकांची जी शैक्षणिक पात्रता सुचविण्यात आली आहे. (एम. ए. पदवी अगर बी. ए. साठी प्रथम वर्ग) ती धारण करणाऱ्या शिक्षकांची संख्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही.

७. हस्तकला व विज्ञान या मूलभूत विषयांसाठी शिक्षक मिळविण्यात शाळांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले.

८. बहुउद्देशीय शाळांची स्थापना ही आयोगाची महत्त्वपूर्ण शिफारस होती. परंतु बहुउद्देशीय शाळांची वाढ म्हणावी तितक्या वेगाने झाली नाही. त्यामुळे माध्यमिक शाळांचे स्वरूप पूर्वीप्रमाणे साचेबंद व पुस्तकी राहिले.

९. शिक्षणाचे पुरेशा प्रमाणात व्यावसायिकीकरण करण्यासंबंधी आयोगात सुस्पष्ट मार्ग सांगितलेला नाही.

१०. अर्थव्यवस्थेतील सुधारणा, मनुष्यबळाच्या गरजा, नोकरीच्या संधी आणि माध्यमिक शाळांतून बाहेर पडणारे विद्यार्थी यांच्यात समन्वय साधण्याची कोणतीही पद्धती आयोगाने सुचविलेली नाही.

११. आयोगाने स्त्रियांचे शिक्षण तसेच धार्मिक शिक्षणाबाबत पुरेसा विचार केलेला नाही.

१२. माध्यमिक स्तरावर तीन भाषा, गाभाभूत विषय आणि तीन इतर विषयांचा अभ्यास विद्यार्थ्यांच्या दृष्टीने जड ठरणारा आहे.

माध्यमिक शिक्षणाचा विकास साधण्याच्या दृष्टीने आयोगाच्या दोषांकडे अथवा उणिवांकडे दुर्लक्ष करता एकंदरीत हा अहवाल महत्त्वपूर्ण असा होता. स्वातंत्र्योत्तर काळात माध्यमिक शिक्षणात जी प्रगती झाली आहे त्याचे बरेचसे श्रेय माध्यमिक शिक्षण आयोगाचे आहे. माध्यमिक शिक्षणात या आयोगामुळे नवचैतन्य निर्माण झाले.

### २.२.४. स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१. आपल्या देशातील माध्यमिक शिक्षणात सुधारणा घडविण्यासाठी आयोगाने केलेल्या प्रमुख शिफारसींची चर्चा करा.

२. माध्यमिक शिक्षण आयोगाने माध्यमिक शिक्षणाची सांगितलेली उद्दिष्टे कोणती? ही उद्दिष्टे आपणास कितपत योग्य वाटतात? ते सकारण स्पष्ट करा.

३. परीक्षा पद्धतीमधील कोणते दोष आयोगाने निदर्शनास आणले आहेत? हे दोष दूर करून परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी आयोगाने कोणत्या शिफारशी केलेल्या आहेत ?

४. 'माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना' यासंबंधी आयोगाने कोणत्या शिफारशी केल्या आहेत?

५. माध्यमिक शिक्षण आयोगाने' सुचविलेल्या माध्यमिक शिक्षणाच्या आकृतिबंधाची चर्चा करा.

६. 'माध्यमिक शिक्षण आयोगाने' माध्यमिक स्तरासाठी सुचवलेला अभ्यासक्रम आराखडा देऊन या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये विशद करा.

७. माध्यमिक शिक्षण आयोगाने प्रशासनांतर्गत विविध घटकाबाबत कोणत्या शिफारशी केल्या आहेत ?

८. माध्यमिक शिक्षण आयोगाच्या शिफारशींच्या गुणदोषांची चर्चा करा.

## २.२.५. संदर्भ सूची


१. कुंडले म. बा. ( १९९०), शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.

२. सौ. गद्रे नीता व गद्रे ल. रा., (१९७७), शिक्षणाचा इतिहास भाग – १, २, ३. पुणे, व्हीनस प्रकाशन

३. डॉ. जाधव, भोसले, सरपोतदार (२०१०), भारतीय शिक्षणाचा विकास, कोल्हापूर, फडके प्रकाशन.

४. आहेर हिरा (१९९५), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, नागपूर, विद्या प्रकाशन.

५. पवार ना. ग. (१९९१), भारतीय शिक्षणातील आधुनिक विचार प्रवाह, पुणे, नूतन प्रकाशन.

६. पारसनीस न. रा., (१९९४), स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण, पुणे, नूतन प्रकाशन.

७. वास्कर आनंद, वास्कर पुष्पा, (१९९८), भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण, पुणे, नूतन प्रकाशन.

८. शेखर गणेश, शेवतेकर शारदा, जोशी शोभाणा, (२००२), भारतीय शिक्षणाचा इतिहास, औरंगाबाद, मृण्मयी प्रकाशन.


❖❖❖

## घटक – ३

# कोठारी आयोग १९६४–६६

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ आयोगाची रचना
- ३.२.२ आयोगाची कार्यकक्षा
- ३.२.३ राष्ट्रीय उद्दिष्टे
- ३.२.४ शैक्षणिक रचना
- ३.२.५ शालेय अभ्यासक्रम
- ३.२.६ विद्यार्थी शिष्यवृत्ती
- ३.२.७ स्त्री शिक्षण
- ३.२.८ शालेय व्यवस्थापन आणि पर्यवेक्षण

३.३ पारिभाषिक शब्द

३.४ सारांश

३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न–उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

### ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर

१) तत्कालीन राष्ट्रीय उद्दिष्टे सांगता येतील.

२) शैक्षणिक रचना स्पष्ट करता येईल.

३)  शालेय अभ्यासक्रमाचे स्वरुप विशद करता येईल.

४)  विद्यार्थ्यांसाठी सूचविलेल्या शिष्यवृत्ती सांगता येतील.

५)  स्त्री शिक्षणविषयक तरतूदी व शिफारशीचे वर्णन करता येईल.

६)  शालेय व्यवस्थापन आणि पर्यवेक्षण विषयक शिफारशीचे स्वरूप स्पष्ट करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

कोणत्याही राष्ट्राच्या विकासात त्या राष्ट्रातील शिक्षणाची भूमिका ही अतिशय मूलभूत व महत्त्वाची अशी असते. यामुळेच त्या त्या काळातील स्थानिक व राष्ट्रीय गरजांचे प्रतिबिंब हे त्या राष्ट्राच्या शिक्षणपद्धती व तिची रचना यासाठी शिक्षणविषयक आयोगाच्या स्थापनेची गरज जाणवली. त्यातूनच भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुलकलाम आझाद यांनी देशभरासाठी समान शैक्षणिक पध्दत आखून त्यावर केंद्र शासनाचे नियंत्रण आणले. भारतीय शिक्षणात आधुनिकता आणण्यासाठी विद्यापीठ शिक्षण आयोग (डॉ. राधाकृष्णन आयोग), माध्यमिक शिक्षण आयोग (मुदलियार आयोग) नेमला गेला.

शिक्षणाच्या सर्व स्तरांचा साकल्पाने विचार करण्यासाठी एक आयोग नेमणे आवश्यक आहे. हे हळूहळू केंद्र सरकारला जाणवले. त्यातूनच १९६४ साली डॉ. डी. एस. कोठारी, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय शिक्षण आयोग नेमला. हाच भारतीय शिक्षण आयोग हा कोठारी आयोग म्हणूनही ओळखला जातो.

## ३.२ विषय विवेचन :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात शिक्षणाच्या विशिष्ट स्तराचा विचार करणारे विद्यापीठ शिक्षण आयोग, माध्यमिक शिक्षण आयोग स्थापन करण्यात आले. मात्र देशातील सर्व शिक्षण क्षेत्रातील, सर्व स्तरांचा व सर्व बाबींचा विचार करण्याच्या उद्देशाने भारतीय शिक्षण आयोगाची स्थापना झाली. शिक्षणाच्या सर्व स्तरांमध्ये व पैलूंमध्ये विकास करण्यासाठी सर्वसामान्य तत्व धोरणे याबाबत भारतीय सरकारला सल्ला देणे. हे या आयोगाकडे सोपविलेले प्रमुख कार्य होते. त्यादृष्टीने भारतात शैक्षणिक क्रांती घडविण्यासाठी आयोगाने अंतर्गत परिवर्तन, गुणात्मक बदल आणि शैक्षणिक सुविधांचा विस्तार या तीन गोष्टींवर भर दिला.

### ३.२.१  आयोगाची रचना :

संपूर्ण शिक्षणाचा समग्रपणे विचार करण्यासाठी भारत सरकारने १४ जुलै १९६४ रोजी प्रसिध्द शिक्षणतज्ञ व तत्कालीन विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष डॉ. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची नियुक्ती केली. या आयोगात अध्यक्ष, सचिव व सहसचिव आणि १४ सदस्यांचा समावेश होता. यामध्ये ब्रिटन, जपान, फ्रान्स, रशिया व अमेरिका या देशातील विशेषज्ज्ञांचा तसेच युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचा समावेश होता. या आयोगाचे सचिव म्हणून डॉ. जे. पी. नाईक यांनी काम पाहिले.

### ३.२.२ आयोगाची कार्यकक्षा

या आयोगाची कार्यकक्षा ही अत्यंत व्यापक स्वरुपाची होती. देशापुढील शैक्षणिक समस्यांचा उहापोह करण्यासाठी एकत्रित विचार करण्याची जबाबदारी, या आयोगाकडे सोपवण्यात आली. शिक्षणाचे क्षेत्र व्यापक असल्याने त्याचे सर्वंकष अध्ययन करण्यासाठी आयोगाकडून बारा अभ्यास गट (Task Forces) आणि सात कार्यगट (Working Groups) तयार करण्यात आले. आयोगाकडून तयार करण्यात आलेले अभ्यासगट पुढीलप्रमाणे १) शालेय शिक्षण २) उच्च शिक्षण ३) तंत्र शिक्षण ४) कृषी शिक्षण ५) प्रौढ शिक्षण ६) विज्ञान शिक्षण व संशोधन ७) शिक्षक प्रशिक्षण व शिक्षक दर्जा ८) नवीन तंत्रे व पद्धती ९) विद्यार्थी कल्याण १०) मनुष्यबळ ११) शैक्षणिक प्रशासन १२) शैक्षणिक अर्थव्यवस्था

**आयोगाद्वार स्थापित सात कार्यगट पुढीलप्रमाणे**

१) महिलांचे शिक्षण २) मागासवर्गीयांचे शिक्षण ३) शाळा व इमारती ४) शाळासमूह संबंध ५) पूर्व-माध्यमिक शिक्षण ६) सांख्यिकी ७) शालेय अभ्यासक्रम

सदर आयोगाने या अभ्यासगट व कार्यगटाच्या मदतीने शिक्षणक्षेत्राचा व्यापक व सर्वंकष अभ्यास केला. यासाठी जवळपास सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश यांच्या शंभर दिवसांचा दौरा केला. शिक्षणाशी संबंधित अनेक प्रकारच्या व्यक्तीच्या मुलाखती, मते घेण्यात आली. अनेक राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावरच्या लोकांचे सहकार्य घेतले. आयोगाने शिक्षणविषयक अनेक प्रश्नांचा सखोल अभ्यास करून आपला अहवाल २९ जून १९६६ रोजी तत्कालीन भारतीय शिक्षणमंत्री श्री. एम. सी. छागला यांच्याकडे सुपूर्त केला. हा अहवाल एकूण तीन विभाग व परिशिष्ट यामध्ये विभागलेला असल्याचे दिसते.

- **विभाग पहिला :** सामान्य समस्या
- **विभाग दुसरा :** विविध स्तरावरील व विविध क्षेत्रातील शिक्षण
- **विभाग तिसरा :** अंमलबजावणी

**परिशिष्ट**

या चार विभागांनी मिळून तयार झालेला अहवाल हा भारतीय शिक्षणाच्या दृष्टिने एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक दस्तावेज आहे. या अहवालाची सुरूवात 'भारताचे भवितव्य हे वर्गखोल्यातून घडत आहे.' (The destiny of India is being shaped in the classrooms)

### ३.२.३ राष्ट्रीय उद्दिष्टे

आयोगाने भविष्यकालीन भारताचे सुनिश्चित असे एक चित्र मांडले आहे. भविष्यकालीन भारतीय समाज वैज्ञानिक व अध्यात्मिक मूल्यांवर आधारित असेल. विज्ञानाचा उत्पादकतेशी असलेला संबंध व विज्ञानामुळे मानवाच्या चौकस स्वतंत्र बुध्दीला मिळणारी चालना लक्षात घेता वैज्ञानिक दृष्टिकोनावर भर असणे आवश्यक आहे.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. शिक्षण व्यक्तिच्या जीवनात आमूलाग्र बदल

घडवून आणू शकते. त्यामुळेच शिक्षणाद्वारे उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. लोकशाही ही एक जीवनपद्धती म्हणून स्विकारण्यास शिक्षणाने मदत केली पाहिजे. याबरोबरच शिक्षणातून सामाजिक, नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचा परिपोष करून चारित्र्यसंवर्धन झाले पाहिजे. अशा उद्दिष्टात्मक पार्श्वभूमीतून काही राष्ट्रीय उद्दिष्टे निश्चित केली गेली होती.

**राष्ट्रीय उद्दिष्टे :**

१) अन्नधान्याच्या क्षेत्रात आत्मनिर्भरता आणणे.

२) आर्थिक विकास व रोजगाराची सुविधा प्राप्त करणे.

३) सामाजिक व राष्ट्रीय एकता.

४) राजनैतिक विकास साधणे.

५) आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून देशाचा मागासलेपणा घालवण्यासाठी.

ही उद्दिष्टे साधण्यासाठी कोठारी आयोगाने पंचतत्त्व सुचविलली आहेत.

१) शिक्षण आणि उत्पादकता

२) सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता

३) शिक्षण आणि आधुनिकता

४) सामाजिक नैतिक अध्यात्मिक मूल्ये

५) धर्मासंबंधीचे शिक्षण

### ३.२.४ शैक्षणिक रचना :

पूर्व प्राथमिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण या विविध स्तरांबाबत वा विशिष्ट टप्प्याबांबत शैक्षणिक रचनेमध्ये मांडणी केलेली असते. या क्रमबद्ध शिक्षणाच्या मांडणीलाच शिक्षणाचा आकृतीबंध ही म्हंटले जाते.

शिक्षणाचा हा आकृतीबंध किंवा संरचना ही केवळ शिक्षणाच्या विशिष्ट टप्प्याचा कालावधी सांगणारी किंवा वर्गीकरण करणारी प्रणाली नसते. शैक्षणिक रचनेला शैक्षणिक सिद्धांतांचे अधिष्ठान असते. प्रत्येक स्तरावरील शिक्षण व्यक्तीच्या विकासाच्या अवस्थांशी संबंधित असणे खूप गरजेचे आहे. शिक्षणाच्या विशिष्ट रचनेमुळे प्रत्येक स्तरावरील शिक्षणाची मांडणी हे त्या त्या वयाच्या गरजा, क्षमता याला अनुसरून करता येते. विद्यार्थ्यांच्या विकासाच्या अवस्थेच्या वैशिष्ट्यांना अनुसरून प्रत्येक स्तरावरील अभ्यासक्रमाची व अध्ययन अनुभवाची रचना करण्यात शैक्षणिक आकृतिबंध मार्गदर्शन करतो. याशिवाय राष्ट्रीय गरजा, राष्ट्रीय उद्दिष्टे यांची सांगड प्रत्येक स्तरावरील शिक्षणाशी घालणे अधिक सोयीस्कर ठरते.

शिक्षण रचनेबाबतची ही सैंद्धातिक पार्श्वभूमी लक्षात घेता कोठारी आयोगाने शिक्षणाच्या रचनेबाबत केलेल्या शिफारशी समजावून घ्याव्या लागतील. शिक्षणाचा विस्तार व सर्व स्तरांवरील शैक्षणिक गुणवत्ता

वाढवणे म्हणजेच पर्यायाने राष्ट्रांचा विकास करणे हे कोठारी आयोगाच्या कार्यपध्दतीचे प्रमुख सूत्र होते.

विविध राज्यांमध्ये विविध प्रकारचा शैक्षणिक आकृतीबंध आहे असे आयोगाच्या लक्षात आले. यासाठीच आयोगाने शैक्षणिक आकृतिबंधाची पुर्नमांडणी करण्याचे ठरविले. सर्व देशभर एकसमान असा आकृतीबंध सुचविला. या आयोगाने १० + २+ ३ हा शैक्षणिक आकृतिबंध मान्य केला.

या संरचनेचे स्वरूप पुढील प्रमाणे होते.

१) १० वर्षाचे सामान्य शिक्षण (शालेय शिक्षण)

अ) निम्न प्राथमिक शिक्षण

ब) उच्च प्राथमिक शिक्षण

क) माध्यमिक शिक्षण

२) १० वर्षाचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षाचे उच्च माध्यमिक शिक्षणाची तरतूद होती. या शिक्षणाला पदवीपूर्व अभ्यासक्रमही म्हंटले जाते.

३) विद्यापीठाच्या पदवीसाठीचा (प्रथम) कालावधी ३ वर्षाचा निश्चित केला.

शिक्षणाच्या १० + २ + ३ या संरचनेत हे स्वरूप निश्चित करताना काही मार्गदर्शक सूचनाही आयोगाने केल्या होत्या. त्यामधील काही प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे.

१) सामान्य शिक्षणाच्या प्रारंभीपूर्वी १ ते ३ वर्षाचे पूर्व प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

२) इयत्ता पहिलीमध्ये दाखल होताना मुलाचे वय सामान्यतः ६ पेक्षा कमी असू नये.

३) इयत्ता १० वी पूर्वी विशिष्टतेचे शिक्षण दिले जावू नये.

४) विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयाकडील पदवीपूर्व वर्ग १९७५-७६ पर्यंत माध्यमिक शाळांकडे सोपविण्यात यावेत.

५) पदवीपूर्व अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षाचा करण्याची प्रक्रिया १९८५ ते ८९ पर्यंत पूर्व व्हावी. राज्य सरकारांनी काही निवडक शाळामधून उच्च माध्यमिक शिक्षणाचे वर्ग सुरू करावेत.

६) उच्च माध्यमिक शिक्षण हा स्वयंपूर्ण व स्वतंत्र विभाग म्हणून निर्माण केला जावा.

### ▶ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

रिकाम्या जागा भरा.

१) कोठारी आयोगाचे सचिव ----- हे होते.

अ) श्री. एम. सी. छागळा  ब) डॉ. जे. पी. नाईक

क) जे. एफ. मॅग्डुगल  ड) डॉ. बी. पी पाल.

२) राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोठारी आयोगात------ सुचविली.

अ) पंचतत्त्वे  ब) सप्तपदी  क) दशसूत्र  ड) अष्टांग मार्ग

३) प्रत्येक स्तरावरील शिक्षण व्यक्तीच्या -------- संबंधित असते.

अ) सामाजिक स्तराशी  ब) आर्थिक क्षमतेची

क) विकासाच्या अवस्थांशी  ड) उपलब्ध वेळेशी

### ३.२.५ शालेय अभ्यासक्रम :

शिक्षणातील ध्येय धोरणे प्रत्यक्षात आणण्याचे साधन म्हणजे अभ्यासक्रम होय. प्रत्येक वर्गात काय शिकायचे, कशासाठी शिकायचे याचे नियोजन केलेले असते. या संघटित नियोजनाला किंवा विषयाच्या ज्ञानाला नियोजनपूर्वक दिलेले स्वरूप म्हणजे अभ्यासक्रम होय. अभ्यासक्रम केवळ नियोजनाचा विशिष्ट आराखडा नव्हे किंवा विशिष्ट असे नियमही नव्हेत. आर्थिक व सामाजिक रचनेनुसार विद्यार्थ्यांच्या बदलणाऱ्या गरजा भागविणारी गतिमान व कृतीशील अशी ती बाब आहे. विद्यार्थी, ज्ञानसंपन्न, कृतिशील, समाजनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ बनविणारा समाजभिमुख व जीवनाभिमुख अभ्यासक्रम असला पाहिजे. केवळ पुस्तकी व शब्दनिष्ठ किंवा आश्रयकेंद्री अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना जीवनानुभव देण्यास असमर्थ असतो.

अभ्यासक्रमाच्या या सैद्धांतिक पार्श्वभूमीवर त्याकाळातील अभ्यासक्रमामधील दोषांच्या निवारणार्थ पुढील शिफारशी आयोगाने सुचविल्या -

१) अभ्यासक्रमात पुरेशी विविधता असावी तो ताठर नसावा ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या रूची आणि गरजा पूर्ण होऊ शकतील.

२) स्थानिक गरजा व परिस्थितीनुरूप अभ्यासक्रमाची निर्मिती किंवा रचना असावी

३) अभ्यासक्रमाचा सामाजिक जीवनाशी घनिष्ठ संबंध असावा आणि विद्यार्थ्यांना त्या जीवनातील महत्त्वपूर्ण क्रियांच्या संपर्कात आणले गेले पाहिजे.

४) अभ्यासक्रमातील विषयांचा एकमेकांशी व जीवनाशी प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे.

या शिफारशीच्या आधारे विविध स्तरावरील अभ्यासक्रम रचना व त्यातील अध्ययन अनुभव तसेच त्यासंबंधी असणारे विषय याचे विवेचन पुढे दिले आहे.

१) पूर्व प्राथमिक स्तरावरचा अभ्यासक्रम हा उपक्रमांच्या स्वरूपाचा असावा. त्यात विविध खेळ, शारीरिक उपक्रम, शारीरिक व्यायाम, इंद्रिय शिक्षणासाठी उपक्रम, चित्रकला, रंगकाम, संगीत इ. उपक्रम, भाषाशिक्षण आरोग्य निसर्गाशी सान्निध्य येईल अशा प्रकारचे उपक्रम यांचा समावेश असावा.

२) निम्न प्राथमिक स्तरावर (इ. १-४) पुढील अभ्यासविषय असावेत- एक भाषा (मातृभाषा/ प्रादेशिक भाषा), गणित, परिसर अभ्यास, सृजनशील उपक्रम, कार्यानुभव व समाजसेवा, आरोग्य शिक्षण.

३) उच्च प्राथमिक स्तरावर (इ. ५ ते ८) पुढील अभ्यासविषय असावेत- दोन भाषा (मातृभाषा/ प्रादेशिक भाषा, हिंदी/ इंग्रजी) गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, कला, कार्यानुभव, समाजसेवा,

शारीरिक शिक्षण, नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे शिक्षण.

४) निम्न माध्यमिक स्तरावर (इ. ९ –१०) तीन भाषा, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, कला, कार्यानुभव/समाजसेवा, शारीरिक शिक्षण, अध्यात्मिक व नैतिक मूल्ये या विषयांचा समावेश असावा.

५) दहावीनंतर शिक्षण घेऊन इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५०% विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे जातील तर ५०% विद्यार्थी सर्वसामान्य शिक्षण घेतील. त्यात

**अ) सर्वसामान्य अभ्यासक्रम :** आता एक वर्षाचा जो उच्च माध्यमिक स्तर आहे त्यात सात वैकल्पिक विषयवर्ग आहेत. त्यांची वर्गवारी कला व विज्ञान या दोन गटात केली. या अभ्यासक्रमात पुढील विषयाचा समावेश केला होता.

(i) दोन भाषा, (ii) पुढील पैकी तीन विषय – इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, मानसशास्त्र, सामाजिक शास्त्रे, कला, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र, भूगर्भशास्त्र, गृहविज्ञान. (iii) कार्यानुभव आणि समाजसेवा, (iv) शारीरिक शिक्षण, (v) कला व हस्तव्यवसाय, (vi) नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे शिक्षण.

**ब) व्यावसायिक शिक्षण :** उच्च माध्यमिक स्तरावर पॉलिटेक्निक व्यतिरिक्त व्यावसायिक (Commercial) वैज्ञानिक आणि औद्योगिक अभ्यासक्रम सूरू करता येतील. मुलीकरता स्वतंत्र व्यावसायिक अभ्यासक्रम (गृहविज्ञान, पोषण नर्सिंग, सामाजिक सेवा) सुरू करता येतील. हे अभ्यासक्रम दोन ते चार वर्षाचे असावेत ते शाळांमधून किंवा विशेष संस्थामधून दिले जावेत.

६) १० वी १२ वी नंतर शालान्त परिक्षा घ्यावी.

७) अभ्यासक्रमात निवडी संदर्भात विद्यार्थ्यांना स्वतः च्या समता व आवडीनिवडी ओळखण्यास मदत व्हावी म्हणून शाळांमध्ये मार्गदर्शन कार्यक्रम सुरू करावेत.

८) अभ्यासक्रम सुधारण्याच्या प्रक्रियेत विद्यापीठे, प्रशिक्षण महाविद्यालये, राज्य शिक्षणसंस्था, शिक्षक परिषदा, राष्ट्रीय मंडळे इ. चे सहकार्य घ्यावे.

९) त्रिभाषा सूत्राचा अवलंब करावा, इंग्रजीचे शिक्षण पाचव्या इयत्तेअगोदर सुरू करू नये. संस्कृत सारख्या इतर अभिजात भारतीय भाषा इ. ८ वी पासून ऐच्छिक स्वरूपात शिकविली जावी.

१०) शालेय शिक्षणातील पहिल्या १० वर्षामध्ये सामान्य शिक्षणाचा भाग म्हणून विज्ञान व गणित हे विषय सर्वांना आवश्यक म्हणून शिकविले जावेत. तसेच चांगल्या नागरिकत्त्वासाठी सामाजिक शास्त्रांचा अभ्यासही असावा.

## ३.२.६ विद्यार्थी शिष्यवृत्ती :

कोठारी आयोगाने पुढील मुद्दे अधोरेखित करत शिष्यवृत्ती कार्यक्रमात संदर्भात शिफारशी सुचविलेल्या आहेत.

१. शिष्यवृत्ती कार्यक्रम ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. व शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर तिचे नियोजन केले पाहिजे.

२. शिष्यवृत्ती कार्यक्रमामुळे गुणवत्तापूर्ण संस्था कुशाग्र विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील.

३. सर्व सक्षम विद्यार्थी स्वतःवरचे शिक्षण निरंतर चालू ठेवतील यासाठी शिक्षणातील प्रत्येक टप्प्यावर तसेच एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यातील शिष्यवृत्ती कार्यक्रमावर काळजीपूर्वक नजर असणे गरजचे आहे.

कोठारी आयोगाने शिक्षण प्रक्रियेतील विविध स्ततरावर पुढीलप्रमाणे शिष्यवृत्ती कार्यक्रम सुचविलेला आहे.

**१. प्राथमिक स्तर :**

पूर्व प्राथमिक स्तरापासून कोणत्याही कुशाग्र व गरजु विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होणार नाही. या दृष्टिने शिष्यवृत्ती रक्कम विद्यार्थ्यांला पुरविता आली पाहिजे. १९७५-७६ पर्यंत उच्च प्राथमिक स्तरावरील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी २.५% विद्यार्थ्याला स्कॉलरशिप पुरविले पाहिजे.

**२. माध्यमिक स्तर :**

यामध्ये उच्च प्राथमिक मधून माध्यमिक स्तरामध्ये आलेल्यापैकी १५% विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळण्याच्या दृष्टिने पाऊले उचलली पाहिजेत.

**३. विद्यापीठ स्तर :**

१९७६ पर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १५% आणि १९८६ पर्यंत २५% विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप उपलब्ध झाली पाहिजे. तसेच यामध्ये वसतिगृहामध्ये राहून शिक्षण घेणारे आणि घरी राहून शिक्षण घेणारे दोघांसाठीही शिष्यवृत्तीची सुविधा असली पाहिजे.

**राष्ट्रीय शिष्यवृत्ती :**

१९७५-७६ पर्यंत जे विद्यार्थी (Graduate) पास होऊन बाहेर पडलेले आहेत त्यामध्ये टॉप ५% विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे Target असले पाहिजे.

**विद्यापीठ शिष्यवृत्ती :**

१९७६ पर्यंत पदवी स्तरावरील १०% प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे आणि २०% पदव्युत्तर स्तरावर शिष्यवृत्ती देण्याचे target असले पाहिजे.

**व्यावसायिक शिक्षणातील शिष्यवृत्ती :**

IIT मधील परीक्षा इंग्रजी तसेच, स्थानिक भाषेमधून घेण्यात याव्यात शालेय स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ३०% विद्यार्थ्यांना व कॉलेज स्तरावर ५०% विद्यार्थ्यांना या प्रमाणात शिष्यवृत्ती देण्याची सुविधा असली पाहिजे.

**परदेशी अभ्यासासाठी जाण्यासाठी शिष्यवृत्ती :**

परदेशी अभ्यासासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी ५०० शिष्यवृत्ती देण्यात याव्यात.

▶ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न २**

रिकाम्या जागा भरा.

१) पूर्व प्राथमिक स्तरावरचा अभ्यासक्रम हा -------- स्वरूपाचा असावा.

अ) उद्दिष्टांच्या ब) चित्रांच्या क) मनोरंजन ड) उपक्रमांच्या

२) उच्च माध्यमिक स्तरावर ----- वैकल्पिक विषयवर्ग आहेत.

अ) पाच ब) सहा क) सात ड) आठ

३) परदेशी अभ्यासासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी---- शिष्यवृत्ती देण्यात याव्यात.

अ) २०० ब) ३०० क) ४००ड) ५००

## ३.२.७ स्त्री शिक्षण

स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्थापन केलेल्या विविध आयोग, समित्या यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला व त्यासाठी शिफारशीही केल्या. स्त्रीयांना आत्मनिर्भर होण्यासाठी, त्यांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षण हेच महत्त्वपूर्ण साधन असल्याचे अधोरेखित केले गेले. त्यादृष्टिने कोठारी आयोगाने काही शिफारशी केल्या. तसेच यापूर्वीच्या आयोग, समित्यांनी केलेल्या शिफारशींचे समर्थन व पाठिंबा देण्याचे कामही या कोठारी आयोगाने केल्याचे दिसते.

कोठारी आयोगाने स्त्री शिक्षणासंदर्भात केलेल्या सूचना व शिफारशी पुढीलप्रमाणे :

१) मुलींच्या शिक्षणाबाबत जनमत जागृत करावे.

२) ११ ते १२ वयोगटातील ज्या मुलींना शाळेत येणे शक्य नाही त्यासाठी अंशकालीन शिक्षणाची सोय करावी.

३) शाळेसाठी आवश्यक असणारे अध्ययन-साहित्य व जरूर तर गणवेशही मुलींना मोफत पुरवावेत.

४) उच्च शिक्षणात विद्यार्थिनींचे व विद्यार्थ्यांचे एकमेकांशी प्रमाण १ : ४ आहे हे प्रमाण १ : ३ पर्यंत वाढविणे गरजेचे आहे.

५) माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा त्यापेक्षा अधिक शैक्षणिक योग्यता असलेल्या तरूण स्त्रियांना अर्धवेळ नोकऱ्यांची संधी अधिकाधिक मिळविण्यासाठी व्यवस्था केली जावी.

६) शिक्षण; रुग्णसेवा आणि सामाजिक संस्थामधील नोकऱ्या येथे लायक स्त्रियांना पूर्णवेळ काम मिळण्याची शक्यता निर्माण केली जावी.

७) हंसा मेहता समितीने शिफारस केल्याप्रमाणे मुलामुलींच्या अभ्यासक्रमात फरक असू नये.

८) मुली व स्त्रिया यांच्या शिक्षणाच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या निरनिराळ्या समित्यांनी केलेल्या शिफारशींना आयोगाने पाठिंबा दर्शविला.

९) 'राष्ट्रीय स्त्रीशिक्षण समिती' ने सुचविलेला खास कार्यक्रमावर भर दिला पाहिजे. त्याचप्रमाणे शिक्षणाच्या

सर्व स्तरावरील व  शैक्षणिक शाखांतील मुलींच्या शिक्षणाकडे सर्वसाधारपणे लक्ष द्यावे लागेल.

१०१ मुली व स्त्रिया यांच्या शिक्षणाकडे सातत्याने लक्ष देण्यासाठी राज्य पातळीवर व केंद्रीय पातळीवर खास यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.

कोठारी आयोगाच्या स्त्री शिक्षण विषयक शिफारशीप्रमाणे १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पुढील मुद्यांचा समावेश करण्यात आला.

The education of girls should receive emphasis, not only on grounds of social justice, but also because it accelerates social transformation.

यातून सामाजिक गतिमानतेसंदर्भात व सामाजिक न्यायाच्या दृष्टिने स्त्री शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले गेले आहे.

### ३.२.८ शालेय व्यवस्थापन व पर्यावरण

शैक्षणिक ध्येय धोरणाचा विकास करून, त्यानुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यासाठी किंवा त्या ध्येय धोरणांच्या अंमलबजावणीसाठी मानवी व भौतिक घटकांचे नियोजन व अपेक्षित कार्य सुव्यवस्थित चालवण्यासाठी शालेय व्यवस्थापन व पर्यवेक्षण याबाबी महत्त्वपूर्ण असतात. त्या दृष्टिने शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्यासाठी शालेय व्यवस्थापन व पर्यवेक्षण यासंदर्भात आयोगाने पुढील सूचना व शिफारशी केल्या आहेत.

१) सार्वजनिक शिक्षणासाठी समान शाळा किंवा सामाईक शाळा पद्धतीचा (Common School System) स्वीकार करणे.

२) सरकारी व स्थानिक प्राधिकरणाच्या शाळा असाव्यात. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी स्थानिक प्रतिनिधित्व असणारी शालेय समिती असावी.

३) खाजगी शाळांचा कारभार सुधारण्याची जबाबदारी सरकारने उचलावी.

४) शाळा सुधारणेचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम हाती घ्यावा.

५) पर्यवेक्षणाच्या संदर्भात राज्यातील शिक्षणखात्याची पुर्नरचना करावी.

६) नवी पर्यवेक्षण व्यवस्था स्थापित करावी.

७) प्रत्येक शाळेची दुहेरी तपासणी व्हावी.

८) पर्यवेक्षण कार्यात शाळांना मार्गदर्शन व विस्तार सेवा योजनेच्या संधी उपलब्ध करून देणे यांचा समावेश व्हावा.

९) शिक्षण अधिकाऱ्यांचे सुयोग्य प्रशिक्षण व्हावे त्यासाठी खास प्रशिक्षण यंत्रणा राबवण्यात यावी.

१०) राज्यातील व राष्ट्रातील शिक्षणाच्या दर्जात सतत सुधारणा व्हावी म्हणून या दोन्ही स्तरावर योग्य यंत्रणा उभारली जावी.

११) प्रत्येक राज्यात एक स्वायत्त असे राज्य मूल्यमापन मंडळ स्थापन केले जावे.

१२) भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयात राष्ट्रीय शालेय शिक्षण मंडळाची स्थापना केली जावी.

१३) केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने इ. १० वी व इ. १२ वी अखेर अशा दोन परीक्षा घ्याव्यात.

१४) शिक्षणसंस्था नोंदणीची सक्ती असणारा कायदा असावा.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** ३

रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) ११ ते १२ वयोगटातील ज्या मुलींना शाळेत येणे शक्य नाही त्यांच्यासाठी ----शिक्षणाची सोय करावी.

अ) अर्धवेळ ब) पूर्णवेळ क) अंशकालीन ड) अनौपचारिक

२) स्त्री शिक्षणासंदर्भात -----या समितीने शिफारस केल्याप्रमाणे मुलामुलींच्या अभ्यासक्रमात फरक असू नये.

अ) दुर्गाबाई देशमुख ब) हंसा मेहता

क) राष्ट्रीय स्त्री शिक्षण समिती ड) राममूर्ती समिती

३) सार्वजनिक शिक्षणासाठी-------पद्धतीचा स्विकार करणे.

अ) दुबार शाळा ब) केंद्रीय शाळा क) रात्रशाळा ड) सामाईक शाळा

## ३.३ पारिभाषिक शब्द

**शिक्षण आयोग** : शिक्षणाच्या संदर्भात सखोल विवेचन करून अभ्यासपूर्ण शिफारशी मांडणारे मंडळ.

**अभ्यासक्रम** : शिक्षणाची ध्येय व उद्दिष्टे साध्य करण्याचे साधन म्हणजे अभ्यासक्रम होय. ज्यात विविध अध्ययन अनुभवांचा समावेश होतो; जे अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेकडून संरचित केले जातात.

**शालेय व्यवस्थापन** : शैक्षणिक ध्येय धोरणांच्या साध्यतेसाठी केल्या जाणाऱ्या कार्यवाहीमध्ये मानवी व भौतिक घटकांचे केलेले नियोजन, संघटन, नियंत्रण होय.

## ३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची – उत्तरे

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** – १

**उत्तरे –** १) ब) डॉ. जे. पी. नाईक

२) अ) पंचतत्त्वे

३) क) विकासाच्या अवस्थांशी

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

**उत्तरे –** १) ड) उपक्रमांच्या

२) क) सात

३) ड) ५००

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ३**

**उत्तरे –** १) क) अंशकालीन

२) ब) हंसा मेहता

३) ड) सामाईक शाळा

## ३.५ सारांश

देशातील सर्व शिक्षणाच्या स्तरांवरील सदस्यांचा व देशापुढील शैक्षणिक प्रश्नांचा शैक्षणिक पातळीवरून एकत्रितपणे विचार करण्याचे काम या कोठारी आयोगाने किंवा भारतीय शिक्षण आयोगाने (१९६४–६६) केले. शिक्षणाचा विस्तार व सर्व स्तरांवरील शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे म्हणजेच पर्यायाने राष्ट्राचा विकास करणे हे कोठारी आयोगाच्या कार्यपद्धतीचे प्रमुख सूत्र होते. या आयोगाने शिक्षणाचा विचार करताना दोन महत्त्वाच्या बाबींचा विचार केला.

१) शिक्षणाचा राष्ट्रीय उद्दिष्टांशी व मूल्यांशी संबंध

२) राष्ट्रीय पातळीवर सर्वत्र सारख्या शैक्षणिक कार्यपद्धतीचा वापर.

आयोगाने शैक्षणिक रचना स्पष्ट करताना १०+२+३ हा आकृतीबंध मान्य केला. त्यानुसार स्तर निहाय अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शन केले. पूर्व प्राथमिक शिक्षणापासून उच्च माध्यमिक शिक्षणापर्यंत असणाऱ्या शालेय अभ्यासक्रम विषयक शिफारशी व तरतुदीची चर्चा आयोगाने केली. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये तसेच प्रतिभावान मुलामुलींसाठी शिक्षण अधिक गतिमान व्हावे यासाठी शिष्यवृत्तीची तरतूद सदर आयोगाने केली आहे.

स्त्री शिक्षणासाठी आवश्यक त्या शिफारशी करताना कोठारी आयोगाने यापूर्वीच्या आयोग समित्यांनी केलेल्या शिफारशींचे समर्थन करण्याचे काम केलेले आहे. शालेय व्यवस्थापन व पर्यवेक्षणाचे शैक्षणिक ध्येय धोरणांच्या अंमलबजावणीतील महत्त्व लक्षात घेऊन शिफारशी केल्या आहेत. या शिफारशीमध्ये सामाईक शाळा (Common Schooling System) यासारखी मूलभूत व अत्यंत आवश्यक अशी शिफारसही या आयोगाने केली आहे.

शिक्षणाच्या विविध घटक, स्तर यांचा एकत्रित विचार करून शिक्षणाच्या गुणवत्तेला प्राधान्य देणारा भारताच्या शैक्षणिक इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आयोग कोठारी आयोग हा असल्याचे ठळकपणे लक्षात येते.

**सरावासाठी प्रश्न**

१) कोठारी आयोगाने राष्ट्रीय ध्येय साध्यतेसाठी सूचविलेले पंचतत्त्वे.

२) कोठारी आयोगाने शिक्षणविषयक आकृतिबंध स्तरनिहाय स्पष्ट करा.

३) शालेय अभ्यासक्रमासाठी कोठारी आयोगाने कोणत्या शिफारशी केल्या आहेत.

४) कोठारी आयोगाने स्त्री शिक्षणासाठी सूचविलेल्या शिफारशी विशद करा.

**अधिक वाचनासाठी संदर्भ**


❖ गटकळ, रं. सं. (२००७), माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचा विकास, प्राजक्त प्रकाशन : नागपूर

❖ जाधव मो. भोसले, आ. व. सरपोतदार प्राची (२००८), माध्यमिक शिक्षण, फडके प्रकाशन : कोल्हापूर

❖ देशमुख, एज. जी. (२००४) भारतातील शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन : कोल्हापूर

❖ धनवडे व शिखरे वि. (२०१२) भारतीय शिक्षणाचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

❖ नरवणे, मी (२००७) भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या, नित्यनूतन प्रकाशन : पुणे

❖ वास्कर, आनंद व वास्कर पुष्पा (१९८८), भारतीय शिक्षणाचे बहुजनीकरण, नूतन प्रकाशन : पुणे


❖❖❖

## घटक – ४

# ब्रिटिशकालीन शिक्षण

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆


४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ माहिती भाषानिष्ठ व आंग्ल भाषानिष्ठ यांच्यातील शैक्षणिक वाद
- ४.२.२ माहित भाषानिष्ठ यांची भारतीय शिक्षण संदर्भातील विचारसरणी
  - स्वयं अध्ययनासाठी प्रश्न– १
- ४.२.३ लॉर्ड मेकॉलेचे मिनिटी (सारणी)
- ४.२.४ लॉर्ड मेकॉलेचा शिक्षणविषयक झिरपता सिद्धांत
  - स्वयं अध्ययनासाठी प्रश्न– २
- ४.२.५ वूडचा शैक्षणिक खलिता
- ४.२.६ शैक्षणिक जबाबदारीचा स्विकार
- ४.२.७ भारतातील शिक्षणप्रसार प्रमुख ध्येय
- ४.२.८ सर्वसमावेशक अभ्यासक्रम
- ४.२.९ अभ्यासक्रम अध्ययन अध्यापनाचे/शिक्षणाचे माध्यम
- ४.२.१० प्रांतवार लोकशिक्षण विभाग
- ४.२.११ शिक्षणसंस्थांतील शिक्षणाचे टप्पे
- ४.२.१२ विद्यापीठे स्थापना करण्याबाबत सूचना
- ४.२.१३ अनुदानाबाबतीतील शिफारशी
- ४.२.१४ शिक्षकांचे प्रशिक्षण स्त्री शिक्षण, अल्पसंख्यांकाचे शिक्षण, व्यवसायाभिमुख व रोजगाराभिमुख, शिक्षणाबाबतीतील शिफारशी
  - स्वयं अध्ययनासाठी प्रश्न– ३
- ४.२.१५ हंटर आयोग (भारतीय शिक्षण आयोग)
- ४.२.१६ हंटर आयोगाच्या प्राथमिक शिक्षणाबाबतीतील शिफारशी

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न- ४

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ


## ४.0 उद्दिष्टे :

विद्यार्थी मित्रांनो या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणाला.

- माहिती भाषानिष्ठ आणि आंग्ल भाषानिष्ठ यांच्यातील वादांच्या मुद्यांचे आकलन होण्यास मदत होईल.
- माहित भाषानिष्ठ आणि पौर्वात्य भाषानिष्ठ यांची भारतीय शिक्षण संदर्भातील विचारसरणी स्पष्ट होण्यास मदत होईल.
- वूडचा खलिता आणि त्यातील शिफारशी समजण्यास सहाय्य होईल.
- हंटर आयोग म्हणजेच भारतीय शिक्षण आयोगाच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणविषयक शिफारशी समजण्यास सहाय्य होईल.

## १.१ प्रास्ताविक :

विद्यार्थी मित्रांनो, आता आपण ब्रिटीशकालीन शिक्षणाबाबत माहिती घेणार आहोत. आपणा सर्वांना माहितच आहे की, सन १४९८ मध्ये सर्वप्रथम 'वास्को-द-गामा' हा समुद्र मार्गाने म्हणजेच जलमार्गाने भारतात आला. त्यानंतर युरोपियन लोक जसे की डच, फ्रेंच, स्पॅनिश, डेन, इंग्रज हे भारतामध्ये व्यापाऱ्याच्या निमित्ताने आले. त्यांनी त्यांच्या व्यापारी संस्था स्थापन करून भारतात व्यापाराची सुरूवात केली. सर्वप्रथम व्यापारी म्हणून भारतामध्ये त्यांनी पक्की पायाभरणी केली. यानंतर व्यापाऱ्याच्या निमित्ताने भारतात जमिनी खरेदी केल्या, त्यांच्या धर्माच्या प्रसारास सुरूवात केली. याबरोबरच त्यांच्या राजकीय सत्ता बळकावण्याच्या महत्त्वकांक्षा वृद्धिगंत झाल्या. त्यांनी भारतात असणाऱ्या पुढील प्रकारच्या सामाजिक परिस्थितीचा फायदा उठविण्याचे ठरविले.




आकृती क्र. ४.१ : १४ व्या व १५ व्या शतकातील भारतीय समाजाची स्थिती

४.१ : १४ व्या व १५ व्या शतकातील भारतीय समाजाची परिस्थिती आपणास स्पष्ट होण्यास मदत होते. सदर स्थिती निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे या काळामध्ये शिक्षणाचा अभाव, आणि अशा या परिस्थितीचा फायदा उठविण्याचे युरोपीयनांनी ठरविले आणि साम्राज्य विस्तारासाठी, धर्म प्रसारासाठी हात पाय पसरले.

यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता होती आणि त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी आणि धर्म प्रसारासाठी म्हणून युरोपियांनी भारतात शिक्षण सुरू केले. सदर शिक्षण हे पाश्चिमात्य विचार, आचार, संस्कृतीवर आधारित होते.

ब्रिटिशांनी, पोर्तुगीत, डच, फ्रेंच, डॅनिश यांना मागे टाकत ईस्ट इंडिया कंपनीद्वारे भारतामध्ये साम्राज्य विस्तार केला. सहाजिकच राज्यकर्ते बनल्यामुळे राजकीय हस्तक्षेप हा भारतीय जीवन पद्धतीवर वाढला. धर्मप्रचाराच्या कार्यासाठी अनेक ब्रिटिश मिशनरी भारतात येऊ लागले. त्यांनी अनेक शिक्षण संस्था स्थापन केल्या आणि त्यामार्फत शिक्षण देण्यात येऊ लागले. यासंबंधी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने सर्वप्रथम १८१३ मध्ये भारतीय शिक्षणासंबंधी चार्टर ॲक्ट तयार केला. यानुसार भारतीय शिक्षणाची जबाबदारी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने घेतली आणि बंगाल, मुंबई, मद्रास या प्रांतात शिक्षणासंबंधी कार्य हाती घेतले आणि त्याद्वारे पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार करण्याचे अनेक प्रयत्न केले तसेच १८२३ नंतर खऱ्या अर्थाने भारतातील शिक्षणास काही सोयी सुविधा देण्यात येऊ लागल्या. तसेच १८३३ मधील शिक्षणविषयक कायद्यामुळे भारतीय शिक्षणावर फार मोठा परिणाम झालेला दिसून येतो.


तर मित्रांनो अशा पद्धतीने भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी शिक्षणाची वाटचाल दिसून येते. याबरोबरच आपणाला एक गोष्ट ठळकपणे लक्षात ठेवावी लागते ती म्हणजे शिक्षणविषयक प्रगती बरोबरच ब्रिटिश ईस्ट इंडियाच्या अधिकाऱ्यांमध्ये भारतीय शिक्षण कोणत्या भाषेमधून देण्यात यावे याबाबत वाद सुरू झाला. त्यांच्यामध्ये दोन गट निर्माण झाले ते म्हणजे माहित भाषानिष्ठ व आंग्ल भाषानिष्ठ यांच्यातील शैक्षणिक वाद (Oriental and Occidental Educational Controversy) चला मग या वादाविषयी आता आपण अधिक माहिती घेऊयात.

## ४.२ विषय विवेचन / प्रतिपादन

### ४.२.१ माहित भाषानिष्ठ व आंग्ल भाषानिष्ठ यांच्यातील शैक्षणिक वाद :

**(Oriental and Occidental Educational Controversy)**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीलाच ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांचे दोन गट पडले. हे गट नेमके कोणत्या भाषेतून भारतीयांना शिक्षण देण्यात यावेत याबाबत होते.





आकृती क्र. ४.२ ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी अधिकाऱ्यांचे गट

अशा प्रकारे आकृती क्रमांक ४.२ वरून हे स्पष्ट होते की, ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी भारतीयांचा शिक्षणातून विकास साधण्यासंदर्भात दोन गटामध्ये विभागलेले होते. त्याची आपण आता सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे करूयात.

### ४.२.१ माहित भाषानिष्ठांची भारतीय शिक्षण संदर्भातील विचारसरणी :

१७ जुलै, १८१३ मध्ये लोकशिक्षणाची केंद्रीय समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या एकूण १० सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्य हे माहित भाषानिष्ठ विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यामुळेच त्यांनी कलकत्ता, आग्रा, दिल्ली येथे संस्कृत महाविद्यालयांची स्थापना केली. तसेच काही इंग्रजी पुस्तकांची संस्कृत, अरब व फारशी भाषांमध्ये भाषांतर करून घेतलीत माहित भाषानिष्ठांनुसार




आकृती क्र. ४.३ भारतीय संस्कृती संपदा

अशा प्रकारे आकृती क्र. ४.३ भारतीय संस्कृती संपदा यामध्ये दर्शविल्यानुसार माहित भाषानिष्ठ हे भारतीयांच्या प्राचीन व जगाला मार्गदर्शन करणाऱ्या संस्कृतीचे, वेद आणि बौद्ध वाङ्मय तत्त्वज्ञानाचे वेदांत, आरोग्य, वैद्यक, कृषी, ज्योतिष शिल्प व संगीत, कला इ. समृद्ध वारसाचे पुरस्कर्ते असलेले दिसून येतात. सदर वारसा नष्ट होऊ नये म्हणून प्रयत्नशील असलेले दिसून येतात. तसेच पाश्चिमात्य संस्कृतीचा आणि शिक्षणाच्या आक्रमणामुळे याबाबी नष्ट होऊ नयेत म्हणून सरकारने दिलेले एक लाख रूपयाचे शैक्षणिक अनुदान भारतीय भाषा आणि भारतीय वाङ्मयावर खर्च करण्यात यावे याकरिता तसेच संस्कृत, अरबी व फारशी भाषांच्या अभ्यासाला सरकारतर्फे प्रोत्साहन मिळावे, शाळा व महाविद्यालयांतून या भाषांतून शिक्षण द्यावे संस्कृतमध्ये असणारे वेद वाङ्मय सर्व जगाला कळावे म्हणून त्याच्या विकासासाठी सरकार स्तरावरून प्रयत्नशील असावे. याचा पुरस्कार करताना दिसून येतात. याचबरोबर माहित भाषानिष्ठ हे शाळा आणि महाविद्यालयांमधून संस्कृत, अरबी व फारसी या भाषांच्या अभ्यासाला व अध्यापनाला प्रोत्साहन देण्यात यावे याकरिता तसेच या भाषांच्या विकासाकरिता शासकीय स्तरावरून विशेष प्रयत्न व्हावे याकरिता प्रयत्न करीत असलेले दिसून येतात. त्याचबरोबर 'संस्कृत' जी एक अतिप्राचीन व ज्ञान भाषा असल्यामुळे त्यासाठी त्याच्या जतणूकीचे विशेष प्रयत्न व्हावेत याकरिता प्रयत्नशील असलेले दिसून येतात.

अशा प्रकारे भारतीय संस्कृती, वारसा याबद्दल माहित भाषानिष्ठवादी हे सकारात्मक असलेले दिसून


येतात. तर आता आपण आंग्ल भाषानिष्ठ यांच्या विचारसरणी चा अभ्यास करूयात.

## ४.२ आंग्ल भाषानिष्ठ यांची भारतीय शिक्षण संदर्भातील विचारसरणी

### ४.१.२.१ पूर्व वैदिक म्हणजेच ऋग्वेद कालखंडातील शिक्षण :

आंग्ल भाषानिष्ठ हे माहित भाषानिष्ठांच्या विरोधात असलेले दिसून येतात. ते भारतीय वारसा आणि भारतीय भाषा जोपासण्याऐवजी पश्चिमात्य शिक्षणाचा पुरस्कार करताना दिसून येतात. त्यांच्यानुसार राज्य कारभाराची भाषा ही इंग्रजी आहे. कंपनी सरकारच्या सेवेत अनेक भारतीय आहेत तसेच त्यांचे भविष्य उज्वल करावयाचे असेल तर त्यांना आंग्ल भाषेतून शिक्षण दिले पाहिजे. तसेच कंपनी सरकारच्या पैशातून केवळ पौर्वात्य भाषा आणि पौर्वात्य वाङ्मय यांचा विकास करणे योग्य होणार नाही. आंग्ल भाषा शिकल्यास भारतीयांना लवकरात लवकर शासकीय नोकरी लागू शकते. त्याचबरोबर आंग्ल भाषानिष्ठांना असे वाटे की भारतीय लोकांची सामाजिक परिस्थिती हालाखीची आहे. त्यांचे अज्ञान फार आहे. त्याचा धर्म योग्य आणि म्हणूनच त्यांना इंग्रजीतून पाश्चात्य ज्ञान दिले पाहिजे. असे आंग्ल भाषानिष्ठ मानत.

अशा प्रकारे १८१३ च्या सनदेच्या कायद्याने भारतीय शिक्षणाच्या संदर्भात दोन गट पडलेले दिसतात. या दोन्ही गटांमधील वादाचे मुद्दे होते ते पुढीलप्रमाणे असलेले दिसून येतात.




आकृती क्र. ४.४ माहित भाषानिष्ठ व आंग्ल भाषानिष्ठ यांच्यातील वादाचे मुद्दे

आकृती क्र. ४.४ माहित भाषानिष्ठ व आंग्ल भाषानिष्ठ यांच्यातील वादाचे मुद्दे स्पष्ट होताना दिसतात. या वादाचे निराकरण करण्यासाठी दोन्हीही गटांनी आपली मते लॉर्ड मेकॉले (कार्यकारी मंडळातील विधिसदस्य लॉ-मेंबर) यांच्याकडे सोपविली. सदर वादग्रस्त मुद्यांच्या निराकरणातून लॉर्ड मेकॉले याची टिप्पणी आणि शिक्षणा संदर्भातील झिरपता सिद्धांत अस्तित्वात आलेला दिसून येतो.

तर मग काय विद्यार्थी मित्रांनो आता पर्यंत ज्या माहितीचा आपण अभ्यास केला आहे. त्यातून आपणाला १४ व्या शतकापासून भारतीय शिक्षणात पाश्चिमात्यांच्या प्रभावामुळे आणि हस्तक्षेपामुळे कोणते बदल झाले आहेत हे समजण्यास सहाय्य झाले असेलच. आता आपण स्वयं अध्ययनाचे मूल्यमापन करूयात पुढील स्वयं अध्ययन प्रश्न सोडवून.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

१) १८१३ साली भारतीय शिक्षणासंबंधी कोणता ॲक्ट तयार करण्यात आला?

२) स्वातंत्र्यपूर्व काळात कोणी धर्म प्रचाराचे आणि शिक्षणाचे कार्य सुरू केले?

३) कोणता गट भारतीय वारसाचा पुरस्कार करीत होता?

४) कोणता गट पाश्चिमात्य संस्कृतीचा आणि शिक्षणाचा पुरस्कार करीत होता?

५) लॉर्ड मेकॉले कोण होता?

तर विद्यार्थी मित्रांनो आता आपण लॉर्ड मेकॉलेने त्याच्या टिपण्णीद्वारे माहितनिष्ठ आणि आंग्लनिष्ठ यांच्या वादावर नेमके Solution म्हणजे वादविवाद बाबतीत त्याचे मत काय मांडले याचा अभ्यास करूयात.

**४.२.३ : लॉर्ड मेकॉलेचे मिनिट (टिपण्णी):**

माहित भाषानिष्ठ आणि आंग्ल भाषानिष्ठ यांच्या वादाचे प्रकरण हे लॉर्ड मेकॉलेकडे गेले. त्या वादाचे निराकरण करणे आणि भारतीय शैक्षणिक व्यवस्था ठरविणे याकरिता लॉर्ड मेकॉले भारतात १० जून १८३४ मध्ये कौन्सिल ऑफ गव्हर्नर जनरलचा सदस्य म्हणून भारतात आला. १८३३ च्या जाहिरनाम्यानुसार त्याची नियुक्ती ही गव्हर्नर जनरल कौन्सिलचा कायदा सदस्य म्हणून करण्यात आली होती. तसेच लॉर्ड बेटिंकने बंगालच्या लोकशिक्षण सभेचा चेअरमन म्हणून त्याची नियुक्ती केली आणि त्यामुळेच कायदेतज्ज्ञांच्या कार्यालयामार्फत सरकारने दोन बाबतीत त्याचा सल्ला मागविण्यात आला. या दोन बाबी म्हणजे –

१. मंजूर केलेले रु. १००००० महित भाषानिष्ठ शिक्षणाव्यतिरिक्त इतर शिक्षणावर खर्च करता येणे शक्य होईल काय?

माहितनिष्ठ, आंग्लनिष्ठ व शासनाच्या अपेक्षांचा विचार करता लॉर्ड मेकॉलेनी २ फेब्रुवारी १८३५ ला टिपण्णी सादर केली. जिच्यामध्ये भारतीय शिक्षणप्रणालीविषयक त्याने त्याचे विचार स्पष्ट केले, मेकॉलेच्या टिप्पणीमध्ये काही घटकांचा मुख्यतः ऊहापोह केलेला दिसून येतो. हे घटक पुढीलप्रमाणे.

वाङ्मय या शब्दांचा अर्थ मेकॉले असा स्पष्ट केला आहे की, १८१३ च्या हुकूमनाम्यातील वाङ्मय हा शब्द 'इंग्रजी वाङ्मय' या अर्थाने वापरला आहे.

त्याचबरोबर भारतीय विद्वान म्हणजे 'Indian Sholar' याबाबतीत तो १८१३ च्या हुकूमनाम्या संदर्भात अर्थ स्पष्ट करताना तो 'लॉकचे तत्त्वज्ञान आणि मिल्टनच्या काव्याचा ज्यांनी अभ्यास केला आहे. अशा व्यक्तीस मेकॉले भारतीय विद्वान असे संबोधतो. यावरून असे स्पष्ट होते की मेकॉले 'भारतीयांनी इंग्रजी वाङ्मयाचे व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचे ज्ञान पुरस्कर्ता होता.'

त्याचबरोबर लॉर्ड मेकॉले माहितनिष्ठांचे विचार ह्या विचारांचा विरोधक होता. त्याच्यानुसार माहितनिष्ठांचे विचार हे 'परिवर्तन विरोधी' आहेत, आणि अशा या माहितनिष्ठ शिक्षण पद्धतीस जर मदत केली तर भविष्यातील प्रगतीच्या मार्गात वादग्रस्त परिस्थिती निर्माण करणे होय. त्यामुळे मेकॉले भारतीय भाषांतून शिक्षणास विरोध

करताना दिसतो आणि इंग्रजी भाषेचे समर्थन करताना व भारतात शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे अशी शिफारस करताना दिसतो.

तसेच लॉर्ड मेकॉले भारतातील वाङ्मयापेक्षा इंग्रजी भाषेतील पुस्तकांचे साधे एक कपाट अधिक मौल्यवान आहे अशी तो टीका करतो आणि भारतीय वाङ्मयाला / ज्ञानाला तुच्छ लेखताना दिसतो. खरे पाहता लॉर्ड मेकॉलेला भारतीय संस्कृती वाङ्मय याबद्दल फारशी माहिती असलेली दिसून येत नाही आणि अज्ञानापोटी तो भारतीय भाषातून शिक्षणाच्या विरोधात असलेला दिसून येतो. याचबरोबर वृथा अभिमानाने तो इतर युरोपियन भाषांच्या तुलनेत इंग्रजी भाषा सर्वश्रेष्ठ व ज्ञानी आहे असे अलंकारिक भाषेतून मांडत होता.

याचबरोबर त्याने लॉर्ड बेटिंक म्हणजे शासनाला माहितभाषा व आंग्ल भाषा या वादावरील तोडगा काढण्याकरिता आणि भारतीय शासनाने इंग्रजी भाषेतून भारतात शिक्षण देण्याची शिफारस त्याच्या टिप्पणीद्वारे केली होती. त्याच्या या विचाराच्या समर्थनात त्याने काही वस्तूस्थितींची माहिती सादर केली होती ती म्हणजे-

१. भारतातील राज्यकर्त्यांची भाषा ही इंग्रजी आणि त्यामुळेच उच्च वर्गातील लोक इंग्रजी भाषेचा वापर करतात.

२. राज्यकर्त्यांच्या प्रभावामुळेच पौर्वात्य भागातील भाषा आणि दळणवळण हे इंग्रजी भाषेमधून होईल

३. ऑस्ट्रेलिया आणि आफ्रिकन खंडातील पुढारलेले लोक इंग्रजीच भाषा वापरतात आणि भारताबरोबर त्यांचे संबंध दिवसेंदिवस विकसित होतील त्यासाठी भारतीयांना इंग्रती भाषेची आवश्यकता भासेल.

४. लॅटिन आणि ग्रीक भाषांनी इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे पुर्नउत्थानाचे कार्य केले त्याप्रमाणे भारतामध्येसुद्धा इंग्रजी भाषा पुर्नउत्थानाचे कार्य करेल.

५. भारतीय लोक स्वतःच संस्कृत, अरबी किंवा फारशी भाषा या आत्मसात करण्यापेक्षा इंग्रजी भाषा आत्मसात करण्यावर भर देतात.

६. इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय आणि आधुनिक जगाची भाषा आहे. त्यामुळे भारतीयांना इंग्रजी भाषेमधून शिक्षण देऊन त्यांना विद्वान सरकारने बनवले पाहिजे.

७. रक्ताने व वर्णाने भारतीय असणाऱ्यांना इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यामध्ये इंग्रजाप्रमाणे आचार-विचार, बुद्धी संस्कृती रूजविता येईल आणि त्यांना इंग्रज बनविता येईल.

८. इंग्रजी शिकल्यामुळेच भारतीयांचा विकास होईल त्याचबरोबर अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, प्रथा परंपरा यातून भारतीयांची सुटका होणे शक्य होईल.

अशा प्रकारे लॉर्ड मेकॉलेने आंग्ल भाषेतून पश्चिमात्य शिक्षण देण्याचे समर्थन केलेले दिसून येते. याचबरोबर लॉर्ड मेकॉलने शिक्षणाचा झिरपता सिद्धांत मांडला त्याची चर्चा आपण पुढीलप्रमाणे करूयात.

### ४.२ : लॉर्ड मेकॉलेचा शिक्षणविषयक झिरपता सिद्धांत :


विद्यार्थी मित्रांनो आतापर्यंत आपण लॉर्ड मेकॉलेच्या माहित भाषानिष्ठ आणि आंग्ल भाषा निष्ठ यांच्या वादावरील टिप्पणीची माहिती घेतलीत आता आपण लॉर्ड मेकॉलेचे भारतीय शिक्षणातील योगदान म्हणजेच

त्यांच्या 'शिक्षणविषयक झिरपता सिद्धांत' अभ्यासू यात.

साधारण असे मानण्यात येते की, समाजातील खालच्या वर्गातील लोक वरच्या वर्गातील लोकांच्या कल्पनांचे अनुकरण करतात आणि या बाबीचा विचार करूनच ख्रिश्चन मिशनऱ्यांनी वरच्या वर्गातील लोकांमध्ये इंग्रजी शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य हाती घेतले यानुसारच ब्रिटीश शासनकर्त्यांचासुद्धा दृष्टिकोन होता. हाच विचार लॉर्ड मेकॉलने त्याच्या झिरपत्या सिद्धांतामधून देखील मांडलेले दिसतात.

पाणी शुद्धिकरणासाठी ही पद्धती वापरण्यात येत असे. यासाठी तीन मातीची मडकी घेत असत. सर्वात वरच्या मडक्यात पाणी ठेवले म्हणजे ते झिरपत-झिरपत तळ्याच्या मडक्यापर्यंत स्वच्छ व शुद्ध होऊन खाली येत असे. या झिरप तत्त्वाचा आधार घेत लॉर्ड मेकॉले यांनी भारतीय शिक्षणप्रसाराबाबत धोरण राबविण्याचे ठरविले दिसते. यानुसार सर्वप्रथम समाजातील उच्च वर्गाला शिक्षण द्यावे आणि असे हे शिक्षण झिरपत झिरपत समाजातील खालच्या सामान्य वर्गापर्यंत पोहोचेल कारण उच्च वर्गाचे अनुकरण हे कायम समाजातील खालचा वर्ग/स्तर करीत असतो.

अशा प्रकारे लॉर्ड मेकॉलेने त्याचा शिक्षणविषयक झिरपता सिद्धांत मांडलेला दिसतो. यामध्ये प्रामुख्याने उच्च वर्गाचे अनुकरण करत तळागाळातील लोकांपर्यंत थेंबा थेंबाने शिक्षण पोहोचेल असे मत लॉर्ड मेकॉलेचे होते. हे मत आपल्याला आकृती क्र. ४.५ यावरून अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल.




आकृती क्र. ४.५ लॉर्ड मेकॉलेचा झिरपता सिद्धांत

अशा प्रकारे लॉर्ड मेकॉलेच्या सिद्धांतानुसार भारतामध्ये शिक्षण देण्यात येऊ लागले. शिक्षित लोक व सामान्य लोक यांच्यात दरी निर्माण झाली. त्यांना जास्त सरकारी नोकऱ्या मिळाल्या गरीब आणि श्रीमंत यांच्यात

दरी वाढली. उच्च वर्गीय गरीब लोकांचे अधिक शोषण करू लागले आणि खऱ्या अर्थाने सामान्य लोकांपर्यंत शिक्षण पोहोचू शकले नाही. त्यामुळे लॉर्ड मेकॉलेचा सिद्धांत भारतीय शिक्षण प्रणालीस उपयुक्त ठरू शकला नाही. तर अशा या आत्तापर्यंत शिकलेल्या भागावर आता आपण प्रश्न सोडवू यात.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

  १) माहित भाषानिष्ठ आणि आंग्ल भाषानिष्ठ यांच्या वादाचे प्रकरण निर्णयासाठी कोणाकडे गेले?

  २) लॉर्ड मेकॉलेनुसार 'भारतीय विद्वान' म्हणजे का?

  ३) शिक्षणविषयक झिरपता सिद्धांत कोणी मांडला?

  ४) झिरपत्या सिद्धांतानुसार सर्वप्रथम कोणाला शिक्षण देण्याची योजना होती?

  ५) झिरपता सिद्धांत का यशस्वी होऊ शकला नाही?

विद्यार्थी मित्रांनो आता आपण वूडचा शैक्षणिक खलिता (१८५४) याबद्दलची माहितीचा अभ्यास करूयात.

### ४.२.५ : वूडचा शैक्षणिक खलिता (१८५४) / Wood's Educational Dispatch :

विद्यार्थी मित्रांनो आपण लॉर्ड मेकॉलेच्या झिरपत्या सिद्धांताबद्दल माहिती अभ्यासली त्यावरून आपणाला स्पष्ट झाले की, मिशनरी हे मुक्तपणे धर्मांचे प्रसार करीत तर भारतीयांचे जास्तीत जास्त धर्मांतर करणे आणि ब्रिटीश धार्जिणे लोक निर्माण करण्यावर ब्रिटीश सत्ता कार्यरत असलेली दिसून येते.

याचबरोबर आपणास असे स्पष्ट होते की, ईस्ट इंडिया कंपनीला ब्रिटीश पार्लमेंटकडून दर वीस वर्षांनी भारतीय शिक्षणासंबंधी आज्ञा येत असत. इ. स. १८१३ च्या आज्ञापत्रात भारतीय शिक्षणासंबंधी विकासासाठी प्रतिवर्षी एक लक्ष रूपये मंजूर करण्यात येत असत. १८३३ च्या पत्रामध्ये ही रक्कम एक लक्ष रूपयांवरून प्रतिवर्षी दहा लक्ष/ लाख रूपयांपर्यंत वाढविलेली दिसून येते. ज्यावेळी १८५३ च्या चार्टर कायदा अंतिम करण्याची वेळ आली त्यावेळी भारतीय शिक्षणाच्या धोरणाबाबत निर्णय घेण्यासंबंधी विचार करण्यात येवू लागला. त्यामुळे पार्लमेंटरी कमिटीची नियुक्ती करण्यात आली. भारतीय शिक्षणाच्या प्रगतीचे सर्वेक्षण करणे हा या कमिटीचा हेतू होता. या कमिटीने ब्रिटीश पार्लमेंटला कळविले की भारतीय शिक्षणाचा विकास कोणत्याही प्रकारे ब्रिटीश साम्राज्याला हानीकारक होणार नाही. या समितीच्या सूचना स्विकारून, 'श्रीयुत वूड' यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नेमणूक करण्यात आली. या समितीच्या पत्रालाचा/ त्यांच्या शिफारशींनांच 'वूडचा खलिता' असे संबोधण्यात येते. कंपनी सरकारने शैक्षणिक धोरण या खलित्याने निश्चित केल्याचे दिसून येते. त्यामुळेच सदर खलित्यास शैक्षणिक इतिहासात महत्त्व असलेले दिसून येते त्याचबरोबर १८५४ च्या वूडच्या खलित्याच्या 'भारतीय शिक्षणाचा संरक्षक कायदा' (मॅग्नाचार्ट) म्हणून संबोधण्यात येते. अशा या वूडच्या खलित्याच्या शिफारशींचा आता आपण अभ्यास करूयात.

### वूडच्या शैक्षणिक खलित्यामधील शिफारशी

वूडचा खलिता हा मोठा शैक्षणिक अहवाल असलेला दिसून येतो. सदर खलित्यामध्ये १०० कलमांचा समावेश आहे. या सर्व बाबतीतील माहितीचा आता आपण पुढील मुद्यांच्या अनुषगांने अभ्यास करूयात.

**४.२.५.१ : शैक्षणिक जबाबदारीचा स्वीकार :**

या खलित्यामध्ये प्रथमतःच ब्रिटीश सरकारने भारतीयांच्या शिक्षणाची जबाबदारी स्विकारलेली दिसून येते.

**४.२.५.२ : भारतातील शिक्षण प्रसार प्रमुख ध्येय :**

वूडच्या खलित्यामध्ये भारतातील शिक्षणाच्या ध्येयासंबंधी शिक्षण प्रसार करणे हा एक प्रमुख ध्येय असलेले दिसून येते. त्याचबरोबर भारतीयांना पाश्चिमात्य ज्ञान प्रदान करणे, बौद्धिक आणि नैतिकता ही पाश्चिमात्य वाङ्मयाद्वारे उंचावणे, इंग्रजनिष्ठ आणि सुशिक्षित भारतीय तयार करणे जे ब्रिटीश सरकारला मदत करतील ज्यामुळे सुशिक्षित असे मनुष्यबळ राज्यकारभारासाठी इंग्रजांना उपलब्ध होऊ शकेल.

**४.२.५.३ : सर्वसमावेशक अभ्यासक्रम :**

वूडच्या खलित्यामध्ये माहित भाषानिष्ठ आणि आंग्लभाषानिष्ठ या दोघांनाही खुश करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला दिसून येतो. यासाठी या समितीने संस्कृत, अरबी, फारशी यांचा पाश्चिमात्य कला, तत्त्वज्ञान आणि वाङ्मय याबरोबर समावेश करून अभ्यासक्रम हा सर्वसमावेशक पद्धतीने स्पष्ट केलेला दिसून येतो.

**४.२.५.४ : अभ्यासक्रम अध्ययन-अध्यापन/ शिक्षणाचे माध्यम :**

वूडच्या खलित्यामध्ये प्रामुख्याने माध्यमिक स्तरावरील इंग्रजी भाषेचा वापर करण्यात यावा. तर प्राथमिक स्तरावरील शिक्षणासाठी प्रादेशिक/ मातृभाषेचा वापर करण्यात यावा. अशी शिफारस करण्यात आलेली दिसून येते. तर उच्च शिक्षणासाठी इंग्रजी माध्यमाचाच वापर करण्यात यावा.

**४.२.५.५ : प्रांतवार लोकशिक्षण विभाग :**

वूडच्या खलित्यामध्ये प्रांतवार लोकशिक्षण विभागाची उभारणी करण्यावर भर दिलेला दिसून येतो. सदर प्रांत म्हणजे पंजाब, बंगाल, मद्रास, मुंबई व उत्तर पश्चिम प्रदेश असे प्रांत असलेले आपणास दिसून येतात. या संपूर्ण प्रांताच्या शिक्षणाची जबाबदारी ही लोकशिक्षण विभागाच्या संचालकावर सोपविण्यात यावी अशी वूडच्या खलित्यामध्ये शिफारस करण्यात आली आहे. याबरोबरच (पुढील प्रमाणे) आकृती याची रचना असावी अशी शिफारस करण्यात आलेली दिसून येते.

प्रांतवार लोकशिक्षण विभाग

⇓

लोकशिक्षण विभाग संचालक

⇓

मदतीस उपशिक्षण संचालक

⇓

निरीक्षक आणि शाळांचे उपनिरीक्षक

आकृती क्र. ४.६ प्रांतवार लोकशिक्षण विभागाची रचना

### ४.२.५.६ : शिक्षणसंस्थांतील शिक्षणातील टप्पे :

वूडच्या खलित्यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे असे शिक्षणसंस्थातील शिक्षणाच्या टप्प्यांची शिफारस करण्यात आलेली दिसून येते हे टप्पे आपल्याला आकृती क्र. ४.७ शिक्षणसंस्थातील शिक्षणातील टप्प्यांतून स्पष्ट होण्यास मदत होते.

प्राथमिक शिक्षण/शाळा → माध्यमिक शिक्षण/शाळा → उच्च माध्यमिक शिक्षण/शाळा → महाविद्यालये → विद्यापीठे

आकृती क्र. ४.७ शिक्षणसंस्थातील शिक्षणातील टप्पे

### ४.२.५.७ : विद्यापीठे स्थापना करण्याबाबत सूचना :

या खलित्यामध्ये कलकत्ता, मुंबई, मद्रास आणि आवश्यकतेनुसार इतर ठिकाणी विद्यापीठांची स्थापना करण्याबाबत सूचना करण्यात आली.

### ४.२.५.८ : अनुदानाबाबतीतील शिफारशी :

वूडच्या खलित्याद्वारे अशाच शिक्षणसंस्थांना अनुदान देण्यात यावे ज्या विशिष्ट गुणवत्ता पूर्ण करतील अशी शिफारस करण्यात आलेली दिसून येते. त्याचबरोबर इंग्लडमधील शिक्षणाच्या धर्तीवरच अनुदानासंबंधी नियम व अटी तयार करण्यात याव्यात अशी शिफारस केलेली दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने स्थानिक लोकसमितीने स्थापन केलेल्या कार्यक्षम शिक्षणसंस्था असलेल्या तसेच जातीधर्मांचे पालन न करणाऱ्या आणि शाळेची तपासणी करून अनुदानाचे वाटप करावे. त्याचबरोबर अशा संस्थांनी कमी प्रमाणात विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क आकारावे. त्याचबरोबर शालेय इमारत, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, वेतन, शिष्यवृत्त्या, स्त्री शिक्षण, ग्रंथालय इ. चा. विचार करून अनुदान शैक्षणिक संस्थांना देण्यात यावे.

### ४.२.५.९ : शिक्षकांचे प्रशिक्षण, स्त्री शिक्षण, अल्पसंख्यांकाचे शिक्षण, व्यावसायिक व रोजगाराभिमुख शिक्षणाबाबतीतील शिफारशी :

शिक्षणाची गुणवत्ता वाढावी याकरिता अध्यापकांची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे आणि त्याकरिता इंग्लंडच्या धर्तीवर भारतातील प्रत्येक प्रांतात शिक्षकांच्यासाठी प्रशिक्षण संस्था या प्रांतावर देण्यात याव्यात. वूडच्या खलित्यामध्ये स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. त्याचबरोबर स्त्री शिक्षणाला अधिक प्रोत्साहित करण्यासाठी अनुदान साहाय्य आणि इतर सवलती देखील सुचविलेल्या आहेत.

अल्पसंख्याक म्हणजेच मुस्लिम शिक्षणासंबंधी अधिक सेव सुविधा उपलब्ध करून द्याव्या. अशी शिफारस केलेली दिसून येते. याचबरोबर वूडच्या खलित्यामध्ये व्यावसायिक व रोजगाराभिमुख शिक्षणावर देखील भर दिलेला दिसून येतो. त्यांच्यानुसार शाळा व महाविद्यालयांची अशा ठिकाणी उभारणी करण्यात यावी जेथे तेथील परिसरातील लोकांना व्यावसायिक शिक्षण घेता येणे शक्य होईल तसेच हे लोक शिक्षण घेऊन आर्थिकदृष्ट्या संपन्न होतील. याचबरोबर सरकारी नोकरीसाठी उमेदवारांची निवड करताना त्याची शैक्षणिक पात्रता प्राधान्याने विचारात घ्यावी. शैक्षणिकदृष्ट्या गुणवत्तापूर्ण अशा पात्रतेचा उमेदवार सरकारी नोकरीसाठी निवडण्यात यावा.

अशा प्रकारे वूडच्या खलित्याने भारतीयांच्या शिक्षणाचा पुरस्कार करत भारतातील प्रादेशिक भाषेतून

प्राथमिक शिक्षणाला पाठबळ देत, स्त्री शिक्षणाला, प्रोत्साहन आणि व्यावसायिक व रोजगाराभिमुख शिक्षणाला पाठिंबा देत भारतीयांचा विकास साधण्यासाठी म्हणून शिक्षण यावर वूडने भर दिलेला दिसून येतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

१) वूडचा खलिता कोणत्या वर्षी मांडण्यात आला?

२) वूडच्या खलित्यानुसार लोकशिक्षण विभागाची कोणत्या प्रकारे उभारणी करण्यावर भर देण्यात आला?

३) वूडच्या खलित्यामध्ये कोणत्या ठिकाणी विद्यापीठे उभारावीत याबाबत सूचना करण्यात आल्या?

४) वूडच्या खलित्यानुसार एखाद्या शैक्षणिक संस्थेला अनुदान देताना कोणत्या घटकांचा विचार करण्यात यावा?

५) वूडच्या खलित्यानुसार अभ्यासक्रम कोणत्या पद्धतीचा असावा?

विद्यार्थी मित्रांनो, अशा प्रकारे आपण वूडची समिती, त्याच्या शिफारशी इ. बद्दल अध्ययन केलेले आहे. आता आपण हंटर कमिशनबद्दल माहिती घेऊयात.

## ४.२.६ हंटर आयोग :

विद्यार्थी मित्रांनो, आत्तापर्यंत आपण ईस्ट इंडिया कंपनीच्या बोर्ड ऑफ डायरेक्टरचे अध्यक्ष सर चार्ल्स वूड यांच्या सांगण्यावरून बिटिश ईस्ट इंडिया कंपनीला म्हणजेच भारत शासनास जे आदेश दिले त्याबद्दल माहिती अभ्यासली आहेच सदर अहवालाचा भारतीय शिक्षणावर दूरगामी परिणाम झालेला दिसून येतो. परंतु या अहवालानुसार केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीनंतरही भारतीय प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची फारशी प्रगती ही इ. स. १८५४ ते १८८२ या कालावधीमध्ये अपेक्षेप्रमाणे न झाल्याने भारत सरकारने विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली इ. स. १८८२ मध्ये एका आयोगाची स्थापना केली. सदर आयोग म्हणजेच भारतीय शिक्षण आयोग होय. हा आयोग या समितीचे अध्यक्ष जे विल्यम हंटर होते त्यांच्या नावावरूनही यास हंटर आयोग असे संबोधण्यात येते.


चला तर विद्यार्थी मित्रांनो या आयोगाच्या शिफारशींचा आता आपण अभ्यास करूयात.

### हंटर आयोग/ भारतीय शिक्षण आयोगाच्या शिफारशी :

वूडच्या खलित्यातील तत्त्वांप्रमाणे शिक्षणाचा विकास होतो किंवा नाही याचा व प्राथमिक शिक्षणाचा विकास करण्याच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी सदर आयोगाची स्थापना करण्यात आली होती. यास अनुसरून सदर आयोगाने

### ४.२.६.१ प्राथमिक शिक्षणाबाबतीतील शिफारशी :

हंटर आयोगाने आकृती क्र. ४.८ मध्ये दर्शविण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने प्राथमिक शिक्षणाबाबतीत शिफारशी केलेल्या दिसून येतात.




आकृती क्र. ४.८ हंटर आयोगाच्या प्राथमिक शिक्षणविषयक शिफारशी

आकृती क्र.४.८ मध्ये दर्शविलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने सदर शिफारशी पुढीलप्रमाणे

- प्राथमिक शिक्षण हे लोकांचे शिक्षण आहे त्यामुळे ते स्थानिक भाषेतून देण्यात यावे.
- प्राथमिक शिक्षणास अधिक अर्थपुरवठा करण्यात यावा.
- शासनात नोकरी देताना लिहिता-वाचता येते की नाही ते पहावे.
- इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे इ. स. १८७० व १८७६ मध्ये प्राथमिक शिक्षणाविषयक कायदा करण्यात आला आहे. त्याप्रमाणे भारतातही कायदा करण्यात यावा.
- प्राथमिक शिक्षणाचा कारभार जिल्हा किंवा नगरपरिषदांच्या मंडळाकडे सोपविण्यात यावा.
- स्थानिक शाळांना प्रोत्साहन द्यावे.
- प्राथमिक शाळांना प्रोत्साहन द्यावे.
- प्राथमिक शाळांतील अध्यापन आणि व्यवस्थापन स्थानिक परिस्थितीशी मिळते जुळते असावे.
- प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी शासन निधी राखून ठेवण्यात यावा.
- आदिवासी भागात शिक्षण पोहोचण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे.

अशा या प्राथमिक शिक्षणाबाबतीतील महत्त्वाच्या शिफारशी हंटर आयोगाने दिलेल्या आहेत. प्रामुख्याने या आयोगाच्या अहवालामध्ये प्राथमिक शिक्षणाबाबतीतील घटकांवर भर दिलेला दिसून येतो. याबरोबर सदर आयोगाने काही शिफारशी त्यांचा आता आपण अभ्यास करूयात.

**हंटर आयोगाच्या माध्यमिक शिक्षणाबाबतीतील शिफारशी :**

हंटर आयोगाच्या माध्यमिक शिक्षणाबाबतीतील काही मुख्य शिफारशी पुढीलप्रमाणेः

- माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्था आदर्श म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये कमीत कमी एक आदर्श माध्यमिक शिक्षण देणारी शाळा सुरू करावी.

- माध्यमिक शिक्षण स्तरावर विद्यापीठ शिक्षणाची पूर्व तयारी करून घ्यावी यासाठी विद्यार्थ्यांना तशा पद्धतीने तयारीस आवश्यक विषयांचे अध्यापन करावे. तसेच काही व्यावसायिक विषयांचा देखील समावेश असावा. जेणेकरून सदर विषय विद्यार्थ्यांना व्यवहारामध्ये उपयुक्त ठरतील.
- माध्यमिक शिक्षणाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ही उच्च शिक्षित लोकांकडे सोपविण्यात यावी.
- इंग्रजी माध्यमातून माध्यमिक शिक्षण देण्यात यावे.
- शासकीय शांळामधून आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्कापेक्षा कमी शुल्क हे शासकीय अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये आकारण्यात यावे.

तर विद्यार्थी मित्रांनो, आतापर्यंत आपण हंटर आयोगाने दिलेल्या महत्त्वाच्या शिफारशीबद्दल ज्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची संबंधित होत्या त्याची माहिती घेतली आहे. तर आपल्याला ही माहिती कितपत समजली हे जाणून घेण्यासाठी आपण आता स्वाध्याय सोडवू यात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

१) हंटर आयोगाची स्थापना का करण्यात आली?

२) प्राथमिक शिक्षण हे कोणाचे शिक्षण आहे?

३) हंटर आयोगाने प्राथमिक शिक्षणास कोणी अर्थपुरवठा करावा असे सूचित केले?

४) हंटर आयोगाने कोणाच्या प्रशिक्षणासाठी निधी राखून ठेवावा असे सूचित केले?

५) माध्यमिक शिक्षणातून विद्यार्थ्यांची कशासाठी तयारी करून घेण्यात यावी?

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**माहित भाषानिष्ठ :**

भारतीयांची प्रगतीही संस्कृत, अरबी आणि फारशी भाषांच्या माध्यमातून करण्यावर भर देणारा गट.

**आंग्ल भाषानिष्ठ :**

इंग्रजी माध्यमातून पाश्चिमात्य वाङ्मय आणि विज्ञान यांचे शिक्षण देवून भारतीयांची प्रगती साधण्यास समर्थन देणारा गट

**भारतीय विज्ञान :**

लॉर्ड मेकॉलेच्या मते लॉकचे तत्त्वज्ञान आणि मिल्टनच्या काव्यांचा ज्या व्यक्तीने अभ्यास केला आहे.

**झिरपता सिद्धांत :**

लॉर्ड मेकॉले यांनी मांडला. निम्नवर्ग हा उच्चवर्गाचे अनुकरण करतो त्यामुळे सर्व प्रथम उच्च वर्गीयांना शिक्षण देणे आणि त्या वर्गाचे अनुकरण करत तळागाळातील लोकांपर्यंत थेंबा थेंबाने शिक्षण पोहोचविणे.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

१) चार्टर ॲक्ट

२) पाश्चिमात्यांनी आणि मिशनऱ्यांनी

३) माहित भाषानिष्ठ

४) आंग्ल भाषानिष्ठ

५) कार्यकारी मंडळातील विधि सदस्य (लॉ. मेंबर)

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

१) लॉर्ड मेकॉले

२) ज्यांनी लॉकने तत्त्वज्ञान आणि मिल्टनच्या काव्यांचा अभ्यास केला तो.

३) लॉर्ड मेकॉले

४) उच्च वर्गाला

५) शिक्षित लोक व सामान्य लोक यांच्यातील दरीमुळे

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

१) १८५४

२) प्रांतवार

३) कलकत्ता, मुंबई, मद्रास व आवश्यकतेनुसार इतरत्र

४) गुणवत्तापूर्ण

५) सर्वसमावेशक

**स्वयं अध्ययन प्रश्न – ४**

१) प्राथमिक शिक्षण सर्वत्र पोहचविण्यासाठी

२) लोकशिक्षण

३) शासनाने

४) प्राथमिक शिक्षकांच्या

५) विद्यापीठ शिक्षणाची

## ४.५ सारांश

विद्यार्थी मित्रांनो आपण ब्रिटिश कालीन शिक्षण या घटकामध्ये आतापर्यंत पाश्चिमात्यांनी आणि मिशनऱ्यांची धर्म प्रसारासाठी आणि सत्ता स्थापनेसाठी कशा प्रकारे प्रयत्न केले ते अभ्यासले त्याचबरोबर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य भारतात स्थापन झाले. त्यावेळी राज्यकारभारासाठी आणि भारतीयांची प्रगती साधण्यासाठी म्हणून त्यांना भारतीयांना शिक्षण देण्यात यावे असे वाटू लागले. आणि यामुळेच शासनाने विविध आयोग किंवा समित्या नेमलेल्या दिसून येतात. अशाच समित्यांमध्ये दोन गट पडलेले दिसतात. एक गट जो भारतीयांना संस्कृत, अरबी, पारशी भाषेतून शिक्षण द्यावे याचे समर्थन करणारा होता. तो म्हणजे माहित भाषानिष्ठ भारतीयांना पाश्चिमात्य भाषांमधून शिक्षण द्यावे यावर भर देणारा होता. तो म्हणजे आंग्ल भाषानिष्ठ यावर तोडगा काढण्यासाठी लॉर्ड मेकॉले यांची नेमणूक झालेली दिसून येते आणि त्याने माहित भाषानिष्ठांवर टीका करत आंग्ल भाषानिष्ठांचा पक्ष उचलला तसेच शिक्षणविषयक वर्ग सिद्धांतावर आधारित झिरपता सिद्धांत मांडलेला दिसून येतो.

परंतु ही झिरपता सिद्धांतावरील आधारित शिक्षण पद्धती फारशी लोकांपर्यंत शिक्षण पोहचवू शकली नाही आणि त्यामुळे वूड यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला. त्यांनी शासनास भारतीय शिक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याची शिफारस केली आणि प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून तर माध्यमिक शिक्षण इंग्रजीमाध्यमातून देण्यात यावे. तसेच अभ्यासक्रम सर्वसमावेशक असावा, व्यावसायभिमुख व रोजगाराभिमुख देण्यात यावे. स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केलेला दिसून येतो. शासनाने या शिफारशी अंमलबजावणीत आणल्या परंतु शिक्षणाचा प्रसार म्हणावा तसा न झाल्याने हंटर आयोगाची नेमणूक करण्यात आली. हंटर आयोगाने प्राथमिक शिक्षणाबाबतीतील धोरणविषयक, कायद्याबद्दल, शालेय व्यवस्थापन, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि सदर शिक्षणासाठी अर्थ पुरवठा या बाबतीत महत्त्वाच्या शिफारशी केलेल्या दिसून येतात. याचबरोबर माध्यमिक शिक्षण हे इंग्रजी माध्यमातून देण्यात यावे आणि विद्यापीठीय शिक्षणाची तयारी या स्तरावर करून घेण्यात यावी याबाबत शिफारस केलेली दिसून येते.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

१) माहित भाषानिष्ठ व आंग्लभाषानिष्ठ यांची भारतीय शिक्षणासंदर्भातील विचारसरणी स्पष्ट करा.

२) लॉर्ड मेकॉले यांनी त्यांच्या टिप्पणीमधून माहित भाषानिष्ठ व आंग्लभाषानिष्ठ यांच्या वादावर नेमका कोणता तोडगा काढला याबाबत चर्चा करा.

३) लॉर्ड मेकॉले यांचा शिक्षणविषयक झिरपता सिद्धांत स्पष्ट करा.

४) वूडच्या शैक्षणिक खलित्यामधील शिफारशी स्पष्ट करा.

५) हंटर आयोगाच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाविषयी शिफारशी स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :


- करंदीकर सुरेश, मंगरूळकर मीना (२००९), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, कोल्हापूर : फडके प्रकाशन.
- गद्रे गीता व गद्रे ल. रा. (१९७७) शिक्षणाचा इतिहास भाग १,२,३. पुणे : व्हीनस प्रकशन
- जाधव भोसले, सरपोतदार (२०१०) भारतीय शिक्षणाचा विकास. कोल्हापूर : फडके प्रकाशन
- देशमुख एल. जी. (२००३), भारतातील शिक्षणाचा विकास. कोल्हापूर : फडके प्रकाशन
- धनवडे नंदकुमार धनवडे सुरेखा, शिखरे व्ही. पी. (२०१०) भारतातील शिक्षणाचा विकास. कोल्हापूर : फडके प्रकाशन.


❖❖❖